रचना

MAHARASHTRA MANDAL
CHICAGO

दिवाळी
विशेषांक २०२५

Counseling, Mental Health And Treatment, Psychiatric
HORIZONS BEHAVIORAL HEALTH PROFESSIONAL SERVICES, LLC
What We Do
Horizons is an outpatient behavioral health facility, serving McHenry County residents of all ages with a diagnosis of mental illness. Services include psychiatric diagnostic evaluations along with medication management and therapeutic injections, psychotherapy, family therapy, group therapy, and psychological testing.
Who We Serve
Child, Adolescent and Adult
+815-455-7100
500 Coventry Ln, #205, Crystal Lake, IL 60014
VISIT OUR WEBSITE:
HTTPS://WWW.HORIZONSBH.COM/

संपादकीय

नमस्कार प्रिय वाचक हो,

तुम्हां सर्वांना दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा!

प्रत्येक वर्षी दिवाळी आली, की मन मायदेशात जाऊन पोहोचतंच. भारतातली ती दिवाळी, अंगणात टाकलेला सडा, रांगोळी, आकशदिवा, पणत्या, सुगंधी उटण्याच्या अंघोळी, त्यानंतर खमंग फराळावर मारलेला ताव आणि जोडीला तेवढ्याच खरपूस, विविध साहित्याने नटलेल्या दिवाळी अंकांचे निवांतपणे केलेले वाचन. दिवाळी अंकांशिवाय आपली दिवाळी पूर्ण होऊच शकत नाही. आजही डिजिटल स्वरूपात का होईना, दिवाळीला 'दिवाळी अंक' हवाच.
'रचना दिवाळी विशेषांक' हा २०२५ या वर्षातला शेवटचा अंक. मागच्या तीनही अंकांना तुम्ही छान प्रतिसाद दिलात. प्रतिक्रिया दिल्यात त्याबद्दल रचना चमूतर्फे धन्यवाद. हा अंकही आपल्याला आवडेल याची खात्री आहे.
या अंकात आपणां सर्वांचे आवडते लेखक कै.सुहास शिरवळकर यांच्याविषयी त्यांच्या पत्नी श्रीमती सुगंधा शिरवळकर यांनी लिहिलेल्या आठवणी आपल्याला वाचायला मिळणार आहेत. श्रद्धा भट यांची कथा वाचताना मराठीत एका उत्तम कथाकाराचा उदय होतो आहे, याची जाणीव तुम्हाला झाल्यावाचून राहाणार नाही, आणि ही कथाकार व्यक्ती आपल्या शिकागोची आहे, याचा तुम्हाला नक्कीच अभिमान वाटेल, त्या जोडीला तारापद रायांची प्रा. विलास गिते यांनी अनुवादित केलेली भूत आणि रिपोर्टर ही उपरोधपूर्ण शैलीत लिहिलेली कथा भूतकथेच्या आडून एक वेगळंच सत्य तुमच्या निदर्शनास आणेल, लेखांमध्ये डॉ. चंद्रा वेदक यांच्या लेखातून Anthem या कवितेवर मानसशास्त्राच्या अंगाने वेगळाच प्रकाश टाकलेला दिसेल. गेल्या तिन्ही अंकात श्रीज्ञानेश्वरीतलल्या ओव्यांचं अतिशय रसाळ असे विवेचन श्रीदत्त राऊत यांनी केले होते, तसेच याही अंकात ते वाचायला मिळेल. उमा दिघे यांनी लिहिलेले रोझमेरीचे सुंदर व्यक्तिचित्र, वैशाली बेलसरे यांचा कविता का वाचावी हा लेख, साहित्यकट्टयावर वेळ या विषयावर रश्मी चाफेकर, मंजिरी बर्वे, माधवदादा गोगावले, अलका धाराशीवकर या सदस्यांनी मांडलेले विचार, चित्रपट अभिनेते श्री. मनोजकुमार यांच्यावरचा धनंजय देशपांडे यांचा लेख, फॉलच्या रंगसोहळ्याविषयी माधुरी माटे यांचं चिंतन, विविध कार्यक्रमांचे आणि शिकागोतील महत्वाच्या घडामोडींचे वृत्तान्त.. या अंकात, इलिनॉय राज्यात दिवाळी सणाला अधिकृत मान्यता देणारा ठराव कसा मांडला गेला आहे, त्याचे सविस्तर वृत्त माधवदादा गोगावले यांनी दिले आहे, शिल्पा देशपांडे, अश्विनी कुंटे, अलका धाराशीवकर, रत्नांगी मालपेकर यांच्या चिंतनशील कविता याशिवाय आमची नेहमीची लोकप्रिय सदरे— गंमत शब्दांची, सुख नव्हे सुखरूपता, तनमनाचा भोवरा, शब्दकोडे, पाककृती ही आहेतच.
या शेवटच्या अंकाच्या निमित्ताने महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अध्यक्षा नमीताताई वेदक, उपाध्यक्षा उर्मिला दामले, मनोज भट यांचे आम्ही आभार मानतो. 'रचना' चे सल्लागार चेतन रेगे यांनी अंकांची गुणवत्ता वाढावी, यासाठी वेळोवेळी मोलाच्या सूचना दिल्या, यासाठी आम्ही त्यांचेही आभारी आहोत. 'रचना' चमूमधील आमच्या गुणी मैत्रिणी स्वरा सुर्वे, अनन्या भुस्कुटे आणि निष्का पाटील यांनी न कंटाळता घेतलेल्या मेहनतीची आम्हाला जाणीव आहे. त्यासाठी त्यांच्याप्रती कृतज्ञताभाव आहेच.

दिवाळी म्हणजे आनंद, रोषणाई, समृद्धीचं गाणं
दिवाळी म्हणजे दिव्यांसोबत मनामनांचं उजळून जाणं!

खरं तर सणवार, मग ते कुठल्याही संस्कृतीमधले असो, मनं उजळून टाकण्यासाठी येत असतात. आता इथे अमेरिकेत पहा ना, थँक्सगिविंगपासून सुरू झालेली रोषणाई थेट न्यू ईयरपर्यंत सुरू असते. मग त्या दरम्यान दिवाळीतल्या पणत्या, हनुकामध्ये आठ दिवस ‘मेनोराह’ नावाच्या स्टँडवर लावलेल्या मेणबत्त्या आणि ख्रिसमसमध्ये ख्रिसमसच्या झाडावर झगमगणाऱ्या दिव्यांच्या माळा असा सगळा प्रकाशाचाच उत्सव असतो. जणू प्रत्येक संस्कृती आपापल्या सणाच्या माध्यमातून अंधारावर प्रकाशाचा अर्थात वाईटावर चांगल्याचा विजय हाच संदेश देत असते.
राम वनवासातून अयोध्येत परत आले त्या दिवशी सर्व अयोध्यावासीयांनी दिवे लावून आनंद साजरा केला तीच आज दिवाळी म्हणून आपण साजरी करतो...अशी आख्यायिका आहे. या दिवाळीच्या निमित्ताने पंकज चतुर्वेदींच्या एका अर्थपूर्ण हिंदी कवितेतील काही ओळी आठवतात. प्रभू श्रीरामाला उद्देशून ते म्हणतात-

दीपावली के
दियों की रोशनी में
तुम्हारा दिया
यह आशय
झिलमिलाता है
कि प्रेम न हो
तो पराक्रम भी
अन्याय ही है...

प्रेम हेच सत्य, शिव, सुंदर आहे.
ही दिवाळी सर्वांसाठी भरभरून प्रेम आणि आनंद घेऊन येणारी ठरावी हीच सदिच्छा!

आपले नम्र,

सुजाता महाजन शिल्पा देशपांडे
संपादक, ‘रचना'

अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

आता हिवाळी सुट्ट्या सुरू होण्याचे सर्वांना वेध लागले असतील. तुम्ही सगळे शॉपिंग, रोषणाई, आप्तजनांच्या भेटीगाठी यामुळे उत्साहाच्या वातावरणात असाल आणि नवीन वर्षाच्या स्वागताला लागलाही असाल. वर्ष कसं लवकर सरलं, नाही! असं वाटतं आहे, की अगदी आत्ताच तर मी महाराष्ट्र मंडळ शिकागोची अध्यक्षा म्हणून माझी ओळख तुम्हाला करून दिली होती, माझे यावर्षीचे संकल्प सांगितले होते आणि बघता बघता वर्ष सरूनही गेलं.
एखादं वर्ष असं येतं, की त्यात आपला आणि आपल्या कार्यक्षमतेचा अगदी कस लागतो. हे वर्ष माझ्या आणि माझ्या कार्यकारिणीच्या दृष्टीने असंच निघालं आणि जेव्हा असा कस लागतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपलं कार्य पूर्ण झाल्याचा, कामाचं सार्थक झाल्याचा आनंद मनापासून उपभोगता येतो. तसंच काहीसं मला आणि माझ्या कार्यकारिणीला वाटतं आहे. मी आणि माझ्या कार्यकारिणीने यावर्षी, कितीतरी महत्वपूर्ण कामं कामं पूर्णत्वास नेली, काही नवीन गोष्टी घडवून आणल्या, याचं समाधान मला नेहमीच राहील.
यावर्षीची दिवाळी अगदी खासच होती असं म्हणावं लागेल. सुप्रसिद्ध आणि लोकप्रिय अभिनेते प्रशांत दामले यांचे नाटक 'शिकायला गेलो एक' सादर करून महाराष्ट्र मंडळ शिकागोने शिकागोकरांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित केला, असे म्हणता येईल. या नाटकाचे इतरत्र प्रयोग होते, त्यामुळे शुक्रवार संध्याकाळी हा प्रयोग शिकागोत ठेवावा लागला, तरीही शिकागोच्या रसिक प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला आणि हा प्रयोग हाऊसफुल्ल झाला. आजूबाजूच्या राज्यातूनही लोक खास या प्रयोगासाठी ड्राईव्ह करून आले होते. ९५० या संख्येने उपस्थित राहून प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. संपूर्ण सभागृह हशा आणि टाळ्यांनी दणाणून गेले होते. प्रशांत दामले यांच्या तोडीस तोड असे सर्वच कलाकारांचे काम होते. आणि या साऱ्याला साजेसा असा सेट महाराष्ट्र मंडळाच्या सेट डिझाईन टीमने अतिशय परिश्रम करून कमी वेळात उभा केला होता. या साऱ्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.
सर्वांना घेऊन चालणे, नवनवीन लोकांना संधी देऊन त्यांच्या कलागुणांना वाव देणे हेच यावर्षीच्या MMC कार्यकारिणीचे ध्येय होते. त्याचंच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आमचा दिवाळीचा कार्यक्रम 'सणकोंदण'. अनिता कुळकर्णींची संकल्पना, शिल्पा देशपांडे यांचे लेखन आणि अनुप देशमुख यांचे दिग्दर्शन असलेल्या या नाटकात दीड वर्षाच्या बाळापासून ते ऐंशीच्या घरातले 'फॉरेव्हर यंग' असे जवळ जवळ ऐंशी कलाकार होते. उर्मिला दामले आणि शिल्पा चौबळ-वैद्य यांनी प्रमुख सुत्रधाराच्या भूमिकेत उत्कृष्ट अभिनय करत महाराष्ट्रातील सण आणि परंपरांचे महत्व आणि सौदर्य उलगडत नेले. या सर्वांनी जवळजवळ तीन महिन्यांहून अधिक काळ या कार्यक्रमाच्या तयारीला दिला. आणि एकमेकांच्या सहकार्याने आणि परिश्रमाने उत्तम प्रयोग सादर केला. महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांच्या कलागुणांनी नटलेला हा कार्यक्रम खरोखर कौतुकास पात्र होता.
MMC कार्यकारिणी आणि शिकागो मराठी शाळा कार्यकारिणी यांच्या संयुक्त समन्वयातून श्री . दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित ‘अभंग तुकाराम’ या चित्रपटाचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून, पालकांकडून, MMC सदस्यांकडून तसेच संपूर्ण मराठी शाळा परिवाराकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद लाभला.

या यशस्वी उपक्रमासाठी BMM कार्यक्रम समिती व India HUB यांचे मोलाचे सहकार्य व सातत्यपूर्ण पाठिंब्यासाठी मनःपूर्वक आभार. अशाच संत चरित्रांनी समृद्ध प्रेरणादायी आणि संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या उपक्रमांतून मराठी अस्मिता शिकागोकरांत अधिक दृढ होत राहो!त्याचप्रमाणे CSM 350 या उपक्रमातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा देखील यशस्वीरीत्या पूर्ण झाला!
१९ डिसेंबरच्या संध्याकाळी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पायथ्याशी, "Initiated by Maharashtra Mandal Chicago" अशा यथार्थ शब्दांत MMC चे फलक (Plaque) सर्व शिवभक्तांच्या उपस्थितीत प्रतिष्ठापित करण्यात आले. याच वेळी महाराष्ट्र मंडळ व विहिंप यांच्यातील सामंजस्य कराराची (MOU) देवाणघेवाण झाली व धनादेश जमा करण्यात आला.
CSM 350 चे सर्व स्वयंसेवक, नेतृत्व, सल्लागार, दाते, आतापर्यंत कार्यरत असलेले मंडळाच्या कार्यकारिणीतील व विश्वस्त समितीतील सर्व मान्यवर सदस्य, स्वयंसेवक तसेच विश्व हिंदू परिषद अमेरिकाचे राष्ट्रीय सचिव व स्वयंसेवक—या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हे कार्य शक्य झाले. सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.
महाराष्ट्र मंडळ शिकागोची अध्यक्ष म्हणून माझ्या कारकीर्दीचा शेवटचा ट्प्पा खूप यशस्वीरीत्या पार पडला, याचा मला सार्थ अभिमान तर आहेच पण त्याबरोबरच, मनात कृतज्ञता सुद्धा दाटून येते आहे. महाराष्ट्र मंडळाला माझ्या कारकीर्दीत चांगलं काम करता आलं याच श्रेय सर्वांचं आहे. कार्यकारिणीच्या आणि स्वयंसेवकांच्या सहकार्याशिवाय मला हे शक्य झालं नसतं.
आता पुढच्या वर्षीच्या अध्यक्षांकडे आणि त्यांच्या कार्यकारिणीकडे सूत्रं सोपवायची वेळ येऊन ठेपली आहे. पुढच्या वर्षीच्या अध्यक्ष आणि कार्यकारिणीला माझ्या मनापासून शुभेच्छा. त्यांच्या कारकीर्दीत सुद्धा मंडळाची अशीच उत्तरोत्तर प्रगती घडत राहो, ही सदिच्छा!
कुणीतरी म्हटलेलं एक वाक्य मला आज आठवतंय,
"The highest reward for a person's toil is not what they get for it, but what they become by it."
महाराष्ट्र मंडळासाठी झटताना, वेगवेगळे निर्णय अंमलात आणताना, मिळून मिसळून कामं करताना, वेगवेगळ्या अनुभवांतून जाताना एक माणूस म्हणून मी नक्कीच अधिक उन्नत, अधिक चांगली घडत गेले आहे असं मला जाणवतं आहे आणि कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं आहे.
तुम्हा सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अध्यक्ष म्हणून मी आपला निरोप घेते. पुन्हा भेटत राहूच.

आपली नम्र,

नमीता वेदक
अध्यक्षा, महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५

‘रचना’ चमू

सुजाता महाजन – संपादक

शिल्पा देशपांडे – संपादक



चेतन रेगे – सल्लागार

स्वरा सुर्वे – मुखपृष्ठ,
मांडणी आणि सजावट (गुढीपाडवा विशेषांक)

अनन्या भुसकुटे- मांडणी आणि सजावट
(मकरसंक्रान्त, गणपती आणि दिवाळी विशेषांक)

निष्का पाटील - मुद्रितशोधन इंग्रजी

MMC Executive Committee (केंद्रीय कार्यकारी समिती)

नमीता वेदक - अध्यक्ष

I have been a Chicago resident for over 35 years and have been actively involved in the Chicago Maharashtra Mandal since 1987 both as a foot soldier and as a member of various executive committees. I served as Vice President of the Mandal in 1999. More recently, I served as Board of Director in 2022, administrator of Chai Town Angat Pangat in 2023 and as a Vice President in 2024. Besides Maharashtra Mandal, I also have been active in other organizations including Ekjut Foundation, BAGC, BAPS and NAMI.

I was very active in Bollywood and was a lead actor in a bunch of films including Paheli (1976), Gangadham (1978) and Itihas (1985) before coming to the US. I have also acted in various Bombay Television/Doordarshan plays and performed on professional stage in Mumbai. I am a recipient of some awards for my performances in both film and stage. I am very much a people person and love to help wherever and whenever I can.

उर्मिला दामले – उपाध्यक्ष

महाराष्ट्र मंडळ शिकागोची २०१६ सालापासून सदस्य आहे. २०१८ पासून कार्यक्रमात सहभागी आणि २०२१ सालापासून कमिटीमध्ये सहभागी होऊन अध्यात्मपीठ, भजनसेवा, योगसाधना , डान्स टीम, ढोल ताशा, डेकोरेशन टीम, फूड टीम अशा अनेक उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन मंडळात कार्यरत आहे. ह्या वर्षी मंडळाच्या उपाध्यक्षपदी राहून मराठी भाषा व संस्कृती इथे राहणाऱ्या महाराष्ट्रीय समाजापर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे.



मनोज भट – उपाध्यक्ष

I have been living in Chicago since 1990 and have been an active member of Maharashtra Mandal Chicago (MMC) since then. During this time, I served as a BOD in several committees, volunteered at the 2011 BMM Chicago convention and in the 2019 Golden Jubilee celebration.

In addition, I was a volunteer and Board Member of the Grayslake Hindu Temple for almost 10 years.

I am honored to have been selected as the Vice President for MMC 2025, and I am very excited to contribute to the growth of our community and culture.

योगेंद्र राव – सचिव

I have been living in Chicago since 2020 and have had the pleasure of being an active member of Maharashtra Mandal Chicago (MMC) for the past four years. During this time, I have assisted the MMC Stage and Props team for several years and volunteered with the Food (Annapurna) team, as well as various MMC events. This year, I am honored to have been elected as the Secretary for MMC 2025, and I am very excited to contribute in more areas and help our community grow.

विशाल नवलकर – कोषाध्यक्ष

I have been a resident of Chicago since 2017.
Have been actively volunteering in Marathi Shaala activities,as an assistant teacher in 2018. Also directed powada for Chicago Marathi Shaala in 2019.
Volunteered in Dhinak Dhin Dha in 2022, There after a BOD is 2022, introducing unique events and ideas like Yoga , fitness club and MMC’s first ever 5K in 2023 followed by 2024.
Also an active volunteer in world vision and Vitalant.
Looking forward to a successful 2025.

सौ. अश्विनी कुंटे

२०१३ पासून शिकागोची रहिवासी आहे. २०२० पासून महाराष्ट्र मंडळ शिकागोमध्ये स्वयंसेवक म्हणून कार्यरत आहे. २०२४ मध्ये मंडळाच्या कार्यकारिणीची सदस्य होते. तसेच महाराष्ट्र मंडळाच्या साहित्यकट्टा, बोलका कट्टा, अध्यात्मपीठ, आम्ही सारे गवय्ये , माझा News इ. साठी आयोजक म्हणून काम पाहिले आहे. मराठी शाळेत तीन वर्षे शिक्षक होते. तसेच ढोल-ताशा, फूडटीम, स्टेज टीम, डान्स टीम,रचना अंक इत्यादींमध्ये सक्रिय आहे. ह्या वर्षी देखील मराठी साहित्य आणि संस्कृतीचे प्रेम वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील राहीन.
अश्विनी कुंटे

सुनिला कुलकर्णी

नमस्कार, मी सुनिला कुलकर्णी. MMC 2025 ची एक BOD आहे. मी मंडळाच्या परंपरा टीमची धुरा सांभाळत आहे. आपण वर्षभर जे कार्यक्रम साजरे करतो, त्यांमध्ये आपल्या मराठी परंपरा गुंफण्याचं काम आमचा चमू करणार आहे. तसेच आपल्या "परंपरा" ह्या व्हाट्सअँप ग्रुपमध्ये आपण ह्या परंपरांचं महत्व, उगम आणि हा सुंदर वारसा आपल्या पुढच्या पिढीला देण्यासाठी, आताच्या काळात आपण त्या कशा सांभाळू शकतो, हे एकमेकांशी सुसंवाद करत जाणून घेणार आहोत! त्यासाठी आपल्या सगळ्यांचा सक्रिय सहभाग प्रार्थनीय आहे! लवकरच भेटूयात मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये....

अरुंधती जाधव

I have been a MMC member since 2021. This year I have the responsibility of the YOUTH group/team. We are looking forward to and encouraging youth participation in various activities online as well as in various programmes. We have already started Atharvshirsh pathan every Sankashti of the month. We want youth to have a close connection with Maharashtraian personalities, traditions and culture. Today's young generation will be representing Maharshtra Mandal in future.

प्रियेश देशपांडे

मी २०१३ पासून शिकागोचा रहिवासी आहे . महाराष्ट्र मंडळ शिकागोचा २०१५ पासून सदस्य आहे. मागील काही वर्षं स्टेज टीम, आय.टी. टीम आणि फूड टीममध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. शिकागो मराठी शाळेसाठीही मी आय. टी. टीममध्ये काम केले आहे. या वर्षी मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये सहभागी होऊन आय.टी. टीम व स्टेज टीमची धुरा सांभाळत आहे व त्याद्वारे अधिकाधिक मराठी लोकांना मंडळाशी जोडण्याचा माझा प्रयत्न राहील.

विकास भालेराव

My name is Vikas Bhalerao, and I have been associated with Maharashtra Mandal Chicago and BMM for many years. I have always kept MMC as the beneficiary while working as Treasurer, a Member of the Finance Team, and a Member of Registration at BMM. While working in the core team of the committee as a Treasurer, I had the responsibility of IT work as well (being in IT for a long time). I suggested having an IT member in the core team, and I'm glad it's worked out well since then. We tried our best to make 2010 a memorable year. We had programs for all age groups and for the Diwali program, we had a lavish dinner and musicals in the Holiday Inn banquet hall in Schaumburg. We were very conservative while working in the Finance Team. People with advanced investment knowledge should take a little more risk for better returns.

MMC EXTENDED BOARD OF DIRECTORS (अतिरिक्त संचालक मंडळ)

	चेतन रेगे I am a resident for 18+ years, bibliophile and history buff. Leadership & Initiatives: * Member, MMC EC 2023 & 2025 * Secretary, MMC EC 2022 * Concept & Leader, CSM 350 – Chhatrapati Shivaji Maharaj Monument in Chicago (Come and join the ongoing movement) * Concept & Admin, MMC Itihas Manch (2021 - Present) * Admin, MMC Adhyatma Peeth (2021) * Editor, MMC Rachana Magazine (2019) Education & Arts: * Teacher/Volunteer, MMC Chicago Marathi Shala (2017 - 2023) * Directed, wrote, acted in, and coordinated theater plays & cultural programs Commitment: Dedicated to preserving our incredible Indian heritage and building a strong Marathi community.
	पल्लवी बेटसूर **N**amaskar Mandali, This is Pallavi Betsur. Introducing myself as one of the BODs in MMC Team 2025. I have been actively volunteering since 2020.Over the past few years, I have consistently volunteered in different teams like Decoration, Food, Dhol Tasha and Dance.This year I'm leading the Decoration team with a promise to showcase the best of creative minds. Looking forward to having a fantastic year. Thank you 🙏

प्राजक्ता जोशी

I have been living in Chicago since 2015 and an active member of Maharashtra Mandal Chicago for the past four years. I had the opportunity to serve in the MMC Stage and Props team, Decoration and YOUTH Team. This year I am excited to contribute to the MMC Flyers team, Stage Team and help the community grow.

अनुप देशमुख

I have been a Chicago resident for the past five years, actively participating as a volunteer in various events and projects organized by Mandal. In addition to my passion for pickleball and music, I enjoy dramatics and reading. I look forward to making new friends and helping to expand Mandal's reach among the Maharashtrian community in the Chicagoland area.

अर्चना श्रीपाल

नमस्कार मंडळी,
मी अर्चना श्रीपाल. महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५ ची कार्यकारिणी सदस्य. माझे कुटुंबीय आणि मी २०१४ पासून महाराष्ट्र मंडळामध्ये कार्यरत आहोत. या वर्षी अन्नपूर्णा टीमची कार्यधुरा सांभाळण्याची जबाबदारी मी आणि माझे सहकारी सांभाळणार आहोत. मी आतापर्यंत परंपरा, ढोल-ताशा लेझिम, अंगत-पंगत, नृत्य तरंग अशा ग्रूपमध्ये काम केले आहे. या वर्षीही तुम्हां सर्वांना सोबत घेऊन, सर्व कार्यक्रमात भाग घेऊन, कार्यक्रमात सुग्रास भोजनाचा आनंद देण्याचा प्रयत्न करू.

MMC BOARD OF TRUSTEES (विश्वस्त मंडळ)

उल्का नगरकर

रश्मी चाफेकर

माधव गोगावले

जयदीप बुझरूक

राहुल थत्ते

MMC INVESTMENT ADVISORY COMMITTEE (गुंतवणूक सल्लागार समिती)

सुहास गोसावी

चैतन्य आगाशे

पराग जोशी

MMC Zoom कट्टे

संकल्पना आणि ग्राफिक्स : अमोल श्रीपाल

MMC साहित्यकट्टा

सुजाता महाजन

रश्मी चाफेकर

रश्मी वडवळकर

अश्विनी कुंटे

नमीता वेदक

MMC अध्यात्मपीठ

अनिरुद्ध दामले

नमीता वेदक

उर्मिला दामले

रेखा देवधर

माधव गोगावले

शिल्पा देशपांडे

हर्षा थत्ते

MMC इतिहासमंच

चेतन रेगे

माधव गोगावले

विशाल नवलकर

वैष्णवी नवलकर

शलाका पालकर - रेगे

नमीता वेदक

MMC आम्ही सारे गवय्ये

गौरी कुलकर्णी

मितेश कांबळी

विकास भालेराव

निखिल जाधव

नमीता वेदक

MMC YOUTH

अरूंधती जाधव

श्वेता हरणखेडकर

शीतल देशपांडे

नमीता वेदक

आरती खोत

चेतन रेगे

MMC अर्थविचार

नमीता वेदक

चैतन्य आगाशे

चेतन रेगे

मंदार जोगळेकर

MMC भजनसेवा

अनिरुद्ध दामले

उर्मिला दामले

गौरी कुलकर्णी

सुदर्शन अय्यंगार

नमीता वेदक

MMC योगसाधना

‘विशाल नवलकर

अनिरुद्ध दामले

पूर्वा कुलकर्णी

उर्मिला दामले

नमीता वेदक

MMC ढिपाडी ढिपांग

उर्मिला दामले

रसिका बांदेकर

नमीता वेदक

MMC चमक धमक

नम्रता पुरव

पल्लवी बेटसूर

नमीता वेदक

MMC परंपरा

पल्लवी बेटसूर

दीपा सावंत

सुनीला कुलकर्णी

‘

प्रज्ञा जोगळेकर

नमीता वेदक

MMC अन्नपूर्णा

अर्चना श्रीपाल

अपर्णा खळदकर

पल्लवी पाटील

शीतल देशपांडे

नमीता वेदक

MMC आरोग्यधाम

उल्का नगरकर

रेखा देवधर

अनुपमा भट



चंद्रगुप्त शशिशेखर वेदक

नमीता वेदक

MMC फिटनेस क्लब

विशाल नवलकर



माधव गोगावले

नमीता वेदक

आनंद देशपांडे

MMC भ्रमणगाथा

कविता कुलकर्णी

रत्नांगी मालपेकर

मनोज भट

नमीता वेदक

MMC फॉरेवर यंग

दीपा सावंत



माधव गोगावले

कश्मिरा मगर

ज्योती गोगावले

नमीता वेदक

MMC शिकागोची बाग

दीपाली लांडे

श्वेता हरणखेडकर

प्रियेश देशपांडे

नमीता वेदक

MMC ढोल- ताशा

अनिरुद्ध दामले

सदानंद जोशी

चैतन्य आगाशे

पल्लवी बेटसूर

उर्मिला दामले

नमीता वेदक

MMC प्रतिसाद

उल्का नगरकर

चेतन रेगे

नमीता वेदक

शिकगो मराठी शाळा कर्यकारिणी

कविता वाडकर
शिकागो मराठी शाळा संचालिका

अक्षदा सावंत
शिकागो मराठी शाळा कोषाध्यक्ष

मयुरा देशपांडे
शाखा संचालिका -शॉम्बर्ग

निलेश अग्रवाल
शाखा संचालक - बफेलो ग्रूव्ह / व्हिलिंग

अरुंधती जाधव
शाखा संचालिका - नेपरव्हील



चेतन रेगे
महाराष्ट्र मंडळ - मराठी शाळा समन्वयक

प्रियेश देशपांडे
शाळा माहिती- तंत्रज्ञान प्रमुख

शिकागो मराठी शाळा विश्वस्त (सल्लागार)

दीपा सावंत

नमीता वेदक

प्रिया तेलवेकर

विशाल नवलकर

MMC रंगमंच व्यवस्था टीम

प्रियेश देशपांडे
योगेंद्र राव
अनुप देशमुख
अमोल श्रीपाल
मनोज जोशी
प्राजक्ता जोशी
अश्विनी कुंटे
मनोज कुंटे
रोहन गांधी
तुषार निमकर

MMC मजकूर लेखक टीम

रश्मी चाफेकर
चेतन रेगे
प्राजक्ता जोशी
वैशाली बेलसरे
शीतल देशपांडे
सुनिला कुलकर्णी
सुजाता महाजन (मुद्रितशोधन)
नमीता वेदक

दिवाळी धमाका

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
महाराष्ट्र मंडळ शिकागो
सहर्ष सादर करत आहे,
ranjekar
सकाळ
शिकायला गेलो एक!
मूळ कथा
द.मा.मिरासदार
लेखन-दिग्दर्शन
अद्वैत दादरकर
हृषिकेश शेलार आणि प्रशांत दामले
विशेष आभार : चितळे डेअरी
Friday, 17 October, 7:30 PM (CT)
Pfeiffer Hall at North Central College,
310 E Benton Ave, Naperville, IL 60540
Program Timeline:
6:30 PM - Check in starts
6:30PM - Daycare Check in starts
7:30-10:00 PM - Showtime

दिवाळी धमाका

|| महाराष्ट्र मंडळ शिकागो ||
दिवाळी २०२५
सण कोंदण
वारसा मराठी संस्कृतीचा..
१५ नोव्हेंबर,२०२५
Westmont High School, Oakwood Dr, Westmont, 60559
Program Timeline:
10:45 AM - Registration starts
11:30 AM to 12:30PM - Local programs
12:30 PM - 2:00PM - Lunch
2:30 PM - 5:00PM - SanKondan
Book your tickets at:
https://www.tugoz.com/events/maharashtra-mandal-chicago/mmc-2025-Sana-Kondan

महाराष्ट्र मंडळ शिकागो
बीटरूट कबाब
पापड
कोशिंबीर
चना मसाला
मेथी पनीर मलई
गाजराचा हलवा
चपाती
गोवा चिकन करी
काश्मिरी पुलाव
डाळ तडका
दिवाळी फराळ
चहा
दिवाळी २०२५
सण कोंदण
वारसा मराठी संस्कृतीचा..
१५ नोव्हेंबर,२०२५
Westmont High School, Oakwood Dr, Westmont, 60559
Program Timeline:
10:45AM – Registration & Faral distribution starts
11:30AM to 12:30PM - Cultural programs
12:30PM to 2:00PM - Lunch
2:30PM to 5:00PM – San Kondan
Book your tickets at:
https://www.tugoz.com/events/maharashtra-mandal-chicago/mmc-2025-Sana-Kondan

-अनुक्रमणिका-

कथा		
• वादळ	श्रद्धा भट	४५
• भूत आणि रिपोर्टर	विलास गिते	५२
• काळं पांढरं रान माझं	वंदना धर्माधिकारी	५५
• दिवाळी आली त्यांच्या दारी (किशोर कथा)	प्रशांत गौतम	६१
लेख		६५ - ८८
• सुहास आणि मी	सुगंधा शिरवळकर	६५
• शोध परिपूर्णतेचा	डॉ. चंद्रा वेदक	७२
• एक तरी ओवी अनुभवावी	श्रीदत्त राऊत	७४
• रोझमेरी	अुमा दिघे	७८
• कविता का वाचावी?	वैशाली बेलसरे	८०
• मरण इतके सुंदर असू शकते!	माधुरी प्रसन्न माटे	८३
• भारत की बात सुनाता हूं।	धनंजय देशपांडे	८५
कॅमेऱ्यातले क्षण • शिशिरागम		८९ - ९१
वेळ (साहित्यकट्ट्यावर सादर झालेले 'वेळ' या विषयावरचे लेखन)		९२- १००
• एक सेकंद	रश्मी चाफेकर	९२
• वेळ	मंजिरी बर्वे	९४

• वेळ	अलका धाराशीवकर	९६
• वेळ	माधव गोगावले	९८
कविता		१०१ - १०८
• पणती	शिल्पा देशपांडे	१०१
• दोन कविता	अश्विनी कुंटे	१०२
• आनंदाचा पारिजात	अलका धाराशीवकर	१०५
• तीन कविता	विक्रम गोखले	१०६
• कसं ठरवू?	रत्नांगी निलेश मालपेकर	१०८
वृत्तान्त		१०९ - ११७
• सुख म्हणजे नक्की काय असतं?	राजीव गोखले	१०९
• MMC दिवाळी २०२५ : आठवणींच्या दिव्यांची अविस्मरणीय रोषणाई	राजीव गोखले	१११
• इलिनॉय राज्यातील भारतीयांसाठी सोनियाचा दिन	माधव गोगावले	११४
सदरे		११८ - १३०
शब्दकोडे	अभिजित रायरीकर	११८
गंमत शब्दांची गोसावी	डॉ. द.दि. पुंडे	१२१
सुख नव्हे सुखरूपता	प. पू. श्री. मंगेशदादा फडके	१२२
तन- मनाचा भोवरा अधीन - व्यसनाधीन	रश्मी वडवळकर	१२५

खवय्येगिरी • मटार ढोकळा	कविता कुलकर्णी	१२८
शब्दकोडे उत्तर		१३०
MMC झूम कट्टयांच्या कार्यक्रमपत्रिका		१३१ - १३६

- **या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतील, असे नाही.**

वाचा... वाचत रहा...

२०२५ 'रचना' चे मागील अंक वाचण्यासाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्या

https://www.mahamandalchicago.org/rachana/

वादळ

निकिता कॉन्फरन्स रूममधून बाहेर पडली आणि एकदम तिला गळून गेल्यासारखं वाटलं. बाहेर पाहिलं तर अंधार पडला होता. जानेवारीमध्ये साडेचारलाच अंधार पडतो, हे इतकी वर्ष शिकागोत राहूनही फारसं अंगवळणी पडलं नव्हतं तिच्या. स्प्रिंगफिल्डला, जिथे ती आज प्रेझेंटेशन द्यायला आली होती ते गाव तर शिकागोच्या उत्तरेकडे होतं, म्हणजे थंडी अजूनच जास्त. तिचं थकण्याचं कारण फक्त बाहेरचा अंधार हेच नव्हतं. गेले तीन दिवस ती या प्रेझेंटेशनची तयारी करत होती. एका हॉस्पिटलचं नवीन युनिट स्प्रिंगफिल्डमध्ये उघडत होतं. निकिता जिथे काम करते त्या फर्मकडे हे प्रोजेक्ट होतं. संकल्पना आणि प्लॅन्स आधीच मंजूर झाले होते. आता सस्टेनेबिलिटी वगैरेवर काम चालू होतं. विस्कॉन्सिनचा क्लायंट होता, त्यामुळे आधी त्या भागातल्या पद्धती, नियम वगैरे अभ्यास करुन त्याप्रमाणे प्रस्ताव द्यावा लागला होता. आजच्या मीटिंगनंतर आता थोडं हलकं वाटत होतं खरं, पण जबरदस्त थकवा आला होता. इतका वेळ बिनखिडक्यांच्या कॉन्फरन्स रूममध्ये असल्यामुळे आतापर्यंत लक्षात आलं नव्हतं, की हलकासा बर्फ पडायला सुरवात झाली होती. ऊबदार रिसेप्शन हॉलमधून बाहेर पाहताना बर्फाचा तो पांढराशुभ्र हलका थर खूप सुंदर दिसत होता. झाडांवर सुद्धा हलका बर्फ जमा होत होता. आज पहाटे उठून क्रिशसाठी सगळं स्नॅक्स, जेवण वगैरे तयार करून डब्यात भरून कोणत्या वेळी काय द्यायचं हे लिहून, लिझला सांगून ठेवलं होतं. लिझला क्रिशच्या ऍलर्जीबद्दल सगळी माहिती होती. ग्लूटन-फ्री आहाराबद्दल पण तिला सगळं माहीत होतं. अगदी आपल्या भारतीय पदार्थातसुद्धा कशात ग्लूटन असेल, कोणत्या पदार्थात ज्याची क्रिशला ऍलर्जी असे त्याला न चालणारे घटक असू शकतील याबाबत सगळी माहिती तिने करून घेतली होती. खरं तर अशी बेबीसीटर मिळणं, तेही पूर्ण दिवसभर ही अगदी अशक्य असलेली गोष्ट होती. निकिताला याबाबतीत आपण भाग्यवान ठरलो याची जाणीव होती. लिझच्या भरोशावरच तिने स्प्रिंगफिल्डला तीन तास गाडी चालवत येऊन प्रेझेंटेशन द्यायचं कबूल केलं होतं. नाहीतर अंकुर फिरतीवर असताना हे शक्यच नव्हतं. तसा तोही आज परत येणार होताच. शिकागोच्या विमानतळावरून घरी यायला ४५ मिनिटे धरले, तरी सातच्या दरम्यान तो घरी येईलच. आपणही साडेसात-आठच्या दरम्यान घरी असूच. खिचडी लावली की झालं. असे आडाखे निकिता मनात मांडत होती. अशा वेळी वाटायचं, क्रिशला ऍलर्जी नसत्या तर बाहेरून काही मागवता आलं असतं. एक काम सोपं झालं असतं.

होता. सकाळी वेदर चॅनलवर सांगितलंच होतं, की एक-दोन इंच बर्फ पडणार आहे. डोळ्यावर झोप येऊ नये म्हणून छान गरम गरम कॉफी घेऊन बाहेर पडावं, म्हणून ती रिसेप्शनजवळच्या कॉफी मशीनजवळ गेली.

काउंटरशेजारीच कॉफी स्टेशन आणि थोडे कपकेक्स, कूकिज, मफिन्स ठेवले होते. घरी क्रिशच्या ऍलर्जीमुळे आणि इतर काही कारणासाठी त्याला ग्लुटेन-फ्री आहार चालू होता त्यामुळे हे असे ग्लुटेन असलेले छान गोड पदार्थ घरी ठेवलेही जात नसत, आणि क्रिशसमोर ते खाताही येत नसत. तसंही हे सगळं खाणं आरोग्यासाठी चांगलं नाहीच म्हणून हे पदार्थ घरी नसायचेच. त्यामुळे निकीचाही आहार ग्लूटेन-फ्री झाला होता.

पण आता ते छान मफिन्स पाहून तिला मोह आवरला नाही. तिने दोन मोठाल्या चॉकलेट-चिप कूकीज आणि एक बनाना मफिन उचलला. प्रचंड भूक लागली असल्याने तिने तो फस्त सुद्धा केला. जाण्यापूर्वी गुगल मॅप्सवर घरचा पत्ता टाकावा म्हणून फोन काढला, तर लिझचे दोन आणि अंकुरचे दोन व्हॉइस मेसेजेस दिसले. तिने आधी लिझचा मेसेज ऐकला. दुपारच्या जेवणानंतर केलेला फोन होता. क्रिशने नीट खाल्लं नाही, एवढं तिला मेसेजवरून कळलं. या अमेरिकन लोकांना खाऊ घालणे म्हणजे फोर्स-फीडिंग वाटतं. त्यामुळे लेकरू फक्त चार-पाच घास खाऊन आहे, असं कळलं. दुसऱ्या मेसेजमध्ये 'क्रिश नेहमीसारखा खेळत नाहीय आणि सारखा सोफ्यावर पडून राहतो आहे' असं लिझ म्हणत होती. हे ऐकल्यावर मात्र तिला काही अजून तिथे थांबवलं नाही. फोनची बॅटरी कमी होत होती. गाडीतच आता अंकुरचे मेसेज ऐकू आणि लिझला पण फोन करू म्हणून तिने भराभर हिवाळ्यासाठीचा अवजड लांब कोट, टोपी वगैरे लवाजमा अंगावर चढवला आणि ती लगेच निघाली.

निकिता त्या निसरड्या बर्फातून जितक्या भरभर चालता येईल तितकं चालत पार्किंग लॉटमधल्या तिच्या कारकडे आली आणि तिच्या लक्षात आलं, की एक ग्लोव्ह कॉन्फरन्स रूममध्येच राहिला. तिच्यासमोरच सगळी आवराआवर करून सगळे जण बाहेर पडले होते. त्यामुळे आता तो गेल्यातच जमा. निकिता नेहमीच इथे तिथे एकेक हातमोजे विसरून येत असे. आता कुठे तिला आईच्या वेंधळेपणामागचं कोडं उमगायला लागलं होतं. बाहेरूनच रिमोटने कार गरम करायला ठेऊन तिने स्नो साफ करायचा ब्रश घेऊन कारच्या समोरच्या आणि बाजूच्या काचांवरचा बर्फ स्वच्छ करायला सुरुवात केली. इथे बाहेर पार्किंग असल्यामुळे काही गत्यंतर नव्हतं. अमेरिकेत ती जेव्हा शिकायला आली होती, ते दिवस तिला आठवले. तेव्हा तर रोज पहाटे कारवर साचलेला मोठा थर स्वच्छ करायला अर्धा तास लागायचा. आज मात्र हलकासाच बर्फ होता, त्यामुळे फार काही वेळ लागला नाही. एकदा हायवेला लागल्यावरच लिझला फोन करावा म्हणून कारमध्ये बसल्या बसल्या आधी तिने फोन चार्जिंगला लावला. एवढा वेळ बाहेर राहिल्याने ज्या हाताचा हातमोजा हरवला होता तो हात अगदीच बधिर झाला होता. त्या हातात कॉफीचा कप घेऊन थोडा वेळ नुसती बसलीच ती. जणू त्या हाताबरोबर दोन क्षण तिचा मेंदूसुद्धा सुन्न झाला होता. दोन क्षण ‘आता पुढे काय? कुठे जायचं? काय करायचं?’ असं काहीसुद्धा मनात डोकावलं नाही तिच्या. जणू काही तिच्या लॅपटॉपसारखा तिचा मेंदूसुद्धा रिस्टार्ट होत होता. सतत अतिविचार करून जीव मेटाकुटीला आणणाऱ्या मेंदूला एक क्षण सक्तीची विश्रांती मिळाली. आणि मग मात्र तिला कधी एकदा हायवेला लागतो असं झालं. हळूहळू बर्फ साचत चालला होता. निघण्यापूर्वी तिने अंकुर आणि लिझला टेक्स्ट केला की 'इथून निघाले आहे, नंतर फोन करेन'. गावातून जाताना तिला बर्फ स्वच्छ करण्यासाठी रस्त्यांवर मिठाचे खडे टाकत फिरणारे बरेचसे ट्रक दिसत होते. अगदी पंधरा मिनिटातच हायवेची एक्झिट आली आणि हायवेला लागताच निकिताने एक निश्वास सोडला.

कॉफीचा एक घोट घेताच तिला थोडं बरं वाटलं. लिझला तिने कारच्या डॅशबोर्डवरून फोन लावला. “हाय लिझ, कसा चालला आहे दिवस?” लिझने थोडक्यात दिवसभर काय काय केलं ते सांगितलं, पण क्रिश फार थकल्यासारखं वाटतोय, असं तिचं मत तिने सांगितलं. “'नॉट लाईक हिम ऍट ऑल. लूक्स लाईक हि इज कमिंग डाऊन विथ समथिंग”. डे-केअरमधून घेऊन आला असणार कसलं तरी इन्फेक्शन. तिने लिझला त्याचा ताप घेऊन औषध द्यायला सांगितलं. “मी पोहोचतेच आहे आठ-साडेआठपर्यंत, अंकुरसुद्धा येईलच” असं सांगून फोन ठेवला. तिच्या मनात चलबिचल झाली. मागच्या वर्षी पूर्ण हिवाळा या ना त्या कारणाने आजारी होता क्रिश. कधी या कानात इन्फेक्शन कधी त्या. न्यूमोनियापर्यंत पोहोचलं होतं इन्फेक्शन. असं आता होऊ नये म्हणजे मिळवली. तिने मनात प्रार्थना केली.
अंकुरचे मेसेज ऐकले तर हवामान खराब असल्यामुळे त्याचं विमान उशिरा निघणार, असा मेसेज होता. आता हा उशिरा घरी पोहोचेल. अंकुरला फोन लावला तर फोन बंद. म्हणजे तो आता विमानात असेल. तिला धाकधूक वाटायला लागली. नेहमीप्रमाणे डोक्यात असंख्य विचार, काळज्या आणि गुंते सुरू झाले. ती एकटीच, अंधार पडलेला, बर्फ सतत पडतच होता. इतका वेळ दबा धरून असलेल्या अपराधी भावनेने उचल खाल्ली. क्रिश अगदी दोन अडीच महिन्याचा असतानाच पुन्हा पार्ट-टाइम काम सुरू केलं होतं तिने. तेव्हापासून नेहमीच असं अपराधी वाटायचं. त्यावेळी आई होती म्हणून करता आलं. व्हिसाची मुदत संपल्यावर ती गेल्यानंतर अंकुर आणि तिने कामाच्या वेळा वाटून घेतल्या. नंतरचं वर्ष पॅनडेमिकचं. त्यामुळे खरं तर बरंच झालं असं वाटलं तिला. दोघांनाही घरून काम करता आलं. क्रिशकडे लक्ष देता आलं. त्यांनतर वर्षभरातच अंकुर कामावर परतला. आणि निकिताला कधी घरून, कधी ऑनसाईट असं काम करावं लागलं. पण हे सगळं जमवून आणता आणता तिचा जीव मेटाकुटीला येत असे. त्यात क्रिशच्या जन्मापासून काही गोष्टीचे कॉम्पलिकेशन्स होत राहिले. बऱ्याच गोष्टींची ऍलर्जी निघाली. लिझसारखी बेबीसीटर आणि एक चांगलं डे-केअर सेंटर याच्या भरोशावर तिला राहावं लागे. एक तर क्रिशला वेळ देता येत नसे आणि त्यातही सगळा स्वयंपाक अगदी संपूर्णपणे अथपासून इतिपर्यंत घरीच करावा लागे. क्रिश थोडा बुजराच होता. पण पझल्स खेळायला भरपूर आवडायचं त्याला. त्यातच रमत असायचा तो. तिला वाटून जायचं हे स्टुडन्ट लोन नसतं डोक्यावर, तर काही काळ सगळं सोडून घरी त्याला वेळ देता आला असता. कधी कधी वाटायचं घ्यावाच ब्रेक. अंकुरकडून उसने घ्यावे पैसे आणि मग नंतर फेडावे. मग काही वर्षांनी पुन्हा काम करता येईल. पण नवरा असला तरी त्याच्याकडून पैसे घ्यायला तिला नको वाटे. आणि तिने तिच्या कितीतरी सिनियर मैत्रिणी बघितल्या होत्या ज्या ब्रेक घेऊन घरी राहिल्या तर तंत्रज्ञान इतकं पुढे निघून गेलं आणि या मागेच राहिल्या. तसं होईल याची तिला जाम भीती वाटत होती.

अगदी काळजीपूर्वक गाडी चालवत होती निकिता. बर्फामुळे कुठे कुठे रस्ता निसरडा वाटत होतं. तिने फोनमध्ये पाहिलं, तर बर्फाचा जोर वाढत आहे याची नोटिफिकेशन्स येत होती. तिने रेडियोवर वेदर चॅनल लावलं. त्यावर 'हाय-अलर्ट' सांगत होते. 'होता होईल तो प्रवास करू नये, आहे तिथे मुक्काम करावा' असं हवामान खातं बजावत होतं. एकतर क्रिश घरी बेबीसीटरजवळ असताना तिला काही कुठे मुक्कामासाठी थांबावं असं वाटलं नाही. आणि आता थांबणार तरी कुठे? वस्ती सोडून हायवेला लागून एक तास गेला होता.

आता रस्त्यात काही ट्रॅव्हल प्लाझा फक्त लागतील किंवा एखादं गॅस स्टेशन, मॅकडोनाल्ड वगैरे. बाकी मध्ये काहीच वस्ती नाही. मागे वळायचं म्हटलं तर तेवढ्याच वेळात अर्ध्याहून जास्त अंतर कापलं जाईल सरळ जात राहीलं तर. तेवढ्यात लिझचा फोन आला. क्रिशला ताप होताच. तिने त्याला औषध देऊन झोपवलं होतं. तिला अंकुर उशिरा येऊ शकतो हे निकिताने सांगितलं. निकिता काही म्हणणार तेवढ्यात लिझ म्हणाली, “तू ज्या भागातून ड्राइव्ह करते आहेस त्या भागात वेदर काही चांगलं दिसत नाही. टीव्हीवर सांगताहेत. बी केअरफुल अँड डोन्ट वरी अबाऊट क्रिश.” समजूतदारपणे तिने “तुला अजून किती वेळ लागेल?” असं विचारलं नाही. पण निकिताने तिला आश्वासन दिलं. उशीर झाला तरी कुठेही न थांबता मी घरी येईन, असं. खरं तर घरात कुठलाही ग्लूटनचा पदार्थ आणायचा नाही असा नियम केला होता त्यांनी. पण तरीही निकिताने तिला म्हटलं, “पिझ्झा मागवून घेतेस का? मला उशीर होऊ शकतो.” पण त्यावर लिझचं पुन्हा समजूतदार उत्तर. “तू काळजी करू नकोस. मी खाण्याचं बरोबर घेऊन आले आहे.” तिथल्या कॉलेजमध्ये संगीत विषय घेऊन शिक्षण घेत होती लिझ. असेल १९ वर्षांची पण तिचा समजूतदारपणा, तिच्या प्रोफेशनॅलिझमचं निकिताला खूप कौतुक होतं. ‘नाहीतर आपण किती अल्लड होतो तिच्या वयाचे असताना!’ असं निकिताला वाटून गेलं. ‘आता दोन एक वर्षात ही शिक्षण संपवून दुसरीकडे गेली, तर कठीणच होईल.’ हा विचार मनात आला आणि निकिताने एक मोठ्ठा निश्वास सोडला

आर्किटेक्चर कॉलेजचे दिवस आठवले, तेव्हा सगळ्या ग्रुपची आणि खास करून रूपालीची आठवण झालीच. फील्ड-ट्रिप्स, जागरण करून केलेलं सबमिशन, त्यावेळी केलेले प्रोजेक्ट्स सगळंच आठवलं निकिताला. नकळत तिच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली. रूपालीशी असलेली तिची मैत्री बऱ्यापैकी स्पर्धात्मक स्वरूपाची होती. दोघींमध्ये दुसरीपेक्षा आपलं डिझाईन चांगलं झालं पाहिजे, चांगले मार्क मिळाले पाहिजेत अशी अदृश्य स्पर्धा असायची. अर्थात ती सकारात्मकच राहिली, कधी एकमेकींवर कुरघोडी झाली नाही. पोस्ट-ग्रॅज्युएशन करण्यासाठी ती परदेशी आली, आणि रूपालीने अहमदाबादच्या अगदी नामांकित कॉलेज मधून पोस्ट-ग्रॅज्युएशन केलं. त्यावेळी निकिताच जिंकली असं काहीसं वाटलं होतं खरं रूपालीला, आणि खरं सांगायचं तर निकितालाही. तिला परदेशी स्कॉलरशिप मिळाली, तरी बाकीची फी आणि राहण्याचा खर्च होताच. मग कॅम्पसवर काम करत, स्टुडन्ट लोन काढून वगैरे जमवलं तिनं. काय झपाटल्यासारखं काम केलं होतं तिनं त्या काळात. तिला वाटलं होतं एकदा जॉब लागला की मस्त, काही काळज्या नाहीत. तिने आपला डेझर्टेशनचा प्रकल्प अगदीच मनापासून केला होता. कष्टाचं चीज झालं, आणि एका नामांकित फर्ममध्ये नोकरी पण मिळाली. रूपालीशी कधीमधी फोनवरच बोलणं व्हायचं तिचं. मागच्या वर्षी आईला भेटायला भारतात गेली होती ती, तर रूपालीच्या घरी आग्रहाचं आमंत्रण आलं.

तिचंही बस्तान मस्त बसलं होतं. घरी सगळ्या कामाला नोकरचाकर, मुलाला सांभाळायला बाई, मनात येईल तेव्हा आई बाबांकडे जायचं, न्यायला गाडी, आणि निकिताला वाटलं, ‘जिंकली रूपालीच खरं तर. ना इथे घरच्यांचा आधार मिळतो आहे, ना घरकामाला नोकर. तडतडत सगळं आपणच करा.' अगदी दमायला व्हायचं निकिताला. आणि या सगळ्या धकाधकीत क्रिशकडे दुर्लक्ष होतंय याचा अपराधीपणा. अंकुरला असा अपराधीपणा नाही वाटत?

तेवढ्यात तिची कार थोडी सरकल्यासारखी झाली. निकिता अगदी दचकून भानावर आली. आणि काही कळायच्या आत तिची कार लेनमधून बाहेर घसरत जायला लागली. बर्फावरून घसरत घसरत गाडी शोल्डरवर, चार लेन संपल्यावर जी जागा असते त्यावर चालली होती. शोल्डरनंतर खड्डाच. निकिताने जिवाच्या आकांताने ब्रेक पंप करायला सुरुवात केली आणि कारचं ते अनियंत्रित घसरणं आटोक्यात आलं. कार शोल्डरवर कशीबशी थांबली. बर्फाचा जोर खूप वाढला होता. समोरचा रस्ता अगदी काही फुटांवरच दिसत होता. ती बराच वेळ कारमध्येच, शोल्डरवरच सुन्नपणे थांबून राहिली. तिने दोन्ही हाताने स्टिअरिंग व्हीलला गच्च धरून ठेवले होते आणि ती अक्षरश थरथरत होती. तिच्या शेजारच्या लेनमधून एकदोन गाड्या हळूहळू गेल्या. हृदय वेगाने अजूनही धडधडतच होतं. असा किती वेळ गेला कोणास ठाऊक, पण अंकुरचा फोन आला आणि ती थोडी सावरली. तिने फोन घेतला. तिचा आवाज ऐकूनच त्याला कल्पना आली की कार बर्फावरून सटकली असणार. मग त्याने अगदी शांतपणे तिला धीर दिला आणि पुन्हा रस्त्याला लागायला सांगितले. “पुढच्या ट्रॅव्हल प्लाझापर्यंत तरी घेऊन जा गाडी. अगदी हळूहळू चालव” अंकुरने धीर देत सल्ला दिला. अंकुर आत्ताच विमानतळावरून कॅब करून घरी निघाला होता. त्याने लिझला फोन करून सांगितलंही होतं. ‘चला आता अंकुर तरी घरी पोचणार’ म्हणून ती थोडी निर्धास्त झाली. अर्ध्या संपलेल्या कॉफीचा तिने एक घोट घेतला. त्या जवळपास थंड झालेल्या कॉफीने सुद्धा तिला बरं वाटलं. तिने मग कॉफी बरोबर घेतलेल्या मोठ्या चॉकोलेट-चिप कूकीज संपवल्या. चॉकलेट म्हणजे तिचा अगदी वीक पॉईंट आणि कम्फर्ट-फूडसुद्धा. काही टेन्शन असलं, की चॉकलेट्स खायची सवय लागली होती तिला. तिच्या कपाटात एखादा तरी चॉकलेट बार असायचाच. रिअर-व्ह्यू मिररमध्ये पाहत पाहत हळूहळू तिने कार रस्त्यावर लेनमध्ये घातली. सहसा हायवेवर बर्फ साचू देत नाहीत, लगेच ट्रक आणि स्नो प्लॉवचा ताफा येऊन बर्फ साफ करत राहतो. पण या काही मैलांच्या पट्ट्यावर मात्र बऱ्यापैकी बर्फ साचला होता.

वाऱ्याचाही जोर खूपच वाढला होता. नुसता बर्फ कितीही जोराचा होत असेल, तरी वारा नसेल तर शांतच वाटतो. अगदी अलगदपणेच स्नो-फ्लेक्स जमिनीवर उतरतात. पावसासारखा मारा नाही. पण वारा असेल तर, स्नो स्टॉर्म असेल तर कठीणच. आता स्नो स्टॉर्ममधून सुरक्षितपणे गाडी जवळच्या गॅस स्टेशन किंवा प्लाझापर्यंत न्यायलाच हवी होती. बर्फ नसेल तर एरवी जिथे ताशी ७५ मैलाच्या वेगाने गाड्या पळवाव्या लागतात, त्याच रस्त्यावर आता ती हळू हळू ताशी २०-२५ मैलाच्या वेगाने अगदी सावधानतेने कार चालवत राहिली. कितीतरी वेळ असं एकाग्रतेने गाडी चालवत असताना अगदी प्रचंड ताण येत होता, डोळ्यांवरही आणि मनावरही. कधी कधी तर नकळत डोळे लागतात की काय या भीतीने ती स्वतःला जागं ठेवू बघत होती. मोठमोठ्याने गाणी म्हणण्याचा पण कंटाळा आला. मग तिने काही स्तोत्र म्हटली, एमिली डिकिन्सनच्या कविता आठवून म्हणून पहिल्या. शेवटी नकळत हनुमान चालिसाच आलं तोंडात. आणि त्याबरोबर तिला रश्मीची आठवण झाली. दिल्लीहून चांगली टाऊन प्लॅनिंगची पदवी घेऊन आली होती. लग्नानंतर ज्या नेबरहुडमध्ये निकिता राहायला गेली तिथेच रश्मी काही वर्षांपासून होती.

पुढे रश्मीची आणि निकिताची गट्टी जमली. कितीतरी वर्ष तिच्या या शिक्षणाबद्दल निकीला काही माहीतच नव्हतं. त्यांच्यात स्वयंपाक, मुलांचे प्रश्न, फॅशन, सिनेमा आणि इतरही बऱ्याच विषयांवर गप्पा होत. एकदा तिला पार्टीसाठी मदत करत असताना तिचा थिसिस बॉक्समध्ये सापडला. तिला त्याबद्दल विचारलं तर म्हणे, ‘क्या बताना? ...अभी तो लगता भी नहीं की ये इस जनम की बात है.’ मग बराच वेळ तिचा थिसिस, तिच्यानुसार तिच्या 'मागच्या जन्मातले स्वप्न' यावर ती बोलत राहिली. तिला एक मुलगा आणि त्यानंतर जुळ्या मुली झाल्या होत्या आणि मग थोडा ब्रेक घेऊ म्हणून तिने जो ब्रेक घेतला तो घेतलाच.

पाच सहा वर्षांतच बऱ्याच गोष्टी बदलल्या, नवीन तंत्रज्ञान आलं, नवीन संशोधन झाले, नियम बदलले, काळ अतिशय वेगाने पुढे निघून गेला. आणि पुन्हा त्या वाहत्या काळात आपली थांबलेली गाडी पुन्हा घुसवण्याची काही रश्मीची हिम्मत झाली नाही, एकदोनदा प्रयत्न करून सुद्धा. 'मगाशी आपण गाडी घसरून शोल्डरवर थांबलो ना, तसंच काहीसं झालं तिचं.' निकिताला वाटून गेलं. कितीतरी जणींचं असं झालेलं मग तिच्या नजरेत येत राहिलं. रश्मीचे अनुभवाचे बोल मात्र निकिताच्या मनात कायमचे कोरले गेले. “छोड मत देना अपना करियर. ब्रेक मत लेना.” आणि यामुळेच निकिता जिवाचा आटापिटा करून काम करतच राहिली.

बर्फ आता थोडा विरळ व्हायला लागला. पण समोरच्या गाड्या आता अतिशय संथ गतीने जात होत्या. काही काळाने तर ट्रॅफिक जामच झाला. पण घाई असूनही अगदी मुंगीच्या गतीने जात असलं तरी तिला बरं वाटलं. एवढ्या मोठ्या रस्त्यावर एकटीने जाण्यापेक्षा असं सगळ्यांबरोबर जाणं जास्त चांगलं वाटलं. धीर देणारं वाटलं. मग अगदी संथ गतीने का होईना, ब्रेकवर आणि स्टिअरिंग व्हीलवरची पकड अजून घट्ट करत ती कार चालवत राहिली. ब्रेकवरचा पाय तर अगदी रग लागून दुखायला लागला होता.

भारतातली पाच वर्षाची मेहनत, इथे येऊन केलेली चार वर्षाची अंगमोड मेहनत, अगणित तास, इतकी वर्षं, इतके पैसे, ज्याकारणी लागले ते असं सहजासहजी सोडून द्यायचं? आजी म्हणते त्याप्रमाणे प्रत्येक पिढी स्वकष्टाने एक एक पाऊल मागच्या पिढीपेक्षा पुढे टाकत असते. आजी चांगली शिकली होती, पण तिने नोकरी केली नाही. घरचा व्यवहार, शेती मात्र अगदी उत्तम सांभाळली आणि मुलींना छान शिकवले. आईने त्याच्यापुढे एक पाऊल टाकलं. एम.ए, एम.फिल करून प्राध्यपिका झाली आणि निकिताला वाटत होतं, की तिने त्याहून पुढे जाऊन व्यावसायिक शिक्षण घेतलं, देशाबाहेर पाऊल टाकलं, एक पाऊल पुढेच आली आईपेक्षा. पण खरंच तसं झालं का? आजूबाजूची परिस्थिती बदलली, पण मनातले प्रश्न तेच राहिले. तिच्या आईचं आयुष्य आणि तिचं आयुष्य यात थोडे स्थळकाळाचे बदल सोडता साम्यच जास्त आहे, नाही का? तिची आई पहाटे तयारी करून, डबे करून, बसने कॉलेजला जात असे. वरून मुलांचं आपण नीट करतो आहे की नाही?’ असे विचार, अपराधीपणा तिनेही मनात बाळगला असेलच. दिवसभराच्या धकाधकीनंतर पुन्हा घरी येऊन तीही मुलांचे अभ्यास घेत, घरची कामे करत असे. तिला असलेली आपल्या जबाबदारीची स्वच्छ जाणीव आणि अपराधीपणाची भावना जणू काही वारशानेच निकिताकडे आली होती. 'मी तरी वेगळं काय करते आहे?' निकिताला वाटलं. पिढ्या बदलल्या, त्यांच्या समस्या बदलल्या, तरी ही एक समस्या तशीच कायम राहणार आहे. की ही समस्या नाहीच आहे? बाहेरची परिस्थिती आणि माणसं बदलली तरी ते काही बदललेलं नाहीये... अगदी अपराधीपणासकट.

तिला पुन्हा एकदा क्रिशची प्रचंड आठवण आली. तिने लिझला फोन लावला. त्यावर लिझचा थकलेला आवाज आला. “हाय निकी, क्रिशचे डॅड आले म्हणून मी घरी निघाले आहे. क्रिश उठला होता. पुन्हा ताप घेतला तर १०२ आहे. उद्या बहुतेक त्याला काही डे-केअरला जाता येणार नाही तापामुळे. माझे क्लासेस आहेत, नाहीतर मी आले असते.” लिझने दिलगिरी व्यक्त केली. निकिताला आठवलं, काल क्रिश तसाच आपल्या आपण खेळत राहिला होता. ती प्रेझेंटेशनमध्ये व्यस्त, त्यामुळे फक्त त्याच्याजवळ बसून काम करत राहिली होती. अशा कितीतरी वेळा काय करणं आवश्यक आहे, यापेक्षा उद्या कुठली कामं आली आहेत, याकडेच तिला लक्ष द्यावं लागत होतं... कितीतरी वेळ तिचं मन कधी या बाजूने तर कधी त्या बाजूने झोके खात होतं.

कधी वाटे नोकरी करणं प्रचंड आवश्यक आहे, नाही तर आपण स्पर्धेतून बाहेर फेकल्या जाऊ, कधी वाटे काय अर्थ आहे या सगळ्याला जर लेकराशी खेळता येत नसेल? त्याला वेळ देता येत नसेल? इतक्या दिवसांचा थकवा असेल, कोसळणाऱ्या बर्फाची रात्र असेल किंवा पोटात ओरडत असलेले कावळे असतील, निकिताचं मन कधी तळ्यात कधी मळ्यात असं करत होतं. कधी स्वतःला दोषी ठरवत होतं तर कधी स्वतःचा बचाव करत होतं.

तिला असं वाटलं, की आपण कितीतरी काळापासून असंच भयाण रात्रीतून जिवाच्या आकांताने मार्ग काढत आहोत. तिला प्रचंड थकवा आला होता. एवढ्यात समोर ट्रॅव्हल प्लाझा दिसला आणि तिला हायसं वाटलं. इथे खायला सुद्धा होतं. तिने एक बर्गर आणि कॉफी घेतली. अंकुरला फोन लावावा असं वाटून गेलं, पण आता फक्त शांत बसावं असं वाटत होतं तिला. हळूहळू मनाचा गुंता सुटत गेला आणि तिला जाणवलं, हे तिचं आयुष्य आहे. तिच्या विचारांना, भावनेला इथे महत्व आहे. तिला निर्णय घेण्याची मुभा आहे आणि स्वातंत्र्यसुद्धा आहे. तिचा कुठलाही निर्णय भविष्यातल्या भीतीमुळे किंवा कुठल्या एका विचारसरणीच्या प्रभावाखाली येऊन ती घेऊ शकत नाही. तिचं आयुष्य तिचं स्वतःचं आहे आणि ते तसंच जिवंत आणि वाहणारं राहू द्यावं. निर्णय चुकतीलही, पण ते आपले असतील. आताच नाही का या बर्फाळ वादळात ती सापडली? ...तिथून तिनेच तर गाडी चालवत बाहेर काढलं होतं स्वतःला. तसंच आहे आयुष्याचं पण. जेव्हा अगदीच कठीण होतं, तेव्हा कधी थांबून, स्वतःच स्वतःला बळ देऊन आपल्या आपणच बाहेर काढावं लागतं परिस्थितीतून. अर्थातच अंकुर होता धीर द्यायला, लिझ होती क्रिशला सांभाळायला पण शेवटी ही वाट तिची तिलाच काढावी लागणार. बरोबर किंवा चूक असा काही निर्णय नसतोच कधी, पण जो निर्णय घेऊ त्याचे काही ना काही परिणाम असणारच, ते मात्र आपल्याला पेलता यायला पाहिजे. तेवढं एक करता आलं की झालं. आणि तिचं मन अगदी स्वच्छ झालं. जणू कित्येक दिवसाचं साचलेलं मळभ हलकेच दूर व्हावं.

तेवढ्यात समोर सुरू असलेल्या टीव्हीवरून 'सिव्हिअर वेदर वॉर्निंग' संपली असं जाहीर केलं गेलं. कुणीतरी म्हणालं, “पुढच्या रस्त्यावरचा बर्फ साफ झालेला आहे. आता काही धोका नाही.” तिने शांतपणे आपली कॉफी संपवली.

तिच्या मनातलं वादळही आता शमलं होतं आणि तिचा निर्णयही पक्का झाला होता. तो कधी अंकुरला सांगतो असं तिला झालं आणि ती अगदी उत्साहाने घरी जाण्यासाठी निघाली. तिच्याच पावलातली लगबग आणि उत्साह तिला जाणवला.

श्रद्धा भट

('रेऊ' कथास्पर्धेत पारितोषिकप्राप्त कथा
'मिळून साऱ्याजणी' या मासिकात पूर्वप्रकाशित.)

भूत आणि रिपोर्टर

लेखक :तारापद राय

(तारापद राय (१९३६-२००७) हे बंगालीतील प्रख्यात कवी, कथाकार व निबंधकार म्हणून ओळखले जातात.उपहासात्मक विनोद हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य आहे. ते या कथेमध्येही दिसते .

अनुवादक विलास गिते हे साहित्य अकादमीचा राष्ट्रीय अनुवाद पुरस्कार विजेते अनुवादक आहेत. त्यांनी बंगालीतून मराठीत अनुवाद केलेली तीसपेक्षा अधिक पुस्तके आजवर प्रकाशित झालेली आहेत.)

कथेचं नाव वाचून कोणीही मला भूतद्वेष्टा समजू नये. भूतद्वेष्टा होण्यासाठी जे साहस लागतं, जी छाती लागते, ती माझी नाही आणि कधीही नव्हती.

तरीही एक प्रश्न उरतोच. जर माझं भुताशी वैर नसेल, जर मी भूतद्वेष्टा नसेन, तर भुतासारख्या एका प्राचीन जिवाला मी का बरं अशा संकटात टाकीन? कशाला मी भुताला रिपोर्टरसमोर उभं करीन?

खरं सांगायचं, तर मी काही भुताला रिपोर्टरच्या समोर उभं केलं नाही. रिपोर्टरनेच त्याला शोधून काढलं. एका दैनिकाच्या संपादकाने रिपोर्टरला दुष्काळाचं रिपोर्टिंग करण्यासाठी दुष्काळग्रस्त भागात पाठवलं होतं. त्या दुष्काळी भागाचं वास्तवदर्शी रिपोर्टिंग पाठवण्यासाठी त्याला सांगितलं होतं. पण रिपोर्टर काही योग्य वेळी योग्य ठिकाणी पोहोचू शकला नाही. तो दुष्काळी भागात पोचण्याआधीच मुसळधार पाऊस सुरू झाला. तिथल्या नदीला पूर आला, आणि तिथला सगळा भाग पुराच्या पाण्याखाली गेला. दुष्काळाचं रिपोर्टिंग करण्याऐवजी आता महापुराचं रिपोर्टिंग केलेलं संपादकाला आवडेल, की नाही असा विचार करून रिपोर्टर संपादकाला फोन करण्यासाठी गेला, पण या महापुरामुळे फोन व्यवस्था बंद पडलेली होती .

रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मजवळ, एका पडक्या खोलीत रिपोर्टर अडकून पडला. योग्य वेळी इथे पोचता आलं असतं, तर रिपोर्टर अशा संकटात सापडला नसता. पण इथे त्याला यायला मार्गातच चार दिवस उशीर झाला .

मार्गात एका ठिकाणी रेल रोको सुरू होता. कुठेतरी सामूहिक अत्याचाराची घटना घडली, म्हणून त्या आंदोलनकर्त्यांनी दीड दिवस रेल्वेमार्ग अडवून ठेवला होता. शेवटी जंक्शन स्टेशनहून रेल्वेचे एक मोठे साहेब आले, आणि त्यांनी असे अत्याचार होणार नाहीत असं आश्वासन दिलं, आंदोलनकर्त्यांची हात जोडून क्षमा मागितली. तेव्हा त्यांनी रेल रोको आंदोलन मागे घेतलं. पण दरम्यान एकंदर परिस्थिती धोकादायक वाटल्याने रेल्वेचा ड्रायव्हर, फायरमन आणि गार्ड हे सगळेच पळून गेले होते. त्यांना शोधून परत आणण्यामध्ये आणखी दीड दिवस गेला .

त्यातच दुसऱ्या दिवसापासून मुसळधार पाऊस सुरू झाला. पाऊस हेसुद्धा आंदोलन मागे घेण्यामागचं एक कारण होतं. अखेर शेवटी पाण्यामधून जेव्हा रेल्वेगाडी दुष्काळग्रस्त भागात येऊन पोहोचली, तेव्हा सरकारने तो भाग पूरग्रस्त भाग म्हणून जाहीर केला होता.

आता इतका तपशील भूतकथेमध्ये योग्य नाही, पण गोष्ट छोटी आणि जुनी आहे- त्यामुळे पार्श्वभूमी तयार करण्यासाठी प्रस्तावना जरा मोठी करावी लागली .

फोन बंद पडलेले, टेलिग्रामचे खांब जोराच्या वादळी पावसामुळे उखडून पडलेले, ट्रेन काही येत नाही, रिलीफच्या नावा अद्याप येऊन पोहोचलेल्या नाहीत.

प्लॅटफॉर्मच्या एका बाजूला असलेल्या पडक्या खोलीत रिपोर्टरने आश्रय घेतला होता. साधारणतः रेल्वे प्लॅटफॉर्म पाण्यात बुडत नाहीत, पण स्टेशनमास्टर म्हणाले, की दोन वर्षांपूर्वी अशा पावसात प्लॅटफॉर्म पाण्याखाली गेले होते . विशेषत: दुष्काळानंतर पूर आला, तर तो खूप त्रासदायक आणि घातक असतो.

प्लॅटफॉर्मजवळची ती पडकी खोली रिपोर्टरने एका माणसाकडून साफसूफ करून घेतली होती, पण तिथे पहिल्याच रात्री तो संकटात सापडला.

चार दिवसांच्या थकव्यानंतर जमिनीवर चादर अंथरून, पोर्टफोलिओ बॅग उशाखाली घेऊन संध्याकाळी रिपोर्टर झोपी गेला होता.

एका तासानंतर 'खस् खस्' अशा कुठल्यातरी आवाजाने त्याची झोप मोडली. झोप मोडल्याबरोबर त्याला जाणवलं, की पडक्या खोलीमध्ये काहीतरी फिरतं आहे.

डोळ्यांना अंधारात पाहण्याची सवय झाल्यावर रिपोर्टरला दिसलं, की पडक्या खोलीच्या दाराजवळ जीर्णशीर्ण असं काहीतरी सावलीसारखं फिरतं आहे. रिपोर्टरने घसा खाकरून विचारलं, “कोऽऽण?”

त्या आकृतीने उलट प्रश्न केला, “तुम्ही कोण?” खूप अनुनासिक आवाज.

रिपोर्टरच्या लक्षात आलं, की आपल्या खोलीत भूत घुसलं आहे. त्याने विचारलं, “तुम्ही भूत आहात ना?”

भूत म्हणालं, “हो , मी भूत आहे. मी या खोलीत राहतो. तुम्ही का माझ्या खोलीत घुसलात?”

रिपोर्टरला आठवलं, की काही लोकांनी त्याला या खोलीत राहू नका असं सांगितलं होतं - ते बहुधा याच कारणामुळे.

पण या मुद्द्यावर आता चिंता करून फायदा नाही. त्यापेक्षा आता संधी मिळालीच आहे, तर चला, आपण भुताची मुलाखत घेऊ या, असा विचार रिपोर्टरने केला. भुतांसारख्या माणसांच्या मुलाखती तर आपण अनेकदा घेतल्या आहेत, पण साक्षात एका जिवंत भुताची मुलाखत घेतली, तर पत्रकारितेच्या क्षेत्रात मस्तपैकी खळबळ माजेल आणि पत्रकारितेतमध्ये हा एक लँडमार्क तयार होईल असं त्याला वाटलं .

रिपोर्टरने भुताला आधी स्वतःचा परिचय सांगितला. मग म्हणाला , “हे पहा, मी एक रिपोर्टर आहे .मला तुमची मुलाखत घ्यायची आहे” 'रिपोर्टर' आणि 'मुलाखत' हे दोन शब्द ऐकून भूत थरथर कापू लागलं आणि हात जोडून म्हणालं, “मी ही खोली सोडून देतो. तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणे इथे राहा. उगाच माझ्याबद्दल काही लिहू नका.”

रिपोर्टर म्हणाला , “अहो, यात घाबरण्यासारखं काही नाही. मला तर तुमचं नावही ठाऊक नाही. त्यात तुमचा फोटोही काढता येणार नाही. तरी तुमच्याशी बोललो असं कुणाला उमगणार नाही आणि समजणारही नाही. मी लिहीन,'ओळख गुप्त राखण्याच्या अटीवर एका भुताने ही मुलाखत दिली आहे.' मग तर झालं?”

यावरही भूत काचकूच करीत आहे, हे पाहून रिपोर्टर म्हणाला, “अर्थात मी रिपोर्टमध्ये 'विश्वसनीय सूत्रांकडून' असं लिहून, तुमचं नाव- गाव गुप्त ठेवू शकतो.”

भुताला काय समजलं कोण जाणे. ते म्हणालं, “आता तुमच्या हाती सापडलोच आहे, तर यातून काही मुक्ती नाही. असो !जे नशिबी असेल ते होईल! तुम्हाला काय विचारायचंय ते विचारा”

तोपर्यंत रिपोर्टरने आपली पोर्टफोलिओ बॅग उघडून पेन आणि वही बाहेर काढली होती. रिपोर्टरने एक सिगारेट पेटवून, पहिला झुरका घेऊन विचारलं, “आधी सांगा, तुम्ही भूत कसे काय झालात?”

या प्रश्नाचं भुताने एक आश्चर्यकारक उत्तर दिलं. ते म्हणालं, “मी बहुदा चुकून भूत झालो असं वाटतंय मला!”

सिगारेटची राख झटकून रिपोर्टर म्हणाला , “चुकून भूत झालात? आता 'चुकून भूत होणे' हा काय प्रकार असतो?”

भूत म्हणालं, “ ती फार दु:खाची गोष्ट आहे. बायकोचा अत्याचार असह्य झाल्याने संसाराबद्दलची माझी गोडीच संपली. त्यामुळे आत्महत्या करण्यासाठी मी चार दिवस आधीच या स्टेशनपासून एक किलोमीटर अंतरावर एका निर्जन मैदानात रेल्वेलाईनवर मान ठेवून झोपलो होतो.”

“पण चार दिवसांपूर्वी तर इतर रेल रोको आंदोलन चालू होतं!”

“ते मला कसं काय ठाऊक असणार ?एक दिवस गेला, दुसरा उलटला, तिसराही उलटला! रेल्वे काही आली नाही. मुसळधार पाऊस मात्र आला- अगदी ढगफुटीसारखा! पावसाच्या माऱ्याने आणि भुकेने व्याकुळ झाल्यामुळे मी मेलो. पण अशा प्रकारे मेल्यानंतर तर काही कोणी भूत होत नाही. अनैसर्गिक मृत्यू किंवा नैसर्गिक मृत्यू किंवा अपमृत्यू झाल्याशिवाय तर काही भूत होता येत नाही. माझ्या मृत्यूसारखे सामान्य मृत्यू, उपासमारीने मृत्यू तर या देशात सतत होतच असतात !ती सगळी माणसं काय भुतं थोडीच होतात?”

भुताचा हा प्रश्न ऐकून रिपोर्टरच्या मनात एक वेगळाच संशय आला. कारण खोलीत आता चंद्रप्रकाश आला होता. चंद्रप्रकाशात भुताची सावलीही दिसत होती. अशी गोष्ट अशक्य असते. रिपोर्टर भुताला म्हणाला, “तुम्ही खरंच भूत आहात का? तुमच्या हाताने मला स्पर्श करा बघू!”

भूत म्हणालं , “इतक्या लांब अंतरावरून मी तुम्हाला कसा काय स्पर्श करू?”

रिपोर्टर म्हणाला, “याचा अर्थ तुम्ही भूत नाही! भुतांना आपला हात कितीही लांबपर्यंत ताणता येतो.”

भुतानं यानंतर खूप विचार केला. मग ते म्हणालं , “हो. तसं होऊ शकतं. माझं अद्याप भूत झालेलं नसावं. पाऊस कोसळायला लागल्यावर रेल्वे रुळावरून उठून मी इथे आलो. चार दिवसांपासून पोटात अन्नाचा कण नाही. वाटलं, की आपण मरून भूत झालो आहोत!”

रिपोर्टरने आपली पोर्टफोलिओ बॅग उघडून त्यातून चिवड्याचं एक पाचशे ग्रॅमचं पाकीट आणि एक लाडू काढून एका कागदाच्या पुडीमध्ये ते पदार्थ भुताला खायला दिले.

खाणं झाल्यानंतर दोघांमध्ये खूप गप्पा झाल्या.

दोन दिवसानंतर कोलकात्याला परत जाऊन रिपोर्टरने आपण लिहिलेला वृत्तान्त संपादकाकडे दिला- 'पूरग्रस्त भागातील भुकेल्या माणसाचे आत्मकथन'.

इतका मर्मस्पर्शी वृत्तान्त बराच काळ कुठल्याही वृत्तपत्रात प्रकाशित झाला नव्हता.

अनुवाद: विलास गिते

काळं पांढरं रान माझं

आयुष्यात किती जरी उलथापालथ झाली, होत्याचे नव्हते झाले आणि डोंगर कोसळले एकामागून एकेक, तरी देखील करायचे ते थोडेच चुकते. पूर्वेला तांबडं फुटलं, की दिवस सुरू होतोच, आपोआप यंत्रवत हालचाली होतात. एकेकाचा निपटारा सहज होतो, तेव्हा त्यात कुठे मन असतेच असे नाही. गेले ते दिवस केव्हाच मागे मागे. उरली फक्त कृत्रिमता, कामे उरकणे, दिवस घालवणे इतकेच. मरगळ आलेलं आयुष्य वाकलेल्या कंबरेवर कसं पेललं जाणार? ढकलगाडी झालेली आयुष्याची, ती देखील ढकलावी लागतेच ना? तसंच झालं सरलाबाईंचे. देवावरचा विश्वास उडाला, तरी पुन्हा त्याच्याच समोर बसून बडबड करायच्या, देवाला दूषणं देत एकीकडे पाणी ओतायच्या ताम्हणात. चला, झाली पूजा, उरकलं एक काम, काय तो तरी करतो माझ्यासाठी? हाच प्रश्न घेऊन नमस्कार करून उठायच्या. जणू देवाला नमस्कार ही एक प्रतिक्षिप्त क्रिया त्यांच्या देहाची. भोगच असे भोगले, की असे का? हा अनुत्तरित प्रश्न डोक्यात घुमायचा. आजही तसंच झालं. झाली होती पूजा. गंधाक्षता, हळदीकुंकू फुलं वाहताना तोंडात कधी स्तोत्र तर कधी प्रश्न. हे रोजचेच झाले तसेच आत्ता. आजही सरलाबाई व्यंकटेश स्तोत्र म्हणत आहेत अगदी दररोज सारखे.

"उडदामाजी काळेगोरे, काय निवडावे निवडणारे". काळेगोरे निवडणारे .....पुढे काय? हे काय चकाकलं? ऊन परावर्तित होऊन देवावर? चक्क आत्ता, या बाजूने? कुठून आलं ऊन? हा कोणाचा पराक्रम! बाप्पा प्रसन्न झाला काय? छे, तू काय मला प्रसन्न होणार? माझं कुठलं नशीब असलं? कोण रे तिकडे?"

"काय निवडावे निवडणारे..पुढे निवडणारे, दररोज म्हणते ना मी हेच स्तोत्र, मग आज काय झालं? देवा काय रे, तुला आता ऐकायचा नाही की काय माझा आवाज? शिव शिव शिव. व्यंकटेशा, परमेश्वरा! जाऊ देत, नसेल तुला ऐकायचं माझे स्तोत्र तर राहिलं, नाहीतरी होत नाही आताशा सगळी उठाठेव माझ्याकडून. दे मला यातून तूच सुट्टी. ने लवकर मला वर. अरे, तूच नेतोस ना सगळ्यांना?"

"परत परत उन्हाची तिरीप, काय हा खोडसाळपणा, बास आता तुझं कौतुक व्यंकटेशा. माझं कोणी करीत नाही बघ कौतुक. लहानपणी काय आईबाबानी केले तेव्हढेच का रे माझ्या नशिबी. आहे ते छान म्हणायचं. आणि आता सरला चलं पुढे.'

'अगं बाई, आलं की गालावर. अडकलं माझ्या गालाच्या खड्यात! होय! तो खड्डाच की. खळी कसली, दात काढलेत ना मी. आता वय आहे का गालावरल्या खळीत कोणी अडकायला? इश्श!! भलतंच काहीतरी येतं मनी. पाहिजे तेव्हा का नाही अडकलं कोणी? आत्ता मसणात गेली मोळी तवा खड्यात पडलं. कोण पडणार? हेच असणार आमचं मेषपात्र."

'आता काय म्हणावं? काय झालं यांना? दररोज काहीतरी नवीन. नुसते म्हातारचळ ह्यांचेच.'

मनाशी बडबड करीत सरलाबाईनी ताम्हण दूर सारलं अन 'उडदामाजी काळेगोरे!' म्हणत भिंतीच्या आधाराने उठल्या. कवडसा नाकावर डोळ्यावर. सरलाबाईंनी पटकन चेहरा झाकला.

दोनचं पावलं गेल्या असतील तोच समोर आलंच, ‘तेच आपलं ध्यान!! काळेगोरे!!! काय निवडलं होतं मी? किती गोरापान रुबाबदार होता पहिल्यांदा बघितलं तेव्हा! मी लगेच हो म्हणून सांगितलं. तसं छान झालं सगळं, मस्त गेलं आयुष्य. चारचौघींसारखं! आता बघा, काय पण झालं काळंकुट्ट! खोड्या काय काढतं माझ्या. जणू गद्धे पंचविशी! काय करू याला. ऐकलं माझं तर शप्पथ! बिघडलं आहे नक्कीच.’ सरलाबाईंनी एकदम पट्टी बदलली.

“ओ! गप बसा. काय चाललंय? शोभतं का या वयात. मनाची नाही जनाची तरी. चार नातवंडांचे आजोबा तुम्ही, गपगुमान रहा. रोज रोज काहीतरी. जरा अधिकच होतंय. काय म्हणावं तुम्हाला?”

“अगं, हो.. हो..किती किती ते! जरा दमानं घे.”

“मला दमानं घे म्हणता आणि तुम्ही धावता त्याचं काय? हे काय वय आहे असं वागायचं?समजेनासं झालंय समदं मला.” बाईसाहेब कावल्या अगदी.

“पूजेचं एक काम करीत होतात, तेही माझ्यावर ढकललं! लागले टिवल्याबावल्या करायला. काय तर ग्यालरीतून बायकोकडे बघत बसता? वेड लागलं अप्पांना म्हणतील सगळे. याचा तरी विचार करा की, थोडासा, जरासा तरी.’

“बॉबी! माझी बॉबी!!” म्हणतं पळाले आतल्या खोलीत. रागेरागे का होईना, पळाल्या त्यांच्यामागे सरलाबाई. बायकोच ना, पळाली. पळण कसलं ते, लंगडत पाय ओढीत गेल्या आत.

“हमतुम एक कमरे में बंद हो जाय और चाबी खो जाय.” गिरकी घेऊन चक्क हसत बसले की कॉटवर अप्पा! कहर! अगदीच कहर करायला लागले. ‘बॉबी! म्हणाले मला. काय मी बॉबी आहे?’ आरशासमोरच आल्या सरलाबाई आणि एकदम चिडून आवाज चढवला. “आता मात्र कहर झाला? कपाळ माझं? आगीतून फुफाट्यात पडलेत, आधीचं बरं होतं म्हणायची वेळ आली. हे व्यंकटेशा, मला आधी उचल. नको अब्रूचे धिंडवडे म्हातारीचे. संपली हो संपली माझी सहनशक्ती.” सरलाबाईंचा कोपरापासून नमस्कार.

तर अप्पांना आला चेव, वेडेवाकडे हात करीत ‘हमतुम हमतुम’ सुरूच त्यांचे. बायकोच्या नजरेला नजर... तेव्हढे टाळलं बरं.

“शेर कों मै कहूँगी, मुझे खा जाय.” तोंड वेंगाडत सरलाबाई गायल्या. जेव्हढं म्हणून वाकडं होता होईल तशा अष्टवक्रा होऊन नाचल्या, हातवारे करीत आपल्या नवरोबासमोर.

“ओ, सरलाबाई, तुम्हीच जरा दमानं घ्या. इतक्या नाचलात तर तुमचं तंगड काय बोलेल? कसंबसं चार पावलं टाकताय ते बंद होईल. नाचायचं? मी आलोच ऋषीकपूर.”

“आरंSSSS, दार उघडंच राहिलं कीSSSS हां, आता बोला, केलं बंद. हम दोनों एक कमरे में बंद!” अप्पा चक्क नाचायला लागले, हात धरला सरलाबाईंचा. त्यांनी जोरात हिसडला हात, तोच टेकवला कपाळावर आणि मटकन कोसळल्या खुर्चीत.

“लावा कपाळी हात तुम्ही. तुमच्यासमोर नाचतो आम्ही.” अप्पा एकदम सुटले होते. सरलाबाईंच्या समोर चक्क हातवारे करीत अंगविक्षेप करीत टाळ्या पिटल्या. तालासुरात ओळ म्हणून अप्पांनी गिरकी घेतली.
“ओ, बसा गपगुमान.” सरलाबाईंच्या आवाजाला धार आली तरी अप्पा काही थांबेना.
“हमतुम कमरे में? काय आरंभलय तुम्ही? आजारी आहात तर असला हिरवटपणा. हे बरं कळतं, बाकी काही नाही? लाकडं गेलीत म्हसणात. कधी सांगावा येईल सांगता येत नाही, आणि हे काय आरंभलं?”
अतिशय संतापल्या सरलाबाई. क्षणभर गप्प बसल्या फक्त बघत. काळजीने डोळे पाणावले, बघितलं अप्पांकडे आणि उठल्या. आल्या बसल्या अप्पांशेजारी. डोळ्यात डोकावून काकुळतीने विचारलं “का असे वागता तुम्ही?”
थोडावेळ शांतता! भयाण प्रश्नचिन्ह?
“माझी शपथ आहे तुम्हाला. कधी हे असं काही वागाल, वाटलं नाही मला. अहो, तरुणपणात नाही लाडाने केलं असं? हे असे?जाऊ द्या झालं. काय तो स्वभाव तुमचा.आठवतं का कधी प्रेमाने वागल्याचं. नुसती कायम चिडचिड, वसवस, आरडाओरडा. थोडं तरी वागायचे की असे तेव्हा. आता पंच्याहत्तरी ओलांडली ना? त्राण आहेत का अंगात? चला डॉक्टरकडे?”
डॉक्टर शब्द ऐकताच अप्पा चिडले, “नाही, मला काहीही झालेलं नाही. डॉक्टरकडे काय म्हणतेस? दुसरं काही तुलाच सुचत नाही? उठसुठ डॉक्टरकडे नेते. गप्प बस तूच. नाहीतर बोलशील पोराजवळ, तो उचलेल आणि टाकेल हॉस्पिटलमध्ये. येतं काय दुसरं त्याला? अजिबात नाही. समजलं? काय म्हणतोय मी? ऐकताय ना तुम्ही?” चांगलेच गुरकले बायकोवर.
“अहो, नाही कसं? काय करताय तुम्ही, समजतं तरी का? महिना होऊन गेला बघतेय मी, आरशात काय बघत बसता, स्टाईल काय मारता, हसता काय, गाणं गुणगुणता. तेही अगदीच रोमँटिक! आता कसं कळावं मला काय ते? मी काय नवी नवरी आहे? किती अंगलट करता माझ्याशी? सारखं माझ्या मागेमागे! घरात कॉलेजात जाणारी नात आहे सगळ्यात मोठी. पाठची तीन आहेत. हे असलं वागणं त्यांच्या लक्षात आले तर नाचक्की होईल माझी. समजते का कायकाय करता हल्ली. फ्ल्याईंग ने काय पाठवता माझ्याकडे. चक्क डोळा मारलात परवा.”
“ओहो! आलं ना तुझ्याकडे उडतं उडतं ते मी पाठवलेले. जय हो!! आणि लागलं का गं तुला मी मारलेलं? कुठे? दाखव बरं. फूssss. जे करायचं राहिलं ते तर करतोय आता. जवळ ये ना दावतो.”
अप्पांनी विचार केला, थोडी लाडीगोडी लावू या हिला.
“काम करताना नाही कधी माझ्या मदतीला आले. स्वयंपाक करताना हात भाजला तर कधी औषध नाही लावलं, की फुंकर नाही घातली. आता लागले फू फू करायला? परिणाम झालाय डोक्यावर तुमच्या. समजलं का?”

“ये गं, ये गं, माझ्या बाई.” अप्पांनी अगदी आर्जवाने बोलावले सरलाबाईंना.

‘जावं की इथून निघून जावं. नको, आज छडा लावू यात यांचा.’ सरलाबाई विचारमग्न तर अप्पा जवळ येऊन बघू लागले आपल्याच अर्धांगिनीकडे. “ये, बसं इथे.”
“आलीस ना माझ्याजवळ? कसा चमकला चेहरा एका पोरीचा. नाऽऽऽ नाऽऽऽ एका म्हातारीचा? मज्जा गं ?”
“मज्जा? मेलं तुमचं कर्म. गेलं चुलीत. असे का करता ते सांगा आधी. नाहीतर मी ”
“मी मी काय? म्हण, माहेरी जाईन, जीव देईन, बोलणार नाही. जा पळ माहेराला.जातीस का?”
“तुम्हाला वेड लागलं आहे.“ सरलाबाई एकदम घायाळ. आधीच कॅन्सरच्या रोगाने पछाडलेला नवरा, कितीवेळा दवाखान्यात ठेवलं, आता वेडा झाला. “वेडाऽऽऽ होयऽऽऽऽ महाभयंकर! काय करावं?” आतली तळमळ रागाने बाहेर अशी आणली तिने. रडायलाच लागल्या तर अप्पा मोठ्यांदा हसायला लागले.
“सरले, तू रडू नकोस. जरा बघ माझ्याकडे, तुझ्या या वेड्याकडे, इकडे. जरा नीट ठेव नाकावरचा चष्मा, रागाने घसरला बघ, त्यातून नाही दिसणार तुला. थांब गं, काय झालं डोळे वटारायला? थांब, आता मीच नीट करतो बाईसाहेबांचा चष्मा.”
“काही नको.” फुसफूस नाकावरला चष्मा भसकन वर गेला.
सरलाबाई नवऱ्याच्या जवळ जाऊन मुसमुसू लागल्या, “तुम्ही मला सांगा खरंखरं कारण. का असे मागेमागे जाताय तुम्ही? का असे तरुण होत आहात तुम्ही? मी कमी पडले का कधी? असे वागणं खूप वाढतं चाललं हो तुमचं. मी आज मुलांना सांगीन.”
“दम देता काय सरला त्र्यंबक मोने? काय समजता स्वत:ला? धमकी, ती कोणाला? आपल्या पतिराजांना? या त्र्यंबक रावांना? पाहून घेतो तुमच्याकडे?” चक्क डोळे वटारून दम दिला अप्पांनी, आणि मिशीला पीळ देऊ लागले.
सरलाबाई आणखीनच घाबरल्या, ‘आता काय बाई हे? काय करणार आता? घरात दोघेच, काय करावं मी? हा अटॅक तर नाही ना? फोन लावावा का प्रकाशला? तो चिडेल फोन केला तर? त्याला नको, सूनबाईला बोलावते.”
काकुळतीला येऊन अप्पा “नको गं राणी, अशी निष्ठुर होऊस. तू फक्त माझ्याकडे बघ” आणि चक्क मान खाली करून सरलाचा चेहरा वाचायला लागले.
सरलाबाईंच्या मनात वेगळेच विचार चालू ‘अप्पा चेष्टा करतात की गंभीरपणे विचारतात मला? काहीच कसे समजेना मला?’ सरलाबाई आतून खूप घाबरल्या होत्या. नवरा आत्ता असा काही वागतो, बापरे, मागील पन्नास वर्षात कधी असा प्रेमाने वागला नव्हता. काहीतरी वेगळाच आजार झाला हे नक्की.
“बोला, काय बघू. काही बाकी आहे का तुमच्याकडे?”
“हे बघ, माझी मिशी! माझी मिशी जशीच्या तशी. जाताना मला मिळणार खुषी.“
हसू दाबीत त्या म्हणाल्या “बाबा रे! काय ते स्पष्ट बोल. काय झालं मिशीला? हसू का रडू?”
“काय झालं? अगं बाई, तुला नाही समजलं? अरे देवा! किती अभागी मी. माझ्या बायकोला नाही समजलं.”
“तुम्ही भाग्यवान हो, मीच अभागी. मला नाही अक्कल. तुमच्या मागे मागे येते. सेवा करते तुमची, आणि तुम्ही छळा मला.”

त्यांनी शेवटचा स्वर काढला “आत्ता बोलता का स्पष्ट?”
बायकोच्या त्या आवाजाने अप्पा चरकले.
“सरू, आता सांगतो, चिडू नकोस ना माझ्यावर. तुला आठवतं माझ्या मिशीला चाई लागलेली. चांगली गोलाकार मोठ्या टिकली एव्हढी! डाव्याबाजुची मिशी मी कमी केली, एकच कशी कमी करायची म्हणून दुसरीकडे लावली कात्री. अगदी भुईसपाट केलं मैदान. फार अवघडलो मी तेव्हा. हात आखडत होता मिशी उतरवताना. काय, आठवलं का?”
“हो, लागली होती चाई. तिचं काय झालं?” अजून आवाजाची धार होतीच.
“तिचं मढं! तेच उगवलं बघं. तू बघ तर खरी. उगीच नव्हतो मी आरशात बघत सारखं सारखं. बघ सरले, बघच तू. कसं काळंपांढरं मऊमऊ गवत उगवलं मिशीचं.”
“माझी मिशी ती, जिंदगानीत नसती उतरवली मी. कॅन्सरच्या आजारपणात सप्पाट करावी लागली. मेला मुडदा कॅन्सरचा. मिशी उतरावी लागली या त्रंबकला.किती त्रास झाला मला.”
“सरू. बघ ना गं! खरंच आली ती” सरूची अवस्था काय झाली असेल काय सांगावं. तिला समजेना काय करावं ते.

“चार केमो नंतर.... ती आली परत! माझी मिशी परत आली! हाSSSSS हाSSSS हा! होय गं! खरंच! सगळीकडे आली माझी लाडकी. आता नाही जाणार. तिला जपणार मी, वाढवणार मस्तपैकी. बघशील तू. आता न कापता भरदार मिशीच्या देही देवाघरी जाणार.” आणि तोंड वाकडं करून मिशीची अप्पांनी पप्पी घेतली.
तोपार्यंत सरलेला काय ते समजलं. “अगं बाईSSS! खरंच कीSSS! किती आवडते रे तुला मिशी! माहिती आहे मला. तुझं ते....” चक्क लाजल्या सरलाबाई.
“सरला, अगं मला इतकं वाईट वाटलं होतं प्रत्येक केमोच्या वेळी. डोक्याचे केस जातात ते सांगितलं होतं कोणीतरी. पण, मिशी जाते हे नव्हतं माहीत. आणि समजलं असतं ना तर मी केमो केलीच नसती कधी... खूप अस्वस्थ झालो होतो मी, चाई दिसली तेव्हा. कसाबसा जगत होतो कॅन्सर घेऊन, त्यात ही पण गेलेली. पण, अगं, चौथी केमो केल्यानंतर दोन दिवसांनी बसलो होतो घाणेरडा चेहरा न्याहाळत आरशात. अंथरुणावर पडून अगदी निवांतपणे. काही काम ना उद्योग. तर सहज चकाकलं आरशात. काच पुसली गं मी. तरं नाकाखाली चकाकला पांढरा केस. वटारले डोळे, आणि सारखं बघत राहिलो. एक आला दोन आले, काय सांगू तुला...आठदहा दिवसात गोल गेला झाकून. काळं पांढरं रान माझं उगवलं ओठावरी! आहेस कुठे?” एका दमात रिक्त केल्या यातना आणि भरला आनंद त्र्यंबकने.
सरलाबाई अगदी निरखून बघायला लागल्या. “अरे, खरंच की चाई गायब. आणि मिशी हजर...हाSS हाSS” सरलाने डोळे विस्फारले, आणि ओठ फाकले.
त्र्यंबकरावांनी सरलाबाईंचा हात धरला घट्ट. “हात लाव सरू तिथे. बघत नको बसूस नुसती. आहे ना माझी लाडकी मिशी. अगदी खरी खरी.!!”

सरूचा हात फिरला चाईच्या जागी. डोळ्याचा चष्मा आणखीन वर ओढला. हाताला लागलं काहीतरी खरखरीत. चांगली चिमटीत धरून ओढली त्याची... म्हाताऱ्या नवरोबाची लाडकी मिशी, तुरा बसला चिमटीत.

“ये, हाय ना खरी. मी खोटं सांगितलं तर धरून ओढतेस काय? सरू, मला पहिल्यांदा दिसली ना तेव्हा तू झोपली होतीस दुपारची. नाहीतर मी लगेचच तुला बोललो असतो. चहाच्या वेळेला मुलं होती बरोबर तर बोलायला नाही जमलं. मग वाटलं, तुझी गंमत करावी. थोडा वेडा झालो. वेडा, माझ्या सरूचा वेडा. बास! अगं इतकंच फक्त!”

“तू ना अस्सा ...!”

“अस्सा म्हणजे कस्सा.

आता झालो मी मिशीवाला, कध्धी कध्धी नाही सोडणार तिला.

आता झालो मी मिशीवाला, कध्धी कध्धी नाही सोडणार तिला

लाडकी मिशी हले ओठावरी, सरू चल, आपण साजरी करू दिवाळी

माझी मिशी तू कशी ओढली, आपण दोघंच, आज बंद हाय ही खोली.”

काय पण तारासुरात गायला हा मुखडा. मान वाकडी डोळा तिरका, थरथरता हात पकडू पाहे सरलेचा हातात हात, सरलाने त्याच्या हातावर हात ठेवला, त्र्यंबकने दुसऱ्या हाताने सरललाचे डोळे टिपले....

“काय बाई, किती घाबरले मी. काय झालं समजेना. पण, हे कसलं असं वागणं तुमचं” असं म्हणून सरला बाई जरा जवळ सरकल्या अप्पांच्या. बघतलं नीट परत एकदा, आणि मस्त हसल्या.

“माझी मिशी धरतेस? वेडाबाई गं माझी!”

सौ.वंदना विजय धर्माधिकारी

दिवाळी आली त्यांच्या घरी....
(किशोर कथा)

खुशालपूरच्या शाळेची लोकप्रियता जिल्ह्यात होती, गुणवत्ता व विकास, ही शाळेची ओळख होती. शाळेचा दहावीचा निकाल उत्तम होता. हेडमास्तर मारुती नेमाडे म्हणजेच माने गुरुजींचा लौकिक कडक शिस्तीचे व प्रेमळ स्वभावाचे,असा होता. कोमल मनाचे कठोर प्रशासक, ही त्यांची ओळखही होती. ते शाळेत कल्पक उपक्रम राबवून मुलामुलींचा सहभाग वाढवत, आणि शाळेतले शिक्षक त्यांना शालेय कामात सदैव सहकार्य करीत असत. निसर्गरम्य परिसरात शाळा होती, आणि शाळेत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत. माने गुरुजींनी शाळा परिसरात विविध झाडे लावली होती. त्यांची रोजच्या रोज देखभाल होत असे, परिसरात स्वच्छता होती. त्यामुळे मुलांचे शिक्षण आनंददायी वातावरणात व निसर्गाच्या सान्निध्यात होत असे. शाळा दहावीपर्यंत होती. मुलामुलींना शिक्षक शालेय अभ्यासक्रमासोबतच अवांतर वाचनाविषयी नेहमी सांगत असत. शाळेचे ग्रंथालय सुसज्ज असे होते, वाचनालयात जिल्हायातील सर्व वृत्तपत्रं येत असत. सकाळी प्रार्थना झाली, की शाळेच्या फलकावर आजच्या ठळक बातम्यांची शीर्षकं लिहिली जात असत. सुवाच्य अक्षर असणारेच हे सुलेखन रोज करीत असत. यामुळे उपक्रमशील शाळा म्हणून जिल्ह्याच्या शिक्षणाधिका-यांनी या शाळेस भेट देऊन शाळेचा गौरवही केला होता, प्रशस्तीपत्रकही दिले होते.

शाळेला लवकरच दिवाळीची सुट्टी लागायची होती. बाहेरगावच्या मुलांना आपल्या घरी जाण्याचे वेध लागले होते. शहरातील मुलांनाही वेगळ्या उपक्रमात सहभागी व्हायचे होते. ज्या दिवसाची मुलंमुली वाट बघत होतो, तो दिवस एकदाचा उगवला. मध्यंतरानंतर माने गुरुजीनी सातवी, आठवी, नववी, दहावीच्या वर्गप्रतिनिधींना आणि त्यांच्या शिक्षकांना आपल्या केबिनमध्ये बोलावले. शिपायाहाती निरोप मिळताच देशपांडे मॅडम, काळे, आर्वीकर, पालकर सर तसेच वर्ग प्रतिनिधी राजीव, मेघना, श्रीपाद, प्रिया माने गुरुजींच्या केबिनमध्ये आले.
केबिनमध्ये आधीच दोघे-तिघे बसले होते, त्यांचे काम संपल्याने ते निघाले. तोवर सर्व शिक्षक व वर्गप्रतिनिधी यांनाही बसण्यास सांगितले.
माने गुरुजी म्हणाले, “जिल्हाशिक्षण ऑफिसकडून आपल्या शाळेला एक पत्रक आले आहे, त्यांना ते पत्रक शिक्षण मंत्रालयाकडून प्राप्त झाले.”
आर्वीकर सरांनी विचारले, “काय आहे पत्रकात?”
माने गुरुजी सांगू लागले, सगळे ऐकत होते..
" या वर्षी आपल्या शाळेने वर्षभर विविध उपक्रम राबविले, त्याचे त्यांनी कौतुक केले आणि यंदाच्या दिवाळीत विशेष उपक्रम राबविण्याची स्पर्धा शासन पातळीवर आयोजित केली आहे; आणि यात आपल्याला सहभागी होऊन छान प्रतिसाद द्यायचा आहे "

याची माहिती देण्यासाठी व चर्चा करण्यासाठी बोलवल्याचे त्यांनी सांगितले.सर्व शिक्षकांनी आपले मत मांडले, आणि वर्गप्रतिधींनी त्यात सहभाग घेतला.
“तुम्ही चार शिक्षक आणि चार वर्गप्रतिनिधी यांची एक टीम तयार करा, वर्गप्रतिनिधींनी आपल्यासोबत मदतीला दोन दोन वर्गमित्र घ्यावेत” माने गुरुजींनी सांगितले.
“दिवाळीत आपण चांगले उपक्रम घेऊ” देशपांडे मॅडम म्हणाल्या.
चारही वर्ग प्रतिनिधी म्हणाले, “आम्ही आमची चांगली टीम नक्कीच तयार करू.”
कोणी काय करायचे, याचा आराखडा तयार करण्यासाठी केबिनमध्ये सर्वजण पुन्हा एकत्र येणार होते. केबिनमधील बैठक संपली,शिक्षक व वर्ग प्रतिनिधी आपल्या वर्गावर परतले. असेच दोन चार दिवस गेले...
त्यानंतर शिक्षक आणि वर्ग प्रतिनिधींनी एकत्र बसून दिवाळीच्या सुट्टीत काय उपक्रम राबवता येतील, याची आपसात चर्चा केली व माने गुरुजींच्या केबिनमध्ये सर्वजण पुन्हा एकत्र जमले, विचार विनिमय सुरू झाला.
“राजीव, मेघना, श्रीपाद व प्रिया यांनी काही ठरवले आहे” काळे सर म्हणाले.
“काय ठरवले आहे तुम्ही मित्रांनो, सांगा बरं” माने म्हणाले.
राजू म्हणाला, “गावातील गोरगरीब आणि झोपडीत राहणा-या बांधवांना गरजेच्या वस्तूंची मदत करता येईल. आम्हाला हे सर्व साहित्य गावातून संकलित करता येईल.”
श्रीपाद म्हणाला, "निधी जमा करू, त्यांना मिठाई देता येईल."
मेघना म्हणाली, “जे दिवाळी साजरी करू शकत नाहीत, त्यांचे घर आपण आकाश कंदिल लावून सजवू.”
आर्वीकर सर म्हणाले, “मुलांच्या या कल्यना छानच आहेत. मला एक सुचते; कसे वाटते ते बघा. आपण जिल्हातील वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत दिवाळी साजरी करू.”
देशपांडे मॅडम म्हणाल्या, “आपण जिल्हा कारागृहातील कैद्यांना दिवाळीतील खाद्य पदार्थ देवू.”
यावर माने गुरुजी म्हणाले, “आपल्या सर्वांच्या सूचना आणि ठरवलेला कार्यक्रम चांगला आहे. मी संस्थाचालकास सांगून या बाबतीत काही निधी आणता येईल, का ते पाहतो. या बाबतीत गावातील काही दानशूर व्यक्तीकडून काही मदत मिळते का ते बघतो.”
या बैठकीत चारही शिक्षकांना मार्गदर्शक म्हणून नेमले गेले, प्रत्येकाच्या टीममध्ये एका वर्गप्रतिनिधीसह चार सहकाऱ्यांचे नियोजन करण्यात आले.
शाळेचा अभ्यासक्रम अर्ध्यावर आला.सहामाही परीक्षा होऊन गेली, अर्थात तिचा निकाल दिवाळीनंतर लागणार होता आणि एके दिवशी वर्गात दिवाळीच्या सुट्टीची नोटीस फिरवण्यात आली. आता महिनाभर सुट्टी लागणार असल्याने शाळेत मुले मुली आनंदी झाले होते.

सुट्टीत काही जण सहलीला जाणार होते, काही जण आपल्या गावी जाणार होते, काही जण वाचनालयात जाऊन दिवाळी अंक वाचणार होते, काही विकत घेऊन भेट देणार होते. असे कुणाचे ना कुणाचे काही नियोजन ठरले होते.

दसरा संपला, आणि दिवाळीची लगबग सुरू झाली. जिल्ह्याच्या बाजारपेठा आकाश कंदिलाच्या दुकानांनी सजल्या, फटाके बाजारही भरू लागला. बाजारपेठेत दिवाळी अंक येऊ लागले, खुशालपूर छोटे गाव असले, तरी तिथेही छोट्या बाजारपेठा आकाश कंदिल, फटाके, दिवाळीचे पूजासाहित्य, दिवाळी अंकांनी सजू लागल्या.

खुशालपूरच्या शाळेतली दिवाळी उपक्रम मोहीम वेग घेत होती. या शाळेतील चार शिक्षक व चार विद्यार्थ्यांनी कामाचे नियोजन व्यवस्थित केले, त्यांना माने गुरुजीचे मार्गदर्शन लाभत होते. या सर्वांनी माने सरांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनासाठी दोन टीम तयार केल्या. दिवाळीची सुट्टी लागताच काही मुले गावाकडे गेली, काही सहलीला गेली, काही मामाच्या गावाला गेली.

आणि शाळेची मोहीम सुरू झाली, दिवाळीच्या पाचही दिवसांचे कार्यक्रम ठरले.

• दिवाळी भेटीसाठी गावातील दानशूर व्यक्तींनी खूप सहकार्य केल्याने महिलांसाठी साड्या, पुरुष व मुलांसाठी कपडे खरेदी झाली.

•वृद्धाश्रमातील आजी आजोबांसाठी खाद्यपदार्थ व कपडे घेण्यात आले.

•जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी घरचा फराळ तयार करण्यात आला.

•गावातील अनाथ मुलांसाठी मिठाई घेण्यात आली.

दिवाळीच्या आधी व नंतर गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

•काही घरांसाठी दिवे व आकाश कंदिल घेण्यात आले.

देशपांडे मॅडम, काळे सर आणि वर्गप्रतिनिधी राजीव, मेघना व त्यांच्यासोबत चार सहकारी आणि आर्वीकर, पालकर सर, श्रीपाद व प्रिया यांच्यासोबत चार सहकारी,असे दोन गट तयार करून कामाची विभागणी करण्यात आली. दिवाळीच्या पहिल्या दिवशी देशपांडे मॅडमचा गट जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या वृद्धाश्रमात गेला, दिवाळीचे कपडे, गोडधोड पदार्थ त्यांच्यासाठी आणले होते, ते बघून वृद्धांचे डोळे पाणावले व म्हणाले, "आज आम्ही आमच्या घरापासून दूर आहोत, घरच्यांना आमची आठवण येत नाही, आणि आठवण आली तर उपकार म्हणून चक्कर मारून जातात”

"रक्ताच्या नात्यापेक्षा, ही आपण दाखवलेली माणुसकी फार महत्वाची आहे” असे बोलताना एका आजोबांच्या डोळ्यात टचकन् पाणी आले. खुशालपूरची टीम या भावपूर्ण अनुभवाने खूपच भारावली. याच दिवशी ही टीम जिल्हा कारागृहातील कैद्यांनाही भेटली, खाद्य पदार्थ व भेटवस्तूंमुळे त्यांच्याही आयुष्यात दिवाळीच्या आनंदाचे चार क्षण आले. दिवसभरांची ही भेट या गटाला नवा अनुभव देणारीच ठरली.

दुसरे दिवशी आर्वीकर सरांची टीम गावातल्या अनाथाश्रमात गेली, तिथेही असाच कृतज्ञतेचा अनुभव या टीमने घेतला. दिवाळीचा दुसरा दिवस त्यांनी अनाथ मुलांसोबत घालवला. दिवाळीचे पाचही दिवस खुशालपूर शाळेच्या स्वच्छता मोहीम पथकाने गावक-यांच्या सहकार्याने मोठे कार्य हाती घेतले व तडीस नेले. गावात घरोघरी दिवे लावले, घराघरावर आकाशकंदिलही लावले. यंदा गावातील शाळेच्या मुलांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचे ठरवले होते. प्रदूषण टाळण्याची कल्पना सगळ्यांनाच आवडली. दिवाळीनिमित्त खुशालपूरच्या शाळेत दिवाळी अंकाचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. आदले दिवशी आर्वीकर सरांनी जिल्ह्यात जाऊन अनेक चांगले दिवाळी अंक शाळेसाठी खरेदी केले होते. गावातील काही दानशूर व्यक्तींनी सहकार्य केल्याने आणि माने गुरुजींच्या पुढाकाराने यंदाच्या दिवाळीत शाळेने सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवत सक्रीय पुढाकार घेतला, याची सर्वत्र नोंद घेण्यात आली.

दिवाळीचा सण आला गेला. शाळेची दिवाळी सुट्टी संपली. माने सरांची मोहीम फत्ते झाली. टीमच्या शिक्षक व वर्गप्रतिनिधीस यामुळे वेगळेच समाधान लाभले. आपण कुणाच्या तरी मदतीला उपयोगी पडू शकतो, याचे नवे भान आले.
असेच काही दिवस गेले.....
त्या दिवशी शाळा भरली होती. सहामाही परीक्षेचे निकाल जाहीर होऊन शालेय विद्यार्थी पुढच्या तयारीला लागले. दोन्ही टीमचे शिक्षक व वर्गप्रतिनिधी आपल्या आपल्या

वर्गात व्यस्त होते; तेवढ्यात माने गुरुजींनी या दोन्ही टीमना आपल्या केबिनमध्ये बोलवले व त्यांना शासनाकडून आलेले पत्र दाखवले.
दोन्ही टीमचे शिक्षक व वर्गप्रतिनिधी तात्काळ केबिनमध्ये आले.सर्व बसले आणि माने सर पत्र वाचू लागले...
"आपल्या खुशालपूर शाळेने दिवाळीत जो उपक्रम राबवला, त्यास प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे बक्षीस मिळाले "
सर्वांनी टाळ्यांचा गजर केला.
माने सरांनी दोन्ही टीमचे भरभरून अभिनंदन केले, दुसरे दिवशी टीमच्या ग्रूप फोटोसह ही बातमी जिल्हा दैनिकातील पेपर मध्ये ठळक जागेत झळकली, आणि शाळेच्या फलकावरही चमकली.
अशी होती खुशालपूरची शाळा, शाळेचे हेडमास्तर आणि हुशार चुणचुणीत मुले. म्हणूनच शाळेचा लौकिक पंचक्रोशीत पसरला होता...



प्रशांत गौतम

सुहास आणि मी

(सुप्रसिद्ध कादंबरीकार सुहास शिरवळकर यांच्या पत्नीने लिहिलेल्या आठवणी)

खरं सांगायचं, तर हा लेख लिहिण्यासाठी माझं मन तयार नव्हतं. गप्पांच्या ओघात आपल्या माणसाबद्दल काही बोलणं वेगळं आणि मुद्दाम होऊन आपल्या माणसाबद्दल लिहिणं वेगळं. ते सगळं फक्त आपलं आणि आपल्यापुरतं असतं, असं मला वाटतं.

माझं आणि सुहासचं लग्न १९७३ मध्ये झालं. त्याआधी आम्ही एक दीड वर्षं एकमेकांना ओळखत होतो. पहिल्याच भेटीत सुहासने ॲटम बॉम्ब फेकला, “मला तुझ्याशी लग्न करायचं आहे. तू ‘हो’ म्हणालीस, तर खूप बरं वाटेल. आपण दोघं एकमेकांना खूप दिवस नुसतं पहात आहोत.

प्रत्यक्ष भेटायची वेळ मात्र आली नाही, पण आता आतून कुठेतरी असं वाटतं.

की तूच माझी मैत्रीण आणि बायकोसुद्धा होऊ शकतेस.”

मला कळेना हे कसं होऊ शकतं. काय बोलावं ते मला कळेना. इतक्या स्पष्ट रोखठोक प्रश्नाने मी गारच झाले. मनातून तर सुहास आवडत होता, पण लग्न ही विचार करायला लावणारी गोष्ट होती.

‘विचार करते आणि सांगते’ असं बोलून मी त्या दिवशी वेळ मारून नेली पण विचार करण्याची वेळ एक दिवस संपली, निर्णय देण्याचा दिवस उजाडला, तरीही मनाची घालमेल होतच होती. माझ्या मनातल्या प्रश्नांना सुहासनेच उत्तर दिलं आणि नवा प्रश्न निर्माण केला.

त्याने सांगितलं, “मी सध्या नोकरी करत नाही, बेकार आहे कोणत्याही नोकरीत माझं मन फार रमत नाही. पुढच्या महिन्यात लीव्ह व्हेकन्सीमध्ये एका शाळेत शिक्षक म्हणून काम करायला लागणार आहे.” (आता तर मोठे प्रश्नचिन्ह!)

या त्याच्या सांगण्यावरून मी विचारलं, “हा पेशा आवडतो का?” तर ‘हो’ जोरात आला नाही. कुटुंबाविषयी माहिती दिली, तर ऐकून अंगावर काटा आला. नाही म्हणावं असं वाटत होतं, पण मनात तो कुठेतरी अडकला होता. अंतिम निर्णय होकाराचा होता!

त्याच्या घरी मान्य होतं. मी सुद्धा माझ्या घरी सांगितलं. “हो, ठीक आहे. शिरवळकर म्हणून कीर्तनकाराचे घर! घर चांगलं आहे, खातं-पितं आहे, मोठं आहे!” पण नेमकं काय अडत होतं? मुलाला नोकरी धंदा नाही. थोडी लेखनाची आवड आहे. कधीतरी लहान- सहान गोष्टी लिहितो संपलं यावर माझं त्याच्याशी लग्न होणे अडलं होतं म्हणजे लग्नाला नकारच! खूप दिवस तोच विषय! मला तर त्याच्याशी लग्न करायचं होतं पण घरात फक्त विरोध आणि विरोध! तरीही मी माझा हट्ट सोडत नव्हते. शेवटी असं झालं, “मर तू आणि तुझं नशीब!” कशीबशी का होईना, अखेर परवानगी मिळाली, पण “जिवंतपणी आम्ही उघड्या डोळ्यांनी तुझं मरण बघू” ही पुस्ती होतीच. साखरपुडा झाला त्याच दिवशी ७ फेब्रुवारी १९७२ रोजी ‘जत्रा’ अंकात एक कथा छापून आली. केवढा आनंद झाला!

सुहासने बँकेत नोकरी करावी असे घरातील वडीलधाऱ्या माणसांचे मत होते बँकेतली नोकरी? कारकूनी? अरे बापरे! कसंखरोखरीच ? त्यानंतर बी.ए. करण्याचा निर्णय घेतला, पण ते पूर्ण होऊ शकलं नाही. शेवटचं वर्ष बाकी राहिलं.
लग्न तर झालं, पुढे काय? घरात खूपच माणसे पाहून तर त्यातून कसे बाहेर पडणार कळत नव्हतं. तो एकांतात सापडत नव्हता. विचार आणि विचार! पण माझ्याकडे पाहून त्यांच्या मोठ्या भावाने- पुरुषोत्तमने (उत्तम म्हणत असत त्यांना) त्यांनी मोठा निर्णय घेतला. सुहासला सुचवलं, “तू दोन-तीन शाळेत अर्ज कर, कुठेतरी जॉब मिळेल, त्या जॉबबरोबर जत्राचे लेखन पुढे चालू ठेव.” त्यांनी सुहास आणि जत्राचे पु. वि. बेहेरे यांची ओळख करून दिली आणि दर महिन्याला एक कथा लिहिण्याचे ठरले. थोडा मला श्वास घेता आला. टिटवाळा इथल्या शाळेत शिक्षकाची नोकरी पण मिळून गेली. दोघं आनंदात होतो. थोडे घरापासून दूर गेलो, पण एक नवीन आयुष्य सुरू झालं. त्याकाळी पगार कमी असायचा, पण नोकरीमुळे काळजी कमी झाली. अनोळखी गाव, जागा नवीन, सगळेच नवीन तसा सुहास देखील मला नवीनच होता, नवरा म्हणून. आम्ही पहिल्यांदाच असे एकटे राहणार होतो, जवळ राहून एकमेकांना समजून घेणार होतो सुहासचे वडील, काका सर्व कीर्तनकार. हे घर अनेक मनस्वी, कलंदर कलाकारांनी भरलेलं होतं, त्यामुळे सगळेच बेहिशोबी इथे फक्त कलेला स्थान होतं कलेची किंमत केली जात नसे, तेथे फक्त कलेला दाद मागण्याची पद्धत होती येथेच तर घोटाळा झाला. त्यांच्या घरात सतत काहीतरी साहित्यचर्चा, टाळ्या यांचे आवाज उठत राहायचे. या सर्व गोष्टींनी रात्रीचा मूड फार सुंदर असे. आमच्या घरी. रात्रीनंतर दिवस सुरू होई आणि सूर्योदयाच्या वेळी संपत असे. या कुठल्याच गोष्टीशी माझा पूर्वी कधी संबंध आला नव्हता. माझ्या घरी, म्हणजे आईवडिलांकडे अतिशय शिस्तबद्ध चाललेले असे. आणि इथे मला जेव्हा झोप येते, तेव्हा ही मंडळी जेवणाची तयारी करत असत. मी फक्त वेडी झाले नाही येथे, एवढंच. हे काही रूचतही नव्हते आणि कसे जमवायचे, ते कळतही नव्हते. तशी माझ्या पाठीशी माझी मोठी जाऊ म्हणजे उत्तम शिरवळकरांची पत्नी कुंदा होती. हे उभयतां पण लेखक होते, आम्हाला समजून घेणारे होते पण उत्तमभाऊजी नगर येथे प्राध्यापक असल्याने दररोजच्या भेटीगाठी नव्हत्या. पण कुंदावहिनी आणि सासरे पाठीशी उभे राहिले आणि मी या सगळ्या व्यापातून तरून गेले. अर्थात, काही गोष्टी इथे खूपच चांगल्या होत्या. या घरात बायकांच्याही मताची कदर केली जात असे.
कीर्तनकार हा खऱ्या अर्थाने एक मोठा कलाकार असतो, अशाच कलाकाराचा मुलगा सुहास. खरोखरीच त्याच्या अंगी बऱ्याच कला होत्या त्या योग्य वेळी कशा सादर कराव्यात हे त्याच्या अंगात म्हणजे रक्तात भिनलेलं. त्याला गायक व्हायचं होतं, त्याला नट व्हायचं होतं. वाद्यांवर त्याचे प्रभुत्व होते. त्याच मार्गाने शाळेत वासुदेव पाळंदे यांच्या नाट्यसंस्थेतून काम केले. नंतर रजनी मुथा, सई परांजपे यांच्याबरोबर नाटकातून कामे केली. गाण्यासाठी खास त्या काळातील बबनराव कुलकर्णी बबनराव नावडीकर, दिवेकर बुवा यांच्याकडे जात असे. हे सगळं लग्नाआधी. त्यानंतर थोडे दिवस हे चालू होतं. लग्नानंतर नाटक पूर्ण बंद झालं, गाणं मात्र चालू राहिलं.

सुहास खूप विचारी होता. एखादी गोष्ट कुणी शांतपणे समजावून सांगितली तर ती ऐकणं, आणि त्यावर विचार करणे हा एक चांगला गुण होता. पुरुषी अहंकार नव्हता. दुसऱ्याचे म्हणणे समजून घेणे, त्याला दाद देणे अशी समंजस वृत्ती असल्यामुळे आम्ही दोघे एकत्र चांगले नांदत होतो.

मुंबईचं हवामान सुहासला मानवत नव्हतं, सतत सर्दी व्हायची सुहास शाळेत गेल्यावर मला पूर्ण दिवस रिकामा मिळायचा. मग मलाही एका शाळेत जॉब मिळाला, दीडशे रुपये पगार. मी होकार दिला. कामास सुरुवात केली. पहिल्याच महिन्यात तिथे बेहिशोबी व्यवहार आहे, हे लक्षात आले. दीडशेच्या जागी फक्त पन्नास रुपये हातात देऊन मस्टरवर सही करून घ्यायचे.

मग सोडून दिलं काम. ‘जत्रा’ अंकात सुहासला दर महिन्याला कथा लिहायची होती. दिवसभर शाळा आणि रात्री लेखन चालायचं. लेखनासाठी जागरण त्याचं आणि सोबत माझी! रात्री त्याचं लेखन पूर्ण होईपर्यंत मी झोपायचं नाही, असा दंडक घालून घेतला. रात्री अपरात्री मी तरी काय करणार! थोडे वाचन, थोडे विणकाम-भरत काम वगैरे वगैरे. जागरणाने झोप यायची पण हळूहळू शरीराला सवय लागून गेली. पुढे मी डिलिव्हरीसाठी पुण्यात आले, तो टिटवाळ्यात राहिला. मे महिन्याची सुट्टी लागली आणि आम्हाला पण कायमची सुट्टी मिळाली कारण शाळेत बी. एड. सक्तीचं झालं. परत प्रश्न उभा. कॉलेजला ॲडमिशन मिळाली नाही. आता पुढे काय हा प्रश्न ‘आ’ वासून तयार होता. आभाळ कोसळल्यासारखं वाटलं. काही बोलणं शक्य नव्हतं. सुहासशी कसं बोलावं कळेना. सगळं कसं सुन्न झालं. मी बेचैन होते. आता तर बाळाची पण जबाबदारी होती.

परत शिकवण्या सुरू केल्या. घराबाहेर जाऊन नोकरी करायची नाही, असा दंडक होता. घरात बसून काय करणार? घरातले काम संपेपर्यंत चार वाजत असत, त्यानंतर फक्त दोनच तास रिकामे मिळत. त्या अवधीत शिकवण्या जमवून घ्याव्या लागायच्या. ओढाताण व्हायची, पण इलाज नव्हता ना! आपल्या बंद डोळ्याच्या पापण्या अनेक स्वप्नं जगत असतात, कधी पूर्ण होण्यासाठी तर कधी, कधीच न पूर्ण होण्यासाठी. परत परत अनेकदा ती स्वप्नं पुन्हा पुन्हा उभी राहायची.

सम्राटच्या जन्मानंतर सुहासचं लेखन मार्गी लागलं. बाळाचा पायगुण म्हणा, की काही म्हणा, पण ग्रहण सुटलं! प्रवास काहीसा सुरळीत सुरू झाला. लेखक म्हणून सुहास उदयाला आला. बरं वाटलं. लेखक नवरा जवळून पाहायला मिळत होता. एखाद्या लेखकाचं काही वाचणं वेगळं आणि आपलं जवळचं माणूस, आपला नवरा लेखक म्हणून उदयाला येताना पाहाणं वेगळं. किती गंमत होती त्यात! सुहासही आनंदात होता. त्याला आवडीचं क्षेत्र मिळाले, यापेक्षा आणखी काय हवं. माणूस आणि लेखक हे गणित आणखीनच वेगळं होतं. लेखकाला लेखक म्हणून उभं करणं म्हणजे तारेवरची कसरत, हे मला कळायला लागलं होतं. प्रकाशक सातत्याने सुहासचे पैसे बुडवत होते आज देऊ, उद्या देऊ करत पैसे न देणे भयंकर होतं. असं किती काळ चालणार? एकत्र कुटुंब असलं, तरी स्वतःचे पैसे लागतात. आपल्याला कमी लेखू नये, कोणी काही आडून बोलू नये अशीच प्रत्येक स्त्रीची इच्छा असते.

सुहासला आणखी एक कल्पना सुचली. आपणच आपलं प्रकाशन काढू आणि आपली आपली पुस्तके छापू. विचार चांगला होता, पण त्यासाठी पैसे हवेत. प्रेस घरचाच, म्हणजे भावाचा, पण त्यालाही कामाचे पैसे द्यावे लागणारच. बँक लोन करून प्रेस आणि प्रकाशन चालू केलं. सुंदर सुरू झालं. आनंद होत होता पण आनंद व्यक्त करायला वेळच मिळत नव्हता प्रेस मी सांभाळायचा होता. तो सांभाळणं म्हणजे गंमत नाही हे लवकर समजलं. घर, मुलगा, लेखक नवरा सांभाळणं हेही खूप अवघड होतं. हे करताना आपण आपल्या मनाचा विचार करायचा नसतो, कारण तो करायला फुरसत नव्हती. याला जीवनात जागाच नसते. खूप लहान वयात खूप काही शिकायला मिळत होतं. या काळात निरनिराळ्या छोट्या मोठ्या गोष्टींमध्ये आनंद मानायला शिकलो आणि ते फार महत्त्वाचं होतं. प्रेम आणि लग्न या व्यतिरिक्त आयुष्यात खूप काही असतं आणि धरसोड वृत्तीचा लेखक नवरा असेल तर बाप रे.

गुदमरलेल्या भावना आतल्या आत हृदय जाळतात. आयुष्यात काळं किंवा पांढरं असं काहीच नसतं. स्वतःला ओळखण्याच्या प्रवासात एक सुरुवातीचा आणि महत्त्वाचा टप्पा असतो आणि तो म्हणजे स्वतःच स्वतःला ओळखण्याची धडपड! सगळ्या भावनांकडे प्रामाणिकपणे पाहता यायला लागलं. टिकून राहणं आणि जगणं, जिंकणं आणि हरणं, हरणं आणि हरवणं यातला फरक जाणीव नेणिवांपर्यंत पोहोचायला लागतो. सुख-समृद्धी आणि समाधान यातला फरक ओळखता येतो. एकंदरीत, आम्ही बरेच हुशार झालो या काळात. मी मात्र मनाशी फक्त एवढेच म्हणायचे, “धीर धरी रे, धीरापोटी असतात फळे गोमटी” पण या वाक्याची गंमत मला वारंवार वाटे, कारण मी इतकी वर्ष तेच म्हणते, काय गंमत असते नाही?

परत एकदा लेखनाचा म्हणजे कादंबरी लेखनाचा कंटाळा. आता आपल्या लेखनावर टीव्ही मालिका सिनेमा करता येईल हा आनंद होता. त्यावेळी व्ही. के. नाईक, वसंत सबनीस दत्ताराम तावडे, राजदत्त भेटायला येऊ लागले. मनाला नवी पालवी फुटू लागली. कादंबरी लेखन आटू लागणं हीदेखील खरं म्हणजे नैसर्गिक घटना होती. केव्हातरी बदल हवाच की! वेगळे लेखन, वेगळी माणसं, खूप मोठं विश्व सुहासला अनुभवायचं होतं. सुप्रसिद्ध निर्माते दिग्दर्शक एन. चंद्रा यांच्यासाठी सुहास लेखन करायचा. त्याची राहण्याची सोय त्यांनी मुंबईत केली.

त्याच्या कादंबऱ्यांच्या प्रिंट परत परत येत होत्या. त्याच्या मुंबई पुण्याच्या खेपांमुळे मुलांचे शिक्षण, घर ही माझी न संपणारी आणि लोकांना न दिसणारी कसरत चालली होती, तरीदेखील सुहासबरोबर असण्यात खूप आनंद खूप समाधान मिळत गेलं. पडलेले कष्ट कधीच बोलून दाखवायला लागले नाहीत त्याच्या मनात मला खूप मोठे स्थान होतं. माझ्या आयुष्यात तर त्याच्यापेक्षा दुसरे काहीच मौल्यवान असू शकत नाही. त्याच्याबरोबर प्रत्येक क्षण मी भरभरून जगले. इतकं सगळं व्यवस्थित असूनही पुढे कसं व्हायचं, ही अस्थैर्याची भावना खुटखुटत राहायची. रात्रीचा दिवस करून कामं केली तरी खदखद राहायची. प्रश्नांची उत्तरं शोधताना दमछाक करत नवीन सकाळ सामोरी यायची. तासाचा काटा वेगाने सरकायचा आणि धावपळ संपली, की पुन्हा त्याच थांब्यावर थबकायचा. मग ही मालिकाच बनून गेली, कधी न संपणारी.

पैसे आले, गेले त्याचा हिशोब कधीच ठेवला गेला नाही. त्यापेक्षा आत्तापर्यंत किती लोक भेटले, किती मित्र झाले, किती परिवारातील झाले, हाही हिशोब ठेवणे अवघड झाले, पण त्यातूनच त्याला लिहिण्याची उर्मी येऊ लागली. शाळा, कॉलेजेस, वाचनालये, लायन्स, रोटरी क्लब, वसंत व्याख्यानमाला, साहित्यसंमेलने इत्यादी आमंत्रणे

येऊ लागली, त्यामुळे ठिकठिकाणी जाण्याचे योग आणि प्रत्यक्ष वाचकांना भेटणे, त्यांच्याशी जवळीक होणे यात फक्त त्याच्या स्वभावाला दाद द्यावीशी वाटते, कारण आपण एक लेखक आहोत हे विसरून मी तुमच्यातलाच एक आहे असे म्हणून राहणे कुठल्याही प्रसिद्ध व्यक्तीसाठी अवघड असते, पण ते त्याने मनापासून जपले.
त्याची प्रतिभा ही शोभादर्शकाप्रमाणे निरनिराळ्या कलाकृती घडवत होती त्यात जशा वेगवेगळ्या आकृत्या दिसतात तसेच त्याच्या लेखनाचे पैलू दिसून यायचे. त्यामुळेच मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत बऱ्याच लोकांनी त्याला गुलजारच्या आसपासचे लेखन आहे असे म्हणून आदराचे स्थान दिले होते हिंदी मराठी चित्रपटसृष्टीत खूप जण ओळखायला लागले होते.

काही माणसं क्षणाक्षणातून कणाकणातून जगण्याचा आनंद आस्वाद घेत असतात तसा सुहास कायम वेगवेगळ्या पातळीवरच्या अनुभवाला सामोरा जाण्यासाठी उत्सुक असायचा. त्याच्या भोवतालच्या वातावरणात तो इतका सहज एकरूप होऊन जायचा की तो स्वतः लेखकातला माणूस बाहेर काढणं विसरून जायचा. अगदी भल्याबुऱ्या गोष्टींसकट त्याचं जगणं चालू होतं. या सर्वांमुळे माझं आयुष्य त्याच्या बरोबरीने तसंच चालू होतं. पुस्तकाचे कॉपीराईट माझ्याकडे सोपवले, ते किती अवघड होतं.
प्रेस चांगला चालू होता पैसे बरे मिळत होते पण स्वास्थ मिळत नव्हतं. सुहासचं लेखन मंदावलं होतं. काय करावं कळेना बाहेरची म्हणजे प्रेसची कामं आणि लेखनात येणाऱ्या अडचणी यांनी सुहास सदैव अस्वस्थ असायचा अस्वस्थ होणे म्हणजे लेखन बंद! शेवटी प्रेस प्रकाशन हे दोन्ही बंद केले. वसुली बरीच करायला हवी होती. तो आटापिटा तर कोण भयंकर! त्यापेक्षा थकबाकीवर पाणी सोडून फक्त लेखनच करत राहावे, असं त्याला वाटत होतं.
सम्राट मोठा होत होता. त्याची शाळा, अभ्यास, शाळेत पोहोचवणं .... काम वाढलं, पण तो आनंद होता. त्याच काळात सुहासला रहस्यकथा लिहिण्याचा कंटाळा आला. मग आता काय? पुढे काय?
संपादक होण्याचं खूळ डोक्यात आलं. ते काही सोपं नव्हतं, पण नशिबाने या वेळेला खूप साथ दिली. 'पोलिसवाणी'अंक काढायचा मिहिर थत्ते आणि रत्नपारखी दोघांनी ठरवले आणि तसे प्रपोजल घेऊन घरी आले. या नवीन प्रयोगाने त्याला पछाडलं. सकाळ संध्याकाळ रात्र फक्त एकच विचार एकच बोलणं अंक अंक अंक. मन लावून काम करणं, दिलेला शब्द पाळणं हे सारं आनंदाने चालू होतं. त्यातून प्राप्ती होती तरी हमालीच जास्त होती. तरीही सुहासने नेटाने काम केलं. पैसे जास्त मिळाले नाही, तरी नाव उंचावत गेलं. लोक कौतुक करत होते. 'पोलिसवाणी' अंक बंद पडला. अमाप कष्ट घेऊन तिथेही यश आलं नाही, म्हणून नैराश्य.

त्या दिवसातल्या आठवणींच्या बरोबर सतत फिरणारा, रेंगाळत स्वतःलाच सावरणारा, प्रत्येकाबरोबर फूल होऊन उमलणारा, तर कधी आक्रंदन, आक्रोश करणारा, दुखलं खुपलं तरी न दाखवणारा, स्वतःच्याच विचारांनी स्वतःला छळून घेणारा सुहास पाहवत नसे. मी आणि माझ्या सोबतीला माझी पुतणी सुजाता शिरवळकर (आताची सुजाता महाजन) आम्ही त्याला त्या कंटाळ्यातून बाहेर काढण्यासाठी दरवेळी नवीन नवीन गोष्टी करायचो. कधी खूप दूर दूरपर्यंत चालत जायचं.... सुहासला चालण्याची फारच आवड होती. कधी पोहे, पापड वगैरे खात जुन्या गाण्यांविषयी गप्पा....त्यालाही माहीत होतं ते. ते टिकवण्यासाठी जे जे काही गमवावं व सोसावं लागलं ते वेगळंच पण त्यात कधी खंत, दुःख नव्हतं, कारण आज मला जे काही लोकांकडून मिळाले ते फक्त कॉपीराईट आणि त्यांची सुगंधावहिनी!

निवांत क्षणी गप्पांच्या ओघात तो म्हणायचा, "कोण कुठल्या जाती- धर्मात वाढला, घडला यापेक्षा कोणत्या अभिरुचीत घडला वाढला, यावर त्याची संस्कृती ठरते. माझं सुद्धा तसंच आहे. जे वाचत आलो, जे पाहत आलो त्यातच माझी जडणघडण झाली, असं मी म्हणेन. मी जो काही आत आहे त्यात बाहेरून काही ना काही चांगलं मिळत गेलं, त्याबरोबर वाईटही मिळत गेलं. ते मिळणं कधी थांबत नाही कारण माझी जातकुळीच मुळी कलाकाराची आहे. तसं असणं हा माझ्यातला माणूसपणाचा मोठा भाग आहे. माझ्यातून कलाकार जर बाहेर काढला तर मी कोणीही नाही. तरी कलाकारापेक्षा माणूस म्हणून जगणं वागणं मला मान्य आहे."

दुःखाने दुःखाचा गुणाकार होतो, असत्यातून असत्य प्रसवतं, तसेच सुखी समाधानी संसारातून प्रेम वाढतं, टिकतं. माणसाच्या सहवासात संकटाला सामोरे जाण्याचे धैर्य, बळ, कणखरपणा येतो. शहाणी सोबत माणसाला सबळ करते.

हे सगळं करत असताना शेवटी देवाने मोठा घाला घातला व होत्याचं नव्हतं झालं. काळाने सुहासची सोबत संपवली. झाडावरची सगळी पानं गळून पडलेली दिसली. अचानक जाणवलं, सर्वांच भयाण रूप! झोप नाही, भूक नाही. भकास डोळ्यांनी खोलीभर चालत राहायचं, खुर्चीत बसायचं, जावं निघून त्याच्यामागे. पण कसं? आपलं मनोधैर्य अपुरं पडलं किंवा त्याच्यावरचं प्रेम कमी पडलं.

लोक येत, जात होते, पण तोच एक प्रश्न समोर कायम उभा! उत्तर सापडत नव्हतं.

त्याच्या जाण्यानंतर मी मुलांना सांभाळणं तर दूरच राहिलं. ती केविलवाणी झाली होती. माझ्या हातात काहीच नव्हतं. डॉक्टर, मुलं, होणाऱ्या सुना, मित्रमैत्रिणी सतत मला सांभाळत होत्या. मी माणसांतच नव्हते. आयुष्यात माणूस निरर्थक गोष्टी करत राहातो, तसंच माझंही झालं होतं. जगणं देखील निरर्थक. नियतीने आयुष्याचे रस्ते वैराण वाळवंटात आणून सोडलेले, याच वाळवंटात आपण फिरत आहोत.

ज्याला आयुष्यभर जपायचा अट्टाहास चालला होता त्या मनात सुहासच्या जाण्यानंतर फक्त पालापाचोळा उरला होता. त्याच्या आठवणींचं ओझं आजही सहन होत नाहीये. प्रत्येक सकाळ त्याच्याविना अपुरी वाटते, प्रत्येक रात्र त्याच्या नावाने संपते, जणू प्रत्येक श्वासात त्याचं नाव कोरलं गेलं. प्रत्येक गाण्यात वाऱ्याच्या झुळकीत, पावसाच्या थेंबात आणि माझ्या मनात आणि माझ्या डोळ्यात, ओलाव्यात तोच आहे. काही क्षण अजून तसेच ताजे आहेत. त्याचं हसणं त्याचं बोलणं. डोळे मिटले तरी अजूनही त्याचा चेहरा समोर येतो. आता फक्त शांतता आहे. लोक म्हणतात, काळ सगळं भरून काढतो पण काळाने फक्त अंतर वाढवलं पण जखम नाही भरली. आता माझ्याकडे फक्त रिकामपण राहिलं आहे. विसरणं म्हणजे सुटणं! पण सत्य असं, की माणसं आयुष्यातून जातात, पण मनातून कधीच जात नाहीत. त्याला जाऊनही खूप वर्षं झाली, पण माझं मन अजून तिथेच थांबलं आहे. जीवन धावतं आहे आधी होतं, आताही आहे पुन्हा धावणं चालू आहे. कोणाला ठाऊक कुठपर्यंत कुणालाच कळत नाही, कळणार पण नाही क्वचित आपण थबकतो, गलबलतो, चुकचुकतो, खोल उसासा सोडून चालत राहतो, जीवन पुढे रेटत राहतो......

सुगंधा शिरवळकर

परिपूर्णतेच्या शोधात

मला कविता हा वाङ्मयप्रकार फार आवडतो. इथे येण्यापूर्वी माझं सर्व आयुष्य मुंबईत गेलं आणि मला नेहमीच वाटतं, की मुंबईचं घर आणि कविता या वाङ्मयप्रकारात बरेच साम्य आहे. मुंबईचं घर आणि कविता या दोन्हींना real- estate फार कमी असते. थोडक्या जागेत आणि अगदी थोडक्या शब्दांत बरंच काही achieve करायचं असतं!

कॅनेडियन कवी आणि गायक Leonard Cohen यांनी लिहिलेलं आणि गायलेलं Anthem हे गीतही तसंच.

गिरगावच्या चाळीतली छोटुकली घरं जशी त्यामध्ये राहणाऱ्या लोकांचा इतिहास, त्यांची personality, त्यांच्या आवडी-निवडी याची ओळख करून देतात, त्याप्रमाणेच "Anthem" द्वारा कोहेन स्वतःविषयी बरंच काही सांगून जातात.

Anthem चा इतिहास सांगण्यासारखा आहे. या कवितेवर कोहेनने जवळ जवळ बारा वर्षं काम केलं. त्या काळात समाजातच नव्हे, तर कोहेनच्या आयुष्यातही बरीच खळबळ होत होती. १९८०- ९० च्या दशकात शीतयुद्ध संपले होते, सोव्हिएत युनियन कोसळले होते, आणि अनेकांना वाटत होते, की जग नव्या सुरुवातीसाठी तयार आहे. पण प्रत्यक्षात समाज अधिक विभागलेला, भ्रष्टाचाराने भरलेला आणि हिंसक होत चालला होता. कोहेन स्वतःसुद्धा नैराश्य, भ्रमनिरास, आणि आध्यात्मिक संघर्षाशी झगडत होते. म्हणूनच, त्यांनी त्या काळात त्यांची अनेक वर्षे बौद्ध मठांमध्ये आध्यात्मिक सत्याच्या शोधात काढली. Anthem ही कविता म्हणजे त्या समुद्र मंथनातून निघालेलं अमृत आहे. ती संपूर्ण कविता फारच वाचण्यासारखी आहे पण त्यातल्या एकाच कडव्याचे उदाहरण देतो:

Ring the bells that still can ring
Forget your perfect offering..
There is a crack, a crack in everything
That's how the light gets in!

परिपूर्णतेचा आग्रह (perfectionist attitude) अनेकदा नैराश्य, चिंता आणि OCD च्या मुळाशी असतो. परिपूर्णतावाद (perfectionism) म्हणजे मिठासारखा असतो. ती (perfectionism) attitude आयुष्यात थोडीफार असणं महत्वाचं आहे, पण ती अति झाली तर आयुष्याची माती करू शकते. म्हणून, आयुष्यात बऱ्याच वेळा अपूर्णत्व (imperfection) स्वीकारणं फार महत्वाचं आहे.

Perfectionist लोकांच्या बऱ्याच गोष्टी वाखाणण्यासारख्या असतात: ते सर्वच गोष्टी फार जबाबदारीने करतात, त्यांची चिकाटी भक्कम असते, त्यांचं काम नेहमीच उच्च दर्जाचं असतं आणि त्यांची "what- if" विचारसरणी अनेक संकटे टाळू शकते.

पण याकरता perfectionist लोक कळत- नकळत बराच sacrifice करतात. त्यांना त्यांच्या छोट्या- छोट्या चुका सुद्धा मोठ्या अपयशासारख्या वाटतात आणि अपयशाच्या भीतीमुळे ते काही वेळा risk घ्यायला तयार नसतात. ते इतरांकडून सुद्धा परिपूर्णतेची अपेक्षा ठेवतात. त्यांच्या जोडीदारांना, सहकाऱ्यांना किंवा मुलांना “It is never enough" असं वाटू लागायला वाटतं.
म्हणून कोहेनचा हा सल्ला: Forget your perfect offering.

एवढेच नाही, तर कोहेन असे सुचवतो “ प्रगती चुकांमुळे होते.” "That's how the light gets in"
एकदा माणसाने ठरवलं की त्याने बनवलेली गोष्ट "perfect" आहे, तर ती सुधारण्याचे कारणच राहणार नाही, बरोबर ना?



चंद्रगुप्त शशिशेखर वेदक
मानसविचारतज्ज्ञ, शिकागो, इल्लिनॉईस
Song in ref:
https://www.youtube.com/watch?v=6wRYjtvIYK0

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी । एकतरी ओवी अनुभवावी

श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ हिंदू धर्मातील सर्वात महत्वाच्या पवित्र ग्रंथांपैकी एक मानला जातो. हा ग्रंथ व्यक्तीच्या कर्तव्य पालनसाठी आणि जीवनाच्या अंतिम वास्तवासाठी एक मार्गदर्शक स्तंभ आहे. भारतीय जनमानसात हजारो वर्षे श्री भगवद्गीतेचे अनन्यसाधारण महत्व मानले गेले आहे. महाराष्ट्र मंडळाच्या 'रचना' साठी २०२५ ह्या वर्षीचा 'एकतरी ओवी...' शेवटचा लेखांक लिहायला मला आनंद होतो आहे. लेखासाठी अनेक विद्वानांच्या ग्रंथांचे संदर्भ आहेत, त्यांचे आभार. पहिल्या तीन लेखांना वाचकांनी दिलेल्या प्रतिक्रियांबद्दल वाचकांचे मनःपूर्वक आभार!

जवळजवळ साडेसातशे वर्षांपूर्वी, श्री क्षेत्र नेवासे येथे एका खांबाला टेकून बसलेल्या योगिराज माऊलींनी, भगवद्गीतेवरील जे भाष्य सांगितले, ते केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण विश्वाचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवन समृद्ध करून गेले. ते योगिराज म्हणजे संत ज्ञानेश्वर महाराज, माऊली आणि त्यांनी सांगितलेले अमृततुल्य भाष्य म्हणजे 'भावार्थदीपिका' अर्थात आपली लाडकी 'ज्ञानेश्वरी'. ज्ञानेश्वरी हा केवळ एक ग्रंथ नाही, तर तो एक चैतन्याचा झरा आहे, जो आजही लाखो भाविकांच्या जीवनात शांती आणि समाधानाचे सिंचन करत आहे. पावसच्या स्वामी स्वरूपानंदांनी ज्ञानेश्वरींचा नित्यपाठ बनवला आहे. ज्ञानेश्वरीमधील सुमारे १०० महत्वाच्या ओव्यांचे नियमित वाचन करण्यासाठी अत्यंत मार्गदर्शक असा हा पाठ आहे. स्वामींना शतशः प्रणाम! मी पूर्वी निवडलेल्या ओव्या, अर्थ त्यावर आधारित होत्या आणि आता ही ओवी देखील नित्यपाठामधील आहे. याच ज्ञानसागरातील, तिसऱ्या अध्यायातील, ८१ व्या क्रमांकाची ओवी आज आपण समजून घेणार आहोत.

स्वधर्म जो बापा | तो नित्ययज्ञ जाण पां |
म्हणौनी वर्ततां तेथ पापा |संचारू नाहीं || ३-८१||

तिसऱ्या अध्यायात कर्मयोगाचे महत्त्व सांगताना ही ओवी येते. या ओवीतून त्यांनी "स्वधर्म" म्हणजेच स्वतःचे कर्तव्य, आणि त्याचे आध्यात्मिक स्वरूप स्पष्ट केले आहे. याचा शब्दशः अर्थ असाः
स्वधर्मु जो बापा – जो आपला धर्म, म्हणजेच आपले कर्तव्य, प्रामाणिकपणे पार पाडतो. (धर्म म्हणजे religion हा अर्थ अभिप्रेत नाही)
तोचि नित्ययज्ञु जाण पां – तोच प्रतिदिन यज्ञ करतो, म्हणजेच त्याचे कर्म हेच यज्ञस्वरूप आहे.
म्हणोनि वर्ततां तेथ पापा संचारु नाहीं – म्हणून अशा कर्मात पापाचा प्रवेश होत नाही.

ही ओवी गीतेतील ह्या मूळ श्लोकावर लिहिली आहे:

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर।।३-९।।

अर्थ: यज्ञाकरिता केलेल्या कर्माशिवाय इतर सर्व कर्मे मनुष्यप्राण्यांना बंधनात टाकतात. म्हणून, हे कुंतीपुत्रा (अर्जुना), आसक्ती सोडून तू आपले कर्तव्य कर्म यज्ञासाठी (देवासाठी किंवा धर्मपालनासाठी) कर.

या ओवीत कर्मयोगाचा गाभा आहे. माऊली अर्जुनाला, आणि पर्यायाने आपणा सर्वांना, पित्याच्या वात्सल्याने ‘बापा’ अशी प्रेमळ हाक मारून सांगतात, की अरे पार्था, जो आपला ‘स्वधर्म’ आहे, म्हणजेच जे आपले स्वाभाविक, विहित आणि नियत कर्म आहे, तोच खरा ‘नित्ययज्ञ’ आहे, हे तू नीट समजून घे. आणि म्हणूनच, त्या स्वधर्माचे आचरण करत असताना, तिथे पापाचा शिरकाव होत नाही

प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, म्हणजेच त्याचे गुण, क्षमता आणि स्वाभाविक कल हे भिन्न असतात. या प्रकृतीनुसार, प्रत्येकासाठी काही विशिष्ट कर्मे नेमून दिलेली असतात. हीच कर्मे म्हणजे त्या व्यक्तीचा 'स्वधर्म' होय. स्वधर्म म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे नैसर्गिक, सामाजिक, आणि आध्यात्मिक कर्तव्य. हा धर्म जात, वर्ग, व्यवसाय यावर आधारित नसून, अंतःकरणातील प्रामाणिक प्रेरणेवर आधारित आहे. तत्कालीन समाजरचनेनुसार भगवद्गीतेमध्ये उदाहरणे दिसतात, परंतु त्याचा भावार्थ आजच्या काळातही तितकाच समर्पक आहे.

आजच्या काळात डॉक्टरने रुग्णांची सेवा करणे हा त्याचा स्वधर्म आहे, शिक्षकाने निष्ठेने विद्यार्थ्यांना शिकवणे हा त्याचा स्वधर्म आहे, शेतकऱ्याने प्रामाणिकपणे धान्य पिकवणे हा त्याचा स्वधर्म आहे. सॉफ्टवेअर प्रोग्रामरने आपले ज्ञान अद्ययावत ठेवून उत्तम कॉम्पुटर प्रोग्रॅम लिहून कंपनीचा वेळ आणि पैसे वाचवणे हा त्याचा स्वधर्म आहे. इतकेच काय प्रत्येक व्यक्तीने आपली कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जबाबदारी निष्ठेने पार पाडणे हा त्याचा किंवा तिचा स्वधर्म आहे!

'यज्ञ' म्हटला की धगधगणारे कुंड आणि मंत्रघोषात आहुती टाकणारे पुरोहित असे दृश्य काहींच्या डोळ्यापुढे येते. पण इथे भगवान यज्ञ हा शब्द व्यापक अर्थाने वापरतात. श्रीकृष्ण आणि माउली यांनी 'यज्ञ' या शब्दाला एक व्यापक, वैश्विक आणि अत्यंत उदात्त अर्थ दिला आहे, ते कर्माला यज्ञ मानतात. यज्ञ करण्यात समर्पण, त्याग, आणि शुद्धता आवश्यक आहे.‘नित्ययज्ञ' म्हणजे दररोज, अखंडपणे आणि सातत्याने केला जाणारा यज्ञ. जेव्हा आपण आपले कर्तव्य निःस्वार्थपणे पार पाडतो, तेव्हा ते कर्म यज्ञासारखे पवित्र होते. अशा कर्मात पापाचा संचार होत नाही. हेच कर्मयोगाचे तत्त्व आहे.

जेव्हा आपण आपले काम, मग ते कोणतेही असो, केवळ एक कर्तव्य म्हणून नव्हे, तर ईश्वराची पूजा समजून, फळाची अपेक्षा न ठेवता, म्हणजेच निष्काम भावनेने करतो, तेव्हा ते कर्म 'यज्ञ' बनते. या नित्ययज्ञात आपल्या कर्तव्याची समिधा असते, निष्ठेचे तूप असते आणि समर्पणाचा अग्नी असतो. या यज्ञामुळे केवळ आपलेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे आणि पर्यायाने विश्वाचे चक्र सुरळीत चालते.
स्वधर्म पालनाने पापाचा नाश कसा नाहीसा होतो? जेव्हा एखादी व्यक्ती आपले कर्म हे 'स्वधर्म' आहे या भावनेने करते, तेव्हा तिच्या मनात त्या कर्माबद्दल आसक्ती, फळाची अपेक्षा किंवा अहंकार राहत नाही. तिचे कर्म हे सहज आणि स्वाभाविक होते. उदाहरणार्थ, युद्धासारखे हिंसक कृत्य अर्जुनासाठी पापमय होते, कारण तो ते 'मी करत आहे', 'माझे आप्तजन मरतील' या भावनेने पाहत होता. दुष्ट प्रवृत्तीचा नाश हे क्षत्रियकर्म त्याने आपले कर्तव्य मानले नाही. पण जेव्हा भगवान श्रीकृष्ण त्याला सांगतात की अरे, युद्ध करणे हा तुझा क्षत्रिय म्हणून 'स्वधर्म' आहे, त्यासाठी तू आणि तुझे बांधव धर्म आणि न्यायोचित भावनेने इथे आलात. आता हे क्षात्रकर्म तू केवळ माझे निमित्तमात्र होऊन कर, तेव्हा त्या कर्मातील पाप नाहीसे होईल. जेव्हा कर्मामागील हेतू शुद्ध असतो, ते कर्म ईश्वराला अर्पण केलेले असते, तेव्हा ते कर्म बंधनाचे कारण ठरत नाही. उलट, तेच कर्म साधनेचा, उपासनेचा आणि मुक्तीचा मार्ग बनते. स्वधर्माचे पालन न करणे, म्हणजेच आपले कर्तव्य टाळणे, हेच खरे पाप आहे,
आज समाजात अनेक पातळ्यांवर अशांतता, असमाधान आणि मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. याचे एक प्रमुख कारण म्हणजे 'स्वधर्मा'ची विस्मृती!

व्यावसायिक जीवनात आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अनेकदा चुकीच्या मार्गांचा अवलंब केला जातो. भ्रष्टाचार, भेसळ, फसवणूक यांसारख्या गोष्टी वाढीस लागल्या आहेत. याचे मूळ कारण म्हणजे, आपले काम हे 'नित्ययज्ञ' आहे, ही भावना लोप पावत चालली आहे. जर प्रत्येक डॉक्टर, अभियंता, वकील, शिक्षक, व्यावसायिक आणि कामगार आपले काम निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि समाजाप्रती आपले कर्तव्य समजून करू लागला, तर समाजातील अनेक समस्या आपोआपच सुटतील.

हिब्रू भाषेमध्ये काम (नित्यकर्म), सेवा आणि उपासना अशा तीनही गोष्टींसाठी Avodah हा एकच शब्द वापरला आहे, त्यांच्या धर्मग्रंथात त्या संदर्भाने लिखाण आहे. Work is Worship हे पाश्चात्य जगात प्रसिद्ध असलेले वचन, माऊलींनी 'स्वधर्मु तोचि नित्ययज्ञु' यातून खूप आधीच आणि अधिक गहन अर्थाने सांगितले आहे.

कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात कुटुंब आणि समाज हे व्यक्तीच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. पीडितांची सेवा करणे, मुलाबाळांचे योग्य संगोपन करणे, शेजाऱ्यांशी सलोख्याने वागणे, समाजातील नियमांचे पालन करणे, हे सर्व 'स्वधर्मा'चेच भाग आहेत. जेव्हा आपण या जबाबदाऱ्या टाळतो किंवा त्या ओझं म्हणून पार पाडतो, तेव्हा कुटुंब आणि समाजात कलह आणि अशांतता निर्माण होते. परंतु, जेव्हा आपण या जबाबदाऱ्या प्रेमाने आणि आपुलकीने, आपले कर्तव्य समजून करतो, तेव्हा तेच काम ‘यज्ञ’ बनते, घर 'मंदिर' बनते आणि समाज 'स्वर्ग' होतो.

ही ओवी सामान्य माणसाला जीवनाचा एक अत्यंत सोपा आणि सरळ मार्गदर्शक मार्ग दाखवते. देवप्राप्तीसाठी किंवा आध्यात्मिक उन्नतीसाठी घर-संसार सोडून अरण्यात जाण्याची, कठोर व्रत-वैकल्ये करण्याची किंवा अवघड योगाभ्यास करण्याची आवश्यकता नाही, असे माऊली सांगतात. तुम्ही जिथे आहात, जे काम करत आहात, तेच काम अत्यंत श्रद्धेने आणि प्रामाणिकपणे करा. तेच तुमची साधना, तोच तुमचा यज्ञ आणि तोच तुमच्या मुक्तीचा मार्ग ठरेल.
माउलींनी 'स्वधर्म' आणि 'नित्ययज्ञ' या दोन संकल्पनांची सांगड घालून, कर्मालाच साधनेचे आणि उपासनेचे स्वरूप दिले आहे. ही ओवी आपल्याला शिकवते की, आपले जीवन, आपली कर्तव्ये आणि आपली जबाबदारी यांपासून पळून जाण्यात मुक्ती नाही, तर त्यांना स्वीकारून, त्यांनाच ईश्वरी कार्य समजून, निष्काम भावनेने पार पाडण्यातच जीवनाची सार्थकता आहे.

अध्यात्म हे फक्त मंदिरातच नाही, तर आपल्या रोजच्या कामात आहे.

श्रीदत्त राऊत, शिकागो

रोझमेरी - मला जिने Thanksgiving चा खरा अर्थ शिकवला.

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट! आता Thanksgiving जवळ आल्याने जुन्या आठवणी तरंगत मनामध्ये वर आल्या आहेत. आम्ही मिलवॉकीहून गर्नीला राहायला आलो होतो. या भागात आमची कोणाशी विशेष ओळखपण नव्हती. तशी या देशात येऊनही १-२ वर्षंच झाली होती. त्यामुळे जरी इथले रीतीरिवाज, सणवार मी नव्याने शिकत असले तरी त्यात पारंगत झाले नव्हते. Thanksgiving हा त्यातलाच एक सण! या दिवशी टर्कीच्या जेवणाला खूप महत्व असते. सर्व फॅमिली, फ्रेंड्स एकत्र जमून जेवण करतात एवढीच जुजबी माहिती मला होती.

मला टर्की कशी करतात हे माहीत नव्हते. आमची कोणी फॅमिली अगर फ्रेंड्स पण नव्हते. त्यामुळे आमचे जेवण फक्त चौघांचेच. मी, माझे यजमान आणि आमची दोन मुले. आमचे जेवण घरीच होणार हे निश्चित होते.

त्यावेळी मी नुकतीच बँकेत नोकरीला लागले होते. Thanksgiving च्या आधी एकदोन दिवस बरोबर काम करणाऱ्या सर्व मुलींच्या त्या कोणाकडे जेवायला जाणार का, त्यांच्याकडे कोण येणार या विषयावर गप्पा चालल्या होत्या. मी मात्र अगदीच गप्प होते. कारण माझ्याकडे बोलण्यासारखे काहीच नव्हते.

रोझमेरी ही वरच्या मजल्यावरच्या Loan Department मध्ये काम करणारी. मी टेलर विंडोला असल्यामुळे माझ्या विंडोवर ती बरेचदा पैसे काढायला यायची. त्यामुळे माझी तिच्याशी बऱ्यापैकी ओळख झाली होती. थोडीशी ठेंगणी- ठुसकी, सदोदित तोंडावर हसू, चालताना अगदी चपळ व दोन्ही हात हलवत चालणारी रोझमेरी मला खूप आवडायची!

Thanksgiving च्या आदल्या दिवशीचा बुधवार.

सर्वजणी जरा लवकर काम आटपून घरी जाणार होत्या. मला इतकी घरी जाण्याची घाई नव्हती. त्यामुळे मी शांत होते. इतक्यात रोझमेरी चेक cash करायला माझ्या विंडोशी आली, नेहमीप्रमाणे गप्पा मारू लागली. तिने मला विचारले, “उमा, तम्ही उद्या कोणाकडे जाणार आहात का? की तुमच्याकडे कोणी येणार आहे?”

मी म्हटले, “नाही. आम्ही कोणाकडे जाणार नाही आणि आमच्याकडे पण कोणी येणार नाही. आम्ही काही महिन्यांपूर्वीच इकडे रहायला आलो. त्यामुळे, आमच्या कोणाशी विशेष ओळखी नाहीत.”

रोझमेरी चटकन म्हणाली, “ मग उद्या तुम्ही सर्वजण आमचाकडे डिनरला या.” लगेच तिने आपला फोन नंबर व पत्ता मला लिहून दिला. कसे व किती वाजता यायचे ते पण सांगितले. मला काय बोलावे ते कळेना! या एका कामावर भेटणाऱ्या व्यक्तीने अल्पशा ओळखीवर केवळ आमचे इथे कोणी नाही हे ऐकून माझ्या अख्ख्या कुटुंबाला तिच्याकडे जेवायला बोलावले होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही चौघेजण तिच्याकडे जेवायला गेलो. तसे तिचे घर अगदी छोटेसेच होते. पुढचा हॉल व स्वयंपाकघर माणसांनी भरून गेले होते. आम्हाला पाहताच रोझमेरी लगबगीने बाहेर आली व माझा हात धरून आम्हा चौघांनाही आत घेऊन गेली. तिने आमची सर्वांशी ओळख करून दिली. त्यात तिचे मिस्टर नव्हते. ते गेले असावेत किंवा त्यांचा divorce झाला असावा असा अंदाज मी बांधला. तिच्या फॅमिलीने पण आम्हाला सामावून घेतले. आधी सर्वजण TV वर गेम पाहात होते. नंतर सर्वजण मिळून गेम खेळायला लागले. माझ्या दोन छोट्या मुलांना त्यांच्यामध्ये त्यांनी बसवून घेतले. गेम समजावून दिला. त्यामुळे मुलेपण त्यांच्यात रमून गेली. सध्याकाळी जेवण वगैरे करून प्रसन्न मनाने आम्ही घरी आलो. मुलेपण खूप आनेदात होती. एक गोष्ट त्यावेळी माझ्या मनावर ठसली ती म्हणजे, Thanksgiving च्या दिवशी सर्वजण एका मोठ्या टेबलावर जेवायला बसतात. मध्ये निरनिराळ्या पदार्थांच्या तयार केलेल्या डिशेस असतात. कोणीतरी सुरुवात करून एक डिश उचलते, स्वतःच्या पानात थोडासा portion घेऊन समोरच्या व्यक्तीला देते. म्हणजे ती डिश किंवा तो पदार्थ एकाकडून दुसऱ्याच्या हातात पुढेपुढे सरकत जातो. मला वाटतं त्याचा खरा अर्थ सर्व कुटुंबीय, मित्रमंडळी एकत्र जमतात व प्रेमाचा, मैत्रीचा ओलावा असाच स्वतःकडून पुढे पाठवतात. या दिवशी christmas सारखी कोणी कोणाला गिफ्ट देत नाही. गिफ्ट असते ती मैत्रीची, नात्याच्या घट्ट धाग्यांची. त्यामुळे हा सण मला खूप भावला.
रोझमेरीच्या घरी आम्ही साजरा केलेल्या Thanksgiving ला आता खूप वर्षं होऊन गेली. आता रोझमेरी या जगात आहे की नाही आणि असलीच तर कुठे आहे हे मला माहीत नाही. पण तिने मला जी आपुलकी दाखवली, स्वतःच्या कुटुंबात एका दिवसासाठी का हाईना सामावून घेतले, हे सर्व माझ्या मनात घर करून राहीले आहे. प्रत्येक thanksgiving ला तिच्या घरात घालवलेल्या त्या दिवशीच्या आठवणी मनाच्या वर तरंगत येतात.

रोझमेरीने मला Thanksgiving च्या खरा अर्थ समजावून दिला. आज माझी मुले मोठी झालीत व माझ्या मोठ्या मुलीच्या घरी आमचा हा सण साजरा होतो. बऱ्याच वेळा आमचे मित्र व दूरचे नातेवाईकसुद्धा जेवणाच्या टेबलावर असतात. प्रत्येकजण असेच प्रत्येक पदार्थाच्या डिशेस स्वतः घेऊन मग पुढच्या व्यक्तीकडे सरकवतात. नंतर ग्लास वर करून टोस्ट करतात. मी वरती छताकडे पाहून आकाशातल्या ज्या कोणी रोझमेरी असतील त्यांना टोस्ट करते व मनात म्हणते, “Amen!!”

अुमा नरेंद्र दिघे

कविता का वाचावी?

बरेच जण कवितेच्या प्रांगणात पाऊल ठेवायला जरा बिचकतात. कारण कविता म्हणजे थोडे शब्द एकमेकांसमोर ठेवलेले आणि काहीतरी अगम्य असंच वाटतं लोकांना! आणि चूक त्यांचीही नाही म्हणा! कवितेचे पदर उलगडून दाखवण्याइतका वेळ आपल्या शिक्षकांना असतो कुठे? दोष नाही देत, त्यांना तेवढा वेळ ही नसेल कदाचित!

पण कविता हे एक असं माध्यम आहे, ज्यात अंतर्मुख व्हायला होतं! आपल्या जगण्याच्या , शिक्षणाच्या, वाचनाच्या परिघातून म्हणा किंवा संदर्भातून म्हणा, दुसऱ्याच्या अभिव्यक्तीचा (लिखाणाचा) विचार केला जाऊ शकतो. सध्याच्या माईंडफुल असण्याच्या जमान्यात कविता हे माईंडफूल असण्याचं एक मोठंच साधन आहे, असं मला वाटतं. तुकारामांच्या भाषेत सांगायचं. तर “आपुलाचि वाद आपणांसि” घालायचं ते एक उत्तम साधन आहे.

पण ‘आम्हाला कविता कळत नाही हो’ असं म्हणणारे पुष्कळ असतात. खोटं कशाला बोला, ग्रेसांच्या किंवा आरती प्रभूंच्या काही कविता वाचताना असे गळे मीही काढले आहेत. परंतु, तरीही कविता ही एक निखळ आनंदाचा भाग बनू शकते, यावर माझा ठाम विश्वास आहे, म्हणून हा लेखन प्रपंच!

“न था कुछ, तो खुदा था!
न होता कुछ, तो खुदा होता!
डुबोया मुझको होने ने,
न होता मैं, तो क्या होता?”

गालिबच्या या काही ओळी! आता प्रथम वाचताना, हे काय होना, न होना लावलंय असं वाटतं ना? पण याची थोडी पार्श्वभूमी जाणून घेतली की थोडं सोपं वाटतं! पार्श्वभूमी अशी, की गालिब हा नास्तिक होता. तुम्ही म्हणाल, की नास्तिक काय, इथे तर दर ओळीत त्याच्या देवाचं नाव घेतोय! थोडा धीर धरा .... तर तो म्हणतोय की, जेव्हा काही नव्हते, तेव्हा देव होता. काही नसले, तरी देव असणारच आहे (म्हणजे असं त्यांचे धार्मिक ग्रंथ सांगतात). तर मग गालिब, तू जन्माला येऊन चूक केलीस कारण तू नसतास तर काय असतास? अर्थात- देव असतास! आहे की नाही विचार करायला लावणारा युक्तिवाद?

“क्षितिजी आले भरते गं,
घनात कुंकुम खिरते गं,
झाले अंबर, झुलते झुंबर,
हवेत अत्तर तरते गं !”

या बोरकरांच्या ओळी पहा! ज्याला सर्वसाधारण मराठी येतं, तो ही म्हणेल की या ओळी सोप्या आहेत! बोरकरांना काय म्हणायचंय, हे अगदी नेमकं डोळ्यांसमोर उभं राहिलंय! पण नुसतं तेच नाही, तर या ओळी वाचताना, त्या आपोआप आपण एका लयीत वाचतो, मनाचे श्लोक वाचावेत तसं नाही तर गुणगुणत! यालाच गेयता म्हणतात. बोरकर फक्त त्यांच्या काव्यासाठी नाही, तर गेयतेसाठीही प्रसिध्द होते.

शिवाय, कवी म्हटला म्हणजे त्याने कुर्ता पायजमा घालून शबनम बॅग गळ्यात लटकावूनच आलं पाहिजे या प्रतिमेला सुध्दा छेद देणारे होते बोरकर! पुलं त्यांचे घनिष्ठ मित्र! आणि पुलं ना लिहिलंय
की सुटाबुटात वावरणारा हा एकच कवी त्यांना माहीत होता! So ultimately, one can say, that the exception proves the rule, or we can also say every rule has an exception! नाही का?

थोडक्यात, कविता कुठच्या बंधनातच असली पाहिजे असं काही नाही!

जेथे थकून सारे यात्रीच बैसले,
पाऊल पांगळ्याचे, तेथे अडू नये !

सुरेश भट हे जेव्हा लिहून जातात तेव्हा अपंग लोकांना त्यांनी करावयाच्या अपार कष्टाची ते जाणीव करून देतात. इतकंच नाही, तर शारीरिक दृष्ट्या सबल असणाऱ्या लोकांनाही तसं समजावून देतात, असं नाही वाटतं?

बरं, कविता नुसतीच उपदेशाचे डोस पाजते असं वाटत असेल तर, भाऊसाहेब पाटणकरांच्या या ओळीवर नजर टाका जरा...

"मानितो देवासही, ना मानितो ऐसे नव्हे !
मानितो इतुकेच की, तो आमुचा कुणी नव्हे !
आहो असे बेधुंद, अमुची धुंदही साधी नव्हे ,
मेलो तरी वाटेल, मेला दुसरा कुणी ...
आम्ही नव्हे !!"

हसायला आलंच असेल ! येणारच, कारण कविता ही अशीच आपल्या कुठच्या भावनांना हात घालते! त्यासाठी तुम्ही त्या कवीशी संमत असायलाच पाहिजे असाही आग्रह नाही!
हेच उदाहरण पहा ...

"ये महलों ये तख़्तों ये ताजों की दुनिया
ये इंसाँ के दुश्मन समाजों की दुनिया
ये दौलत के भूखे रिवाजों की दुनिया
ये दुनिया अगर मिल भी जाए तो क्या है?
हर इक जिस्म घायल हर इक रूह प्यासी
निगाहों में उलझन दिलों में उदासी
ये दुनिया है या 'आलम-ए-बद-हवासी
ये दुनिया अगर मिल भी जाए तो क्या है?"

तुम्ही म्हणाल, ही कविता कुठेय? हे तर पिक्चरमधलं गाणं आहे! पण ही कविताच आहे जे गाणं म्हणून समाविष्ट केलंय पिक्चरमधे! अशी किमया करू शकणारे फार थोडे जे प्रतिभावंत कवी होऊन गेले, त्यात साहिर लुधियानवी हे नाव फार उच्च आहे! त्यानेच या ओळी लिहिल्यात. ज्याने ज्याने म्हणून जीवनात काही स्ट्रगल केलाय तो या शब्दांत वर्णन केलेल्या वळणावरून गेलाच असणार. या ओळी मनाला भिडतात आणि लक्षात राहतात ते याच साठी की यात वर्णन केलेल्या खंतीत, निराशेत आपण ही स्वत:ला कधीतरी पाहिलेलं असतं!

म्हणूनच अमृता प्रीतम ही लिहिते की,

"हे जीवन आहे,
जे मी सिगरेटसारखं फुंकलं आहे,
फक्त काही कविता आहेत,
ज्या मी राखेसारख्या झटकल्या आहेत"

आता यात तिला कविता सहजच सुचतात असा अर्थ तर आहेच पण ती ज्या कलंदर पद्धतीने तिचं जीवन जगली (जीवन फुंकलं) त्याला ती आपसूक स्पर्श करून जाते आणि त्या जीवनानुभवातून आलेले तिचे शब्द कविता म्हणून येतात. ज्या ती सहजतेने लिहिते - असंही जाणवतं. कुणी म्हणेल, आम्हाला काय माहीत अमृता प्रीतम कशी जगली ते? मग आम्ही कसं जाणावं? बरोबर आहे. पण जरी तिची पार्श्वभूमी माहीत नसली, तरी सिगरेटसारखं जीवन फुंकून टाकण्यातली बेदरकारी या शब्दांतून नक्कीच जाणवली असणार! आणि न्यूटनच्या तिसऱ्या नियमानुसार, प्रत्येक कृतीला प्रतिक्षिप्त क्रिया असते, त्याप्रमाणे , तसं जीवन जगल्यावर आलेले अनुभव ती सिगरेटमधून राख झटकावी तसे आपल्या लेखणीतून झटकते हे ही जाणवलं असेलच! ही जी जाणीव नेणिवेची प्रक्रिया, तीच "कविता समजणे"!

आता हे सगळं वाचताना, तुम्ही तुम्हाला आवडणाऱ्या, आठवणाऱ्या काही कवितांचा , ओळींचा नक्कीच विचार करत असणार! तर असा विचार करायला लावणं व reading between the linesची सवय लावणं यासाठीच कविता वाचावी असं मी म्हणेन! आणि यावर चर्चा करायची असेल तर महाराष्ट्र मंडळाच्या साहित्यकट्ट्यावर जरूर येऊन ती करावी असंही सुचवीन.

वैशाली बेलसरे

मरण इतके सुंदर असू शकते!

Thanksgiving झाले तरी अजून काही झाडांवर कलर्स आहेत. इतक्या उशिरा फॉल कलर्स दिसणे हे विशेष.

अमेरिकेत आपण सगळेच नेहमी ही रंगांची उधळण बघतो. एका लेखकाने हे सुंदर रंग बघून म्हटले आहे "मरणही इतके सुंदर असू शकते". हे वाचल्यापासून दर फॉल सीझनला मला हे त्यांचे वाक्य आठवते. किती नेमके वर्णन त्यांनी केले आहे.

अमेरिकेत आल्यापासून गेली आठ-दहा वर्षे मी हे झाडांनी केलेली रंगांची उधळण बघत असते. दर वर्षी तीच झाडे, पण वेगळी वाटतात. अस्पेन, बीच, मेपल, बर्च, गम ट्रीज, ऑक ही त्यातली काही झाडे ऑळखीची झाली आहेत. बर्निंग बुशही खूप छान दिसतात, एकदम लालभडक. नेहमी हिरव्या रंगांची कुठलीतरी छटा दाखवणारी ही झाडे आत्ता मात्र कधी पूर्ण पिवळी, कधी एकाच झाडावर हिरवी, पिवळी व केशरी पाने, कधी पूर्ण झाड केशरी अशी वेगवेगळी दिसतात. एव्हरग्रीनसारखी झाडे मात्र हटवादीपणाने आपला हिरवा रंग सोडायला तयार नसतात ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून हे रंग दिसायला लागतात. साधारण दोन आठवडे ही रंगांची उधळण आपल्याला दिसते. हे दिवस थोडेफार इकडे तिकडेही होतात. त्यानंतर या झाडांचे एकदम खराटे होतात आणि थंडी आली असे जाणवायला लागते.

स्प्रिंगमध्ये झाडांना पालवी आल्यापासून ते उन्हाळा संपेपर्यंत या झाडांची पाने हिरवीगार असतात. तेव्हा पानांचे क्लोरोफिल, सूर्यप्रकाश व पाणी यांच्या साहाय्याने जोमाने अन्न बनविण्याचे काम चालू असते. या वेळेस सुद्धा पानात इतर रंग असतात, पण ते क्लोरोफिलमुळे लक्षात येत नाहीत. हिरवा रंग प्रॉमिनंट असतो. उन्हाळा संपला, की दिवसाची लांबी कमी होते, सूर्यप्रकाश कमी होतो व हळूहळू फोटो सिंथेसिस पण कमी होते. मग हिरवा रंग मागे पडतो व इतर रंग डोकावतात व शेवटी आपले अस्तित्व दाखवतात. गाजर, केळी, बीट यांचे रंग जसे काही रंगद्रव्यांमुळे बनतात तसेच हे. हे रंग कधी कमी, तर कधी जास्त दिसतात. दोन आठवड्यात सगळी पाने गळून जातात. मला नेहमी वाटते हा रंगांचा सीझन चांगला एक-दोन महिने चालावा. पाऊस, उन्हाचे प्रमाण या दोन्हींचा रंगांवर परिणाम होतो. या खाली पडलेल्या पानांचे चांगले खत तयार होते.

इथले टूरिझम डिपार्ट्मेंट या रंगपंचमीचा फायदा घेतल्याशिवाय कसे राहाणार? नॉर्थला आधी फॉल येतो. ठिकठिकाणच्या फॉल कलर्सच्या जाहिराती येतात व टूर्स निघतात. कलर्स किती आले आहेत, याचे अपडेट इंटरनेट वर उपलब्ध असतात. स्टेट पार्क्स, नॅशनल पार्क्स व काही सिनिक रूटस खरोखर सुंदर आहेत.

स्मोकी माउंटन एरिया मस्त दिसतो या दिवसात. डोंगरावर तिथे भरपूर झाडी आहे. त्यात वेगवेगळ्या रंगांचेमिश्रण मस्त दिसते. मेनमध्ये अकेडिया नॅशनल पार्क पण या सीझनसाठीप्रसिद्ध आहे.

काही पार्कमध्ये अगदी स्लो स्पीडचा एखादा रोड बनवतात, ज्यात दोन्ही बाजूला कलरफुल झाडे असतात. पिवळ्या रंगाचा प्रकाश पडला आहे असे वाटते. मंडळी आपली फोटोग्राफीची हौस भागवून घेतात. अर्थात फोटो काही प्रत्यक्ष दृश्याला न्याय देऊ शकत नाहीत. लेकच्या बाजूला प्रतिबिंबामुळे मस्त व्ह्यू दिसतो. आम्ही बऱ्याच ठिकाणी जातो कलर्स बघायला. घराच्या आसपास पण खूप छान रंग दिसतात.

भारतात हिमाचल प्रदेशात थोडेफार रंग दिसतात. बाकी पानगळ म्हणजे पाने वाळतात आणि पडतात कारण आपल्याकडे तापमानात खूप फरक नसतो. यु.के. मध्ये पिवळा रंग जास्त दिसतो. आजकाल हिंदी सिनेमात बऱ्याच वेळा फॉल कलरची बॅकग्राउंड वापरतात. त्यामुळे बऱ्याच लोकांना ते माहीत झाले आहेत. इथली काही छोटी मुले या पानांमध्ये मनसोक्त खेळताना दिसतात. काही मंडळी पाने वाळवून वॉल हँगिंग बनवतात.

अशा या ’जाता जाता’ आपल्याला ’रंगांचा नजराणा’ देणाऱ्या झाडांना मनापासून धन्यवाद.



माधुरी प्रसन्न माटे

भारत' की बात सुनाता हूं.....

(आपल्या देशभक्तिपर चित्रपटांनी "भारतकुमार" हे बिरुद सन्मानानं मिरवणा-या मनोजकुमार यांचे दि.४ एप्रिल २०२५ रोजी निधन झाले. दि.२४ एप्रिल १९३७ रोजी जन्माला आलेल्या मनोजकुमारने वयाच्या ८८ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. चंदेरी पडद्यावरील केवळ अभिनेताच नव्हे, तर दिग्दर्शक, पटकथा लेखक, गीतकार अशा विविध भुमिका समर्थपणे पार पाडणा-या या गुणवान कलावंताने हिंदी सिनेसृष्टीत एके काळी राज्य केले होते. मनोजकुमारचा सिनेमा श्रवणीय गाणी, उत्तम संगीत, सामाजिक आशय, भव्यदिव्य सादरीकरण, देखण्या नायिका इ.अनेक गुणवैशिष्टयांनी युक्त असायचा, यात काही वाद नाही. मात्र देशभक्ती या भावनेलाच आपल्या सिनेमाचा नायक करणारा मनोजकुमार हे भारतीय चित्रसृष्टीला पडलेले मनोहर स्वप्न आहे, असेच म्हटले पाहिजे. त्यांच्या लोकप्रिय कारकिर्दीस मानाचा मुजरा आणि स्मृतीस विनम्र अभिवादन.)

ऐंशीच्या दशकात बहुसंख्य लोकांचं भावनिक विसाव्याचं ठिकाण असलेला चंदेरी पडदा व्यापक बदलांच्या तयारीला लागला होता. तत्पूर्वी संगीतात असतात तसली सिनेमाच्या पडद्यावर दोन प्रमुख घराणी होती. किंवा विचारधारा म्हणा हवं तर. एकीकडे सुश्राव्य संगीताने नटलेल्या प्रेम कहाण्या कथन करणारी राजेश खन्ना पंथीय "नजाकतींनी" नटलेली विचारधारा होती, तर दुसरीकडे सतत हाणामारीच्या तयारीत असलेली अँग्री यंग मॅन ‘अमिताभ बच्चन’ पंथीय विचारधारा होती. अर्थात या व्यतिरिक्त आर्ट फिल्म, प्रायोगिक चित्रपटांसारखे अजून काही प्रवाह होते. मात्र ‘अर्थ’, ‘अंकुर’ सारखे सन्माननीय अपवाद वगळता त्यांचा उपयोग मुख्य प्रवाहातील मनोरंजक सिनेमे कसे तद्दन फालतू आहेत हे सिद्ध करण्यासाठीच जास्त होई. तत्पूर्वी राज कपूर, देवानंद, दिलीपकुमार यांच्या सुवर्णयुगाविषयी आम्ही ऐकून होतो पण प्रत्यक्ष तो काळ अनुभवलेला मात्र नव्हता. लोभस रुपडं असलेल्या राजेश खन्नाच्या रोमँटिक सिनेमांचं गारुड आरंभी आमच्या मनावर होतं. साहित्यात ना.सी.फडके अन् वि.स. खांडेकर यांच्या रोमॅन्टिक कादंब-या आणि चंदेरी पडद्यावर राजेश खन्नाच्या प्रेम कहाण्या यांनी भावजीवन व्यापलेलं होतं. पण एका अवचित क्षणी पोलीस स्टेशनमध्ये शेरखान बसू पाहणाऱ्या खुर्चीवर इन्स्पेक्टर विजयने ज्या त्वेषाने लाथ मारली ती पाहून आमची पिढी चाट पडली आणि अक्षरश: धावतच सुटली अमिताभ बच्चनच्या मागे. डॉनमध्ये ज्या स्टायलीशपणे "तो" पळतो तशीच. राजेश खन्नाचं "प्रेमाचं" राज्य अमिताभने मोठया "त्वेषानं" जिंकलं आणि तो प्रेक्षकांच्या गळयातला ताईत बनला. मात्र तरीही दुसरीकडे रोमँटिक सिनेमांचा व्यापक प्रेक्षकवर्ग कायम होताच. बासू चटर्जी, यश चोप्रा, ह्रषिकेश मुखर्जी, ताराचंद बडजात्या या मंडळींचे संस्कारी आणि प्रेमळ चित्रपटही त्यामुळे येत राहिले.

एकूणच प्रेम आणि बदला या दोनच विषयांवर सिनेमे बनवावे लागतील, असा काहीतरी सेन्सॉर बोर्डाचाच नियम असावा अशी आमची धारणा झाली होती. या व्यतिरिक्त सिनेमात अन्य विषय असू शकतात, असा तर्कही प्रेक्षकांच्या मनाला शिवत नव्हता.

एक्याऐंशीच्या सुमाराला मनोजकुमारचा 'क्रांती' प्रदर्शित झाला. मनोजकुमारसह दिलीप कुमार, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर, हेमा मालिनी परवीन बाबी, प्रेम चोप्रा अशी तगडी स्टारकास्ट असलेला सिनेमास्कोप पडद्यावरचा लार्जर दॅन लाईफ सिनेमा. ब्रिटिशांविरुद्धचं युद्ध, लक्ष्मीप्यारेंचं तुफान संगीत. " जिंदगी की ना टुटे लडी.." सारखं लता-नितीन मुकेशचं लोकांच्या ओठांवर रुळलेलं गाणं.. असा हा भव्यदिव्य ब्लॉकबस्टर सिनेमा पाहून मी भारावून गेलो होतो. सिनेमाविषयीच्या तोपर्यंत जोपासलेल्या आपल्या प्रस्थापित संकल्पना तपासून पाहिल्या पाहिजेत असं वाटू लागलं. म्हणजे प्रेम, नफरत, बदला , संगीत इ. प्रेक्षकांना भावणारा करमणुकीचा मालमसाला कायम ठेवूनही देशप्रेम रुजवणारा लोकप्रिय सिनेमा बनू शकतो ही बाब वयाने परिपक्व होण्याची प्रोसेस सुरू असलेल्या मनाला सुखद वाटली. मनोजकुमार नायिकांना अंगप्रदर्शन करायला लावतो, असा आक्षेप समीक्षक घ्यायचे. (रीतसर आक्षेप घेण्यापूर्वी अर्थातच तो सिनेमा चवीने पहावा लागे आणि त्याला त्यांचाही इलाज नव्हता.) अर्थात या आक्षेपाला अगदी खोटं पण म्हणता यायचं नाही, पण फिरोज खानचे सिनेमे पाहिल्यावर मनोजकुमार सौम्य वाटायचा "त्या" बाबतीत. एकुणच तेव्हापासून मनोजकुमारविषयी उत्सुकता निर्माण झाली. तत्पूर्वी मी पाहिलेला त्याचा एकमेव चित्रपट होता 'हिमालय की गोद में!' मी त्यावेळी शाळकरी होतो.. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या एका लहानशा खेडेगावात

अपघातामुळे लोकांची वैद्यकीय सेवा करायला गेलेल्या डॉक्टरची प्रेमकहाणी होती त्यात. डोळयांचे पारणे फेडणारं हिमालयाचं सौंदर्य आणि जोडीला सुरेल संगीत.. "चांदसी मेहबूबा हो मेरी .. " "एक तू ना मिला.." अशी एकाहून एक सरस गाणी.. हालचालीतला हळुवारपणा, वागण्यातली नजाकत, गुलाबी ओठ.. आकर्षक केशरचना, धीरगंभीर आवाज आणि डोळयांमध्ये काठोकाठ भरलेली कारुण्ययुक्त परिपक्वता .. राजकपूरनंतर मुकेशच्या दर्दभऱ्या आवाजाला एकदम फिट्ट बसणारा चेहरा.. रिपीट रनला तो पाहिला पण त्यावेळी मेंदूवर अमिताभपट हावी असल्याने ‘दालतडक्या’च्या प्लेटऐवजी वेटरनं पुढयात ‘आमटी’ची वाटी आणून ठेवावी, तसा फील आला होता.

कट टू.... क्रांती पाहून मात्र या आवडीनिवडीला हादरे बसले.. मग भूतकाळातले मनोजकुमारचे सगळेच सिनेमे पहावेसे वाटू लागले.. पण जुने सिनेमे गेल्यानंतर पुन्हा पहायला मिळणे त्या काळी सोपं नव्हतं.. रिपीट रनला सिनेमा प्रदर्शित होणे किंवा मग दूरदर्शन प्रसन्न होण्याची वाट पाहणे हेच पर्याय असायचे. व्हिडिओ कॅसेटचे माध्यम सहज उपलब्ध नव्हते. जीवनाचा आशय कोळून प्यालेल्या संतोष आनंद या महान शायरनं लिहिलेलं "एक प्यार का नगमा है." हे सुरेल गाणं आधी बिनाका गीतमालामधून ऐकलेलं अन् चित्रहारमधून पाहिलेलं होतं. या गाण्यामुळेच शालिनी टॉकीजमध्ये लागलेल्या ‘शोर’ च्या तिकीटखिडकीकडे माझी पावलं ओढली गेली. समोरच्या टपरीवरचा चहा पिता पिता मी ‘शोर’ पहायचा मनोदय बोलून दाखवताच मित्र चहाचा कप आदळून पावसात ओला होत घरी निघून गेला. बाहेर पडणा-या संथगती पावसाने गारठून गेलेली एक आळसवाणी आणि नीरस दुपार होती ती.

'शालिनी'मध्ये मी घुसलो तेव्हा मोजून शंभरेक डोकी तिथं जमली होती. सिनेमा सुरू झाला. "दो पल के जीवनसें इक उम्र चुराने का" क्षण असा अकल्पित आणि बेसावध क्षणी आपल्या वाटयाला येत असावा का? जीवनातल्या अटळ दु:खांच्या आणि उदासीनतेच्या गडद रेखाटनाला लता मुकेशच्या मखमली स्वरांची महिरप लावलेल्या तसबिरीसमोर अंतर्मुख होऊन उभं राहिल्यासारखं वाटलं मला. एक कारुण्यमयी संपन्नता मनात भरून घेऊन मी थिएटरबाहेर पडलो. ती संपन्नता आजही मनात जशीच्या तशी टिकून आहे. "एक प्यार का नगमा है" हे गाणं जुनं आणि अप्रासंगिक होत जाण्याऐवजी नव्या पिढयांनाही आपल्या प्रेमात पाडत चाललं आहे. हल्लीच्या रियॅलिटी शोमध्ये या गाण्याचा जणू पुनर्जन्मच झाला आहे. त्याच्या अभिजात स्वरांचं, कालातीत भावसौंदर्याचं आणि अप्रतीम सादरीकरणाचं गारुड आजवरच्या तमाम पिढयांमधील रसिकांच्या मनावर झालेलं आहे. 'जिंदगी और कुछ भी नही तेरी मेरी कहानी है..' ही भावना केवळ मनोजकुमार आणि नंदा यांच्या पुरती न राहता ऐकणाऱ्या प्रत्येकाचीच होऊन राहिली आहे. हिंदी सिनेमातल्या सर्वोत्कृष्ट गाण्यांची आपापली लिस्ट बनवायला सांगितली, तर बहुतेकांच्या यादीत हे गाणं असणार याबद्दल माझ्या मनात काहीही शंका नाही. तो काळच संगीताच्या सुवर्णयुगाचा होता. "ती हां कर या ना कर तू है मेरी किरण... "या लंपट आणि पाशवी मनोवस्थेचं उदात्तीकरण करण्यासाठी आपली "कलम" पणाला लावणारे शायर सिनेसृष्टीत अजून तेव्हा जन्माला यायचे होते, हे एक बरं झालं..

त्यानंतर मग एकदा असाच अनपेक्षितपणे "पूरब और पश्चिम" पहायला मिळाला. आपल्या संस्कृतीविरोधात जाणीवपूर्वक विष पेरण्याचं जे पुरोगामी षडयंत्र पूर्वापार चालत आलंय. समाजाला सतत न्युनगंडात ठेवायचं, संस्कृतीच्या प्रत्येक प्रतीकाला नावं ठेवायची, देवादिकांपासून, सणवार,व्रतवैकल्ये, परंपरा यांच्यात न्यून शोधायचं आणि या सगळयाचा न्यूनगंड जोपासायची समाजाला सवय लावून टाकायची.. या प्रकाराला नॅरेटिव्ह म्हणत, हे आत्ता कळतंय. पण त्या काळी आपल्यावर थोपविलेल्या "पश्चिमी" मानसिकतेला स्वाभिमानपूर्वक "पूरब" चं श्रेष्ठत्व पटवून देणारा हा सिनेमा. आत्मनिर्भर भारतीयत्वाचं भान जागवणाऱ्या राजकीय पर्वाचा आरंभ होण्यासाठी पूढे कित्येक वर्ष जावी लागणार होती. त्या काळी दुराचार आणि अनीतीने बरबटलेल्या बॉलीवूडच्या चिखलात "जब झिरो दिया मेरे भारतने, तब दुनियाको गिनती आयी.." या मंत्रवचनाचं कमळ उगवणारा माणूस होता, मनोजकुमार..तत्कालीन पिढीच्या मनात जाणीवपूर्वक प्रस्थापित करण्यात आलेला न्यूनगंड दूर करण्याचा फिल्मी पण प्रामाणिक प्रयत्न त्याने केला यात वाद नाही. त्याची कला आपल्या व्यावहारिक जीवनाशी फटकून नाही वागली..

' जय जवान आणि जय किसान' हा १९६५ च्या भारत पाक युद्धाच्या वेळी भारताचे महान पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी दिलेला नारा रुपेरी पडद्यावर मनोरंजनाच्या माध्यमातून साकारणारा उपकार हा देखील त्याचा मौलिक संदेश देणारा चित्रपट होता. देशाचं पोषण करणारा बळीराजा शेतकरी आणि रक्षण करणारा शूरवीर सैनिक यांच्या विषयी सार्वत्रिक कृतज्ञतेची जी समाजभावना मनोजकुमारने त्यावेळी निर्माण केली, ती आजही अबाधित आहे. या विषयावरचं त्याहून उत्तम आणि वासतवादी वाटावं असं कलात्मक सादरीकरण अजूनही मनोजकुमार नंतर कुणाला जमलेलं नाही..

स्वत: दिग्दर्शित केलेल्या सिनेमांव्यतिरिक्त नट म्हणुन इतरही अनेक सिनेमांमधून तो चमकला. ‘नीलकमल’, ‘मेरा नाम जोकर’, ‘दो बदन’,’ गुमनाम’, ‘अनीता’, ‘दस नंबरी’, ‘वो कौन थी’, ‘शिर्डी के साईबाबा’, ‘संन्यासी; हे इतर दिग्दर्शकांचे त्याचे चित्रपटही गाजले.

वर्षानूवर्षे सिनेजगताच्या वलयात राहूनही मनोजकुमारच्या सामाजिक जाणिवा बदलल्या नाहीत. त्याची देशप्रेमाची संवेदनशीलता कायम ताजीतवानी आणि टवटवीतच राहिली. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भ्रष्ट व्यवस्था, बेरोजगारी, अनीती, महागाई असे जे अनेक चटके त्यावेळी लोकांना सोसावे लागले त्याविषयीच्या चिंतनातून एक सर्वांगसुंदर चित्रपट निर्माण झाला, ‘रोटी कपडा और मकान!’ हा सिनेमा प्रचंड गाजला. परिस्थितीचे बळी असलेल्या समाजाने आपल्याच व्यथा वेदनेला प्रकट करण्याचा हा प्रयत्न सुपर डयुपर हिट केला. इतक्या वर्षांनंतर त्यातले कित्येक संदर्भ कदाचित कालबाहय आणि अप्रासंगिक झालेही असतील पण "मै बन जाऊ सांस आखरी तू जीवन बन जा.. जीवनसे सासोंका रिश्ता मैं ना भुलूंगा....." हे झीनत अमान आणि मनोजकुमारचं ह्दयाच्या कप्प्यात साठवून ठेवलेलं युगलगीत आजही अगदी तस्सचं टवटवीत आहे. आपल्या रंग आणि गंधासह... त्या वेळच्या प्रेक्षकांपासून ते आजवरच्या पिढयांतीत हळव्या माणसांच्या मनातील मूक भावनांना या गाण्यानंच यथार्थ शब्द दिले आहेत. हे सर्वांगसुंदर गाणं म्हणजे सुसंस्कृत आणि संवेदनशील माणसांवर मनोजकुमारनं केलेला फार मोठा 'उपकार' आहे असं मला कायम वाटत आलंय. शहीद, पूरब और पश्चिम, उपकार, क्रांती यासारखे देशभक्तीवरचे सिनेमे, 'कहा गये वो लोग' ही क्रांतिकारकांच्या जीवनावरील मालिका, आदर्शवादी नायक, समर्पित प्रियकर हे सगळं सकारात्मकपणे सिनेमाच्या पडद्यावर साकारणारा मनोजकुमार ह्रदयात मानाचं आणि आदराचं स्थान मिळवून राहिला, हे मात्र खरं.

मागे वळून पाहतां कधी कधी मन साशंक होतं. मला बरेचदा असं वाटतं, की, आपण रोमँटिक प्रेमकथेच्या राजेश खन्ना, जितेंद्र , देवानंद इ. नायकांचे खूप आशिक झालो, दुसरीकडे अमिताभ, धर्मेंद्र, मिथुन, विनोद खन्ना यांच्यासारख्या हाणामारी करून तीन तासात न्याय मिळवून देणा-या भाबडया हिंदी सिनेमांचेही भलतेच शागिर्द झालो. पण हे सगळं सत्यापासून दूर होतं, प्रत्यक्षात घडणारं नव्हतं. मात्र देशावर प्रेम करायला लावणा-या मनोजकुमारला आपण हवं त्या प्रमाणात स्वीकारलं नाही. बॉलीवूडने भारतविरोधी आणि संस्कृतीविरोधी नॅरेटीव्ह वर्षानुवर्षे आपल्यावर लादले, मनोजकुमारच्या सिनेमांकडे दुर्लक्ष करण्याच्या सामूहिक प्रमादासारखीच काही कारणं याच्या मुळाशी असू शकतील. परिणामस्वरूप हळूहळू बॉलीवूड ड्ग्ज, अंमली पदार्थ, देहव्यापार, काळा पैसा, गुंडगिरी या अनैतिकतेच्या वर्तुळात रमलेल्या वैचारिक माफियांचे बटीक बनले. कालातीत आशयसौंदर्यापेक्षा कृत्रिम तंत्रविज्ञान श्रेष्ठ ठरले.. वर्षानुवर्षे मनावर अधिराज्य गाजवणा-या चित्रपटांऐवजी मल्टिप्लेक्स, ओटीटी, यू टयुब अशा विविध मार्गांनी पैसा वसूल करून आठ पंधरा दिवसांत विस्मरणात जाऊन बसणा-या चकचकीत पण क्षणभंगुर अशा सिनेमांचे युग अवतरले. प्रेमप्रधान सिनेमांचे सुवर्णयुग आता इतिहासजमा झाले होते. पण. थँक गॉड, तोपर्यंत मनोजकुमार निवृत्त होऊन घरी बसला होता.

धनंजय देशपांडे

शिशिरागम

छाया : माधुरी प्रसन्न माटे

छाया : दीप्ती पाटखेडकर

छाया : सुजाता महाजन



वेळ

(साहित्यकट्ट्यावर सादर झालेले 'वेळ' या विषयावरील लेख)

एक सेकंद

नेहमीचीच सकाळ!! नेहमीचंच रूटीन!! रोजचाच चहा! चहासाठी लागणारं दूध मायक्रोवेव्हमध्ये ठेवलं आणि ह्या एका सेकंदाच्या किंवा वेळेच्या कल्पनेचा जन्म झाला!!! कसा? सांगते!!!
दूध गरम करायचं ठरलेलं माझं एक टायमिंग ठरलेलं आहे. पण त्या दिवशी मी एक सेकंद आधी मायक्रोवेव्ह बंद केला आणि स्वत:लाच म्हणाले “एका सेकंदाने काय फरक पडतो?” त्या क्षणी माझंच मला जाणवलं, की ह्याच एका सेकंदाने प्रत्येकाच्या आयुष्यात चांगले, वाईट खूप बदल घडू शकतात.
आता माझंच आणखी एक उदाहरण सांगते. एका शनिवारी सकाळी आम्ही दोघं कुत्र्याला चालायला घेऊन गेलो. तोच मार्ग, तोच साईडवॉक, त्याच स्टॉप साईन्स सगळं तेच!! तर अशाच एका स्टॉप साईनला नेहमीप्रमाणे थांबलो, इकडे तिकडे बघितलं, आणि कोणतीही कार येत नाही असं बघून रस्ता क्रॉस करायला लागलो. रस्ता क्रॉस झालाच होता, तेवढ्यात एक कार जोरात स्टॉप साईनपाशी आली. ड्रायव्हर जरा वयस्कर होता. डोळ्यावर येणारा सूर्यप्रकाश, त्या माणसाचं वय, ‘एव्हढ्या सकाळी रस्त्यावर कोण असणार? बहुतेक असा केलेला विचार, पण ह्या सगळ्याचं मिश्रण आमच्या जीवावर बेतलं असतं, जर आम्ही रस्ता क्रॉस करायला एक सेकंद जास्त वेळ घेतला असतां तर!!!
तर असे बरेच प्रसंग आपल्या आयुष्यात येतात, जेव्हा तो एक सेकंद ती वेळ बऱ्याच गोष्टी ठरवून जाते. ह्याच एका सेकंदामुळे कितीतरी धोके टळतात. ह्याच एका सेकंदामुळे कितीतरी मनं जुळतात. दोन मुलं एकाच दिवशी, एकाच वेळेला जन्मली, तरी जन्मवेळेतल्या एका सेकंदामुळे त्यांची भविष्यं वेगळी होतात, त्यांची आयुष्यं घडतात किंवा बिघडतात!!
हाच तो एक सेकंद होत्याचं नव्हतं करून टाकू शकतो आणि हाच तो एक सेकंद तुम्हाला भरभरून खूप काही देऊ शकतो.

ही वेळ म्हणजे अगदी अजब गोष्ट आहे. साध्या साध्या वाटणाऱ्या गोष्टी ह्या खरं म्हणजे वेळेची कमाल दाखवणाऱ्याच असतात. म्हणजे बघा, तुमचा alarm हा एका ठरावीक वेळेसाठी लावलेला असतो. पण एखादा दिवस असा येतो, की कमीतकमी एक दोन वेळेला तो snooze केला जातो, मग शेवटी एकदा आपण उठतो, तयारीला लागतो तर गोष्टी वेळेवर सापडत नाहीत, नेमकं त्याच दिवशी निघता निघता हातातून काहीतरी सांडतं, मग ते आवरण्यात वेळ जातो आणि मग पुढचं सगळं गणितच चुकतं. पण एखादा दिवस असाही असतो, की सगळं काम वेळेवर होत जातं आणि आपलं मन प्रसन्न होतं.
ही वेळ आपल्या आयुष्यात इतकी मुरलेली असते, की काय विचारावं! वेळ ह्या बाबतीतली, आपल्या कानावर नेहमी पडणारी काही वाक्यं असतात, बघता बघता वर्ष संपत आलं, वेळ कसा गेला कळलंच नाही किंवा हल्ली ना, आम्ही इतके बिझी असतो, की इतर काही करायला वेळच मिळत नाही. खरं म्हणजे आपल्याला सगळ्यांना माहीत असतं, की वेळ काढला तर तो नक्की मिळतो. पण तो काढणं गरजेचं असतं नाहीतर वेळ तसाच निघून जातो आणि आपण, मी ते काम वेळेवर का केलं नाही, ह्यावर विचार करण्यात वेळ घालवतो.
मला वाटतं प्रत्येकाच्या हातातून काही ना काही कारणाने काहीतरी करायचं राहून गेलेलं असतं आणि आपण ते वेळ नाही ह्या कारणावर ढकलून देतो. तुम्ही असं करत असाल असं मी म्हणत नाही पण कधी असं झालं असेल, तर ह्यापुढे वेळ काढून आप्तस्वकीयांना मेसेज करा, फोन करा किंवा शक्य असेल तर त्यांच्याबरोबर वेळ घालवा. वेळात वेळ काढून त्यांच्याशी काही गोष्टी शेअर करा, त्यांच्या काही गोष्टी ऐकण्यासाठी वेळ द्या.
म्हणजे ते म्हणतात ना की you have to be at the right place at the right time , अगदी हाच तो right time चा सेकंद किंवा हीच ती वेळ!

सेकंद, मिनिटं, तास, दिवस, वर्ष ह्या आपल्या आयुष्यातून पटापट निघून जाणाऱ्या गोष्टी आहेत. त्या हातातून निसटून जाऊ देऊ नका. वेळ काढा!
लिहिण्यासारखं खूप आहे, पण आता तुमचा जास्त वेळ घेत नाही.
तर असा एक सेकंद किंवा ती वेळ तुमच्यापण आयुष्यात नक्कीच आली असेल, ह्या वेळेचं तुमच्या लेखी काय महत्व आहे, ते मला जरूर कळवा. एक सेकंदही उशीर करू नका. तुमचे अनुभव ऐकायला मला खूप आवडेल.
धन्यवाद,

रश्मी चाफेकर

वेळ

साहित्यकट्ट्यावर 'स्वलिखित' मध्ये विषय दिला गेला 'वेळ' आणि गम्मत म्हणजे माझ्या दृष्टीने काय पुरेसा दिला गेला नाही, तर 'वेळ'च. विषय वरवर वाटायला सोपा, पण माझ्यासाठी अवघड होता. लक्षात आलं, कितीही मिळाला असता ना जरी लिहायला 'वेळ', तरी ' हं, मनापासून चांगला लेख लिहून झाला', असं वाटायची 'वेळ' आलीच नसती. मग शेवटी घेतलं काहीतरी लिहायला, कारण 'वेळे'वर पूर्ण व्हायला हवा होता. एक त्यातल्या-त्यात चांगली गोष्ट म्हणजे ठरावीक वेळेत म्हणजे आठ मिनिटात वाचून व्हायला हवा असा नियम होता, म्हणजे फार लिहायची जरूर नव्हती.
वेळ हा एक खाण्याचा पदार्थ आहे. कधी आपण दुसऱ्याचा वेळ खातो, कधी दुसरा कुणी आपला वेळ खातो, असं काहीसं विनोदी सुचलं, पण पुढे काहीच नाही.
मग एक गोष्ट आठवली. खूप वर्षांपूर्वी arranged marriage करून अमेरिकेत आले होते. तेव्हा एका बरोबर काम करणाऱ्या गोऱ्याने तेच कसं चांगलं, हे मला समजावून सांगितलं होतं. त्याचा एक मुद्दा असा होता, की डेटिंग करताना किंवा लग्नासाठी विचारताना ती वेळ साधणं आवश्यक असतं, आणि ते फार कठीण असतं. फार लवकर विचारलं, तरी नाही उत्तर येण्याची शक्यता असते, फार उशीर झाला, तर त्या व्यक्तीने आपली वाट बघून, कंटाळून दुसऱ्यालाच हो म्हटलं असण्याची शक्यता असते. एवढं लिहून झालं, पण मग पुढे काहीच सुचलं नाही.
पण मग जरा अजून विचार केल्यावर मला आजीचे बोल आठवले. ती बरेचदा असंच काही म्हणायची, "प्रत्येक गोष्टीची किंवा कृतीची एक वेळ असते. त्या वेळेला खूप महत्व असतं. ती वेळ जर निघून गेली, तर नंतर कदाचित त्या गोष्टीला किंवा कृतीला फारसा अर्थ उरतोच, असं नाही."
लहानपणी मला याचा नक्की अर्थ समजायचा नाही. मग आजी खूप गोष्टी सांगायची.
आमच्या नात्यात एक जण निष्णात डॉक्टर झाला. चांगलं नाव कमावलं. म्हाताऱ्या आजीची इच्छा म्हणून कुलदैवताच्या दर्शनाला गेला. अगदी छोटंसं गाव. आडवळणावरचं. तिथे आलेल्या एका भक्ताच्या अचानक छातीत दुखायला लागलं. याने पटकन त्याला CPR दिला. गाडीत ठेवलेली aspirin ची गोळी दिली. ड्रायव्हरकरवी स्वतःच्या गाडीतून त्याला इस्पितळात पोचवण्याची व्यवस्था केली. त्या भक्ताचा जीव वाचवला. खरं तर आजवर त्याने याहूनही खूप क्रिटिकल केसेस हँडल केल्या होत्या. त्याच्या दृष्टीने ही फार साधी केस होती, पण इथे ती वेळ महत्वाची होती.
आजीच्या माहेरी छोट्या गावात एका घरात मुलीच्या लग्नाच्या आदल्या दिवशी चोरी झाली. हुंड्याचे पैसे चोरीला गेले. जुना काळ तो. कुटुंबाची परिस्थिती बेताची. इभ्रतीचा, मुलीच्या आयुष्याचा प्रश्न होता. पण आलेल्या पाहुण्यांपैकी एका स्त्रीने वेळेचं महत्व पाहून आपले दागिने काढून मुलीच्या वडिलांच्या हातात ठेवले. पुढे कधीतरी वडिलांनी तिचे सगळे दागिने परत केले, पण महत्व त्या वेळेचं होतं. तिचे उपकार ते कुटुंब कधीच विसरू शकणार नव्हतं.

एवढंच काय, आजी सांगायची, गावात गरीब कुटुंबं खूप. कधी कधी अचानक पाहुणा येऊन उभा राहायचा. घरात कधी दूध नाही, कधी साखर नाही, कधी पीठ नाही. पण मागच्या दाराने मुलांना शेजारी पाठवून ती गोष्ट मागवली जायची. वेळ मारून नेली जायची. पाहुण्यासमोर लाज राखली जायची. इतर वेळी शेजारीपाजारी एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत, पण वेळेला मदतीचा हात पुढे असे.

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. शंभर वर्ष होऊन गेली. माझ्या आजोबांची आत्येबहीण बालविधवा झाली. तिचं केशवपन करायला न्हावी घरी आला. तिला लाल आलवण देण्यात आलं. समाजात त्यावेळी या प्रथेला इतकी मान्यता होती, की तिचे आईवडील सुध्दा पुढे आले नाहीत. तिचं नशीब खोटं म्हणून गप्प राहिले. माझे आजोबा तरुण, वयाने लहान, पण त्यांनी तिला सिनेमात दाखवतात, तसं हाताला धरून तिच्या सासरच्या घराबाहेर काढलं. "कोणाची हिम्मत आहे मला थांबवण्याची ते बघू" म्हणाले. तिला घरी आणून पुन्हा शाळेत पाठवलं. शिक्षिका बनवलं. स्वतःच्या पायावर उभं केलं. हेसुध्दा त्या वेळेचंच महत्व. आजी हा प्रसंग छान रंगवून सांगत असे. आपल्या घरात actually एक अमिताभ बच्चन होऊन गेला असा अभिमान आम्हाला वाटे.
अशा एक ना अनेक गोष्टी. तेव्हा सारांश हा, की त्या वेळेचं महत्व समजून घ्या आणि त्या वेळेला मदतीचा हात नक्की पुढे करा. म्हणतात ना, 'जो बूंद से गयी, वो हौदसे नही आती', तसंच - ती वेळ निघून गेली, एखाद्या व्यक्तीचा जीव गेला, कुणाची इभ्रत धुळीला मिळाली, कुणी आयुष्यातून उठलं, आणि मग तुमचा हात पुढे झाला मदतीसाठी, तर त्याची किंमत शून्यच!

मंजिरी बर्वे

वेळ

आपण ज्या विषयावर बोलणार आहोत, तो खरं तर दोन अक्षरीच शब्द आहे पण त्याची व्याप्ती खूपच मोठी आहे पण विरोधाभास बघाल, तर प्रत्येकाजवळ तो खरं तर मर्यादित आणि पूर्वनिर्धारित आहे.

'वेळ' या शब्दाची ओळख आपल्याला अगदी लहानपणापासून काऊचिऊच्या गोष्टीपासूनच होते. आई, आजी, गोष्ट सुरू करते तीच मुळी, "एकदा काय झालं" या वाक्याने. त्या गोष्टीत मग कधी काऊ चिऊ असते तर कधी राजा राणी.

नंतर शाळा सुरू झाल्यावर, "झोप आता लवकर. उद्या सकाळी लवकर उठायचं आहे. सकाळची शाळा आहे" असं जेव्हा आई म्हणते, तेव्हा हा जो उद्या आहे ना, तो सुद्धा सरकणाऱ्या वेळेचंच प्रतीक आहे.

असाच वेळ पुढे सरकतो, त्याला आपण काही 'काळ' गेल्यावर असा शब्द प्रयोग करतो. मग ते मूल मोठे झाले, की त्याला कबीराच्या दोह्यातला उपदेशही ऐकवतो.

"काल करे सो, आज कर
आज करे सो, अब.
पल में प्रलय होवेगी
बहुरी करेगा कब?"

आणि पुन्हा एकदा वेळेचं महत्त्व अधोरेखित करतो.

रोजच्या जीवनात तुम्ही आम्ही सगळे मायक्रोवेव्हचा वापर अगदी घरोघरी करतो. त्यात पदार्थ ठेवून 30 सेकंद सेट करून समोर उभे राहतो. ३०, २०___५_३_२_१ करत वेळ संपल्यावर आनंदाने पटकन पदार्थ बाहेर काढतो. पण आपल्याही आयुष्यातला ३० सेकंदाचा वेळ गेलेला आहे, हे आपल्या लक्षातही येत नाही.

असो.

मी खरंतर थोड्या वेगळ्या, आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या, सतत वेळेची जाणीव करून देणाऱ्या विषयावर सांगणार आहे, तो म्हणजे, 'कॅलेंडर!'

सूर्योदय झाला. सुरेख सोनेरी किरणांनी एका नवीन दिवसाची सुरुवात झाली.कालचा दिवस खरंच भूतकाळात जमा झाला.आजचा दिवस नवीन उमेद, नवीन उत्साह घेऊन आलाय, त्याचे स्वागत करू या.

तुम्हाला आठवतं का? पूर्वी एक टेबलावर ठेवायचे (भिंतीवरही लावता येत असे) लाकडी कॅलेंडर असायचे. त्यात ठळक अक्षरात पुठ्ठ्याच्या कागदावर, तारखा लिहिलेल्या असत. ते पान रोज सकाळी बदलावे लागायचे.जणू सुचवायचे की 'कर आता आजच्या दिवसाची आखणी'. तेव्हाचे जीवनही रोजच्या दिवसाची जाणीव करून देणारे शांत आणि म्हटलं तर थोडं संथच होतं. येणाऱ्या रोजच्या दिवसाला दिशा देण्यासाठी विचार करायला वेळ होता.

त्या कॅलेंडरच्या खालच्या भागात लहान अक्षरात महिना व वर्ष दर्शवणारे पुठ्ठयाचे कागद असत. ह्यातून येणारा प्रत्येक दिवस किती महत्वाचा आहे, हे ठळकपणे सूचित होत असे.

असे तीस दिवस जर आयुष्य मिळून महिना बदलायची संधी मिळाली तर आपण मनातल्या मनात नक्कीच गेले तीस दिवस काय केले, ह्याचा हलकासा विचार नक्की केला असेल.

त्यानंतर एक कप्पा वर्ष बदलण्यासाठी पण असायचा, अजून एक वर्ष संपले सागणारा.
नंतर कितीतरी प्रकारची एक पानी, सहा पानी अशी विविध प्रकारची कॅलेंडरं आलीत. त्यावर सुरेख चित्रे,छान छान सुभाषिते व माहिती लिहिलेली असे.
नंतर आले बारा पानांचे 'कालनिर्णय' कॅलेंडर आणि जीवनाचा एक अविभाज्य भागच झाले. नावही किती समर्पक दिले आहे. उलटणाऱ्या काळाचे भान ठेवून योग्य निर्णय घ्या सांगणारे. प्रत्येक तारखेखाली महत्वाची तिथी, जयंती महत्वाचे सण अधोरेखित केलेले हे भिंतीवरील कालनिर्णय आजपण आपण वापरतोच की.
घरोघरी पंचांगाप्रमाणे तिथी बघायचे, तर आता काळौघात जमा झाल्यागत झाले आहे. अजूनही आपण तिथीने कामे करतो, पण ते बघायला नवीन पध्दतीचे कॅलेंडर उपलब्ध झाले आहे. आता मात्र हळूहळू आजच्या काळात हे बारा पानांचे, महिना उलटणारे कॅलेंडरसुध्दा बाद झालंय, एवढी जीवनाची गती वाढली आहे. काही नियम, स्वतःच्या उन्नतीसाठी बंधन, वगैरे ठरवेस्तोवर आठवडेच्या आठवडे निघून जातात.ती सकाळची सूर्याची मऊ मऊ सोनेरी किरणे अंगावर घ्यायच्या आधीच माणसाची माध्यान्ह झाली असते. त्या वेगाच्या

भोवर्‍यात आपण नेमके कुठे आहोत?काय मिळवलंय? काय गमावलंय?हे कळे कळेस्तोवर,जीवनातला बराचसा काळ मात्र गमावून बसतो.
वेळेलाच हातावर बांधून घेतलंय आपण. भिंतीवरच्या, शांतपणे काळ वेळ सांगणाऱ्या कॅलेंडरकडे बघायला वेळ कुठे आहे? आपल्या हाताने त्यावरची तारीख बदलायला वेळच नाही कोणाजवळ.तारीख स्वतःहूनच बदलते आहे. एक एक दिवस उलटून भूतकाळात जमा होतोय. सुखी जीवन करायच्या गडबडीत सुखी जीवन जगायचेच राहून जातंय का? 'सुखी माणसाचा सदरा' अंगावर चढवायचाच राहतोय बहुतेक.
बदलत्या काळात, तारीख लक्षात नाही ठेवली तरी,रोज उगवत्या केशरी सुंदर सूर्याकडे बघा. त्याची ऊर्जा घ्या.अजून एक सुंदर पहाट आपल्या जीवनात आली आहे ते सुख, तो आनंद भरभरून अनुभवा. त्या सोनेरी किरणांची ऊब मनात साठवून पुढची वाटचाल करा.
कॅलेंडरने नोंद नाही ठेवली तरी वेळ आणि काळ पुढे सरकतच राहणार. त्याचे योग्य नियोजन कसे करायचे हे ज्याचे त्यानेच ठरवायला हवे,नाही का?



अलका धाराशिवकर

वेळ

‘**वेळ**’ हा शब्द आपल्या दररोजच्या जीवनात आपण अनेक वेळा ऐकतो. अवेळी, योग्य वेळ, ऐनवेळी, भलतीच वेळ, आमच्या वेळी, त्या काळात असे कितीतरी प्रकार आपण वेळेविषयी ऐकतो. वेळ आणि काळ हे साधारणपणे समानार्थी शब्द आहेत असे आपण मानले तर गैर होणार नाही. वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ - वेळेचे कालगणना मापन भारतीय ऋषीमुनी यांनी फार छानपणे केलेले आहे. घटिका, पळे, सेकंद, मिनिटे, तास, दिवस, आठवड्याचे सात दिवस, ऋतू, बारा महिने, ३६५ दिवसांचे वर्ष, २७ नक्षत्र, तप, योजना इत्यादी कालगणनेचे प्रकार आहेत. त्या त्या काळात योग्य वेळी काही गोष्टी कराव्या लागतात. योग्य वेळी योग्य गोष्टी केल्या, तर त्या फायदेशीर असतात. कोणत्या वेळी काय बोलायचे, कसे बोलायचे कशी वेळ साधून न्यायची याबाबत ज्या व्यक्तीला योग्य निर्णय घेता येतात असल्या व्यक्ती अगदी वेळेवर यशस्वी होतात.
वेळेकडे आपण कोणत्या दृष्टीने पाहतोय हेही अतिशय महत्त्वाचे असते. योग्य वेळी योग्य गोष्टी घडून येतात असं आपल्याला नेहमी सांगितले जाते. त्यासाठी जर आपण वेळेचा सकारात्मक,

नकारात्मक आणि वेळेचा संधी साधण्याचा वेळ यात विभागणी केली तर गैर दिसणार नाही. जर आपण काही ठरावीक गोष्टी वेळीच केल्या नाहीत व त्याचा परिणाम आपल्याला हवा तसा मिळाला नाही तर आपण आपली समजूत घालतो, आपल्याला हवे असलेले मिळण्याची ती वेळ नव्हती. बराच वेळा आपल्याला महाभारत, रामायण किंवा इतिहासातील काही उदाहरणे दिली जातात. प्रभू रामचंद्रांना राज्याभिषेक होण्याअगोदर ऐनवेळी १४ वर्षे वनवासात जावे लागले, कारण त्यांच्या राज्याभिषेकाची ती वेळ नव्हती. भगवान कृष्णांनाही सांदिपनी ऋषींपासून विद्या मिळविण्यासाठी अनेक वर्षानंतर संधी मिळाली. आपल्याला असे सांगितले जाते, की त्यांना विद्या मिळण्याची वेळ झाली नव्हती.
नकारात्मक वेळ म्हणजे जर आपण चालून आलेल्या संधीसाठी लागणाऱ्या गोष्टी वेळेतच न केल्याने तुला परत अशी संधी मिळणार नाही, असे सांगितले जाते. उदाहरणार्थ, काही बाबतीत काळ काम गती यांचा योग्य वेळीच फायदा घ्यायचा असतो.
विशेषतः ट्रॅक अँड फील्ड इत्यादी खेळात शाळा कॉलेजमध्ये आपल्यापेक्षा वरच्या वर्गात असलेले खेळाडू माहीत असतात, परंतु पहिल्या वर्षाला येणारे विद्यार्थी आपल्याला माहीत नसतात. त्या खेळाडूंवर आमचे विशेष लक्ष असे कारण ते आपल्याशी जोरदार लढत देऊ शकतात. त्यामुळे आपल्या खेळाच्या क्षमतेचा वेळच्या वेळेवर योग्य उपयोग करून घेणे हे महत्त्वाचे असते कारण ती वेळ परत येईलच असं नाही.

योग्य वेळेचा फायदा घेणे म्हणजे वाहत्या गंगेत हात धुवून घेणे, असेही आपल्याला सांगितले जाते. त्याचप्रमाणे वाहत्या पाण्यात तुम्हाला एकदाच हात बुडवता येतो म्हणजे ती संधी परत येत नाही. यासाठी मला एक उत्तम उदाहरण आठवते, ते म्हणजे भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री गेल्यानंतर श्री. यशवंतराव चव्हाण यांना काँग्रेसचे त्याकाळचे अध्यक्ष श्री. कामराज यांनी पंतप्रधान होण्यासाठी खूप विनवणी केली. त्याकाळी पक्षाचे अध्यक्ष व कार्यकारिणीचा पाठिंबा असेल तर हमखास त्यांनी निवडलेला नेता पंतप्रधान होत असे, परंतु चव्हाण यांनी नकार दिल्यामुळे त्या संधीचा फायदा न घेतल्यामुळे ते परत पंतप्रधान होऊ शकले नाहीत.

काही काही गोष्टी वेळेतच कराव्या लागतात, नाही केल्या तर आयुष्यभर आपण त्याचा परिणाम भोगत असतो हेही आपल्याला बऱ्याच वेळा लक्षात आले असेल किंवा पाहिले असेल. केवळ फक्त खाणे, पिणे, काम करणे, पैसा कमावणे, पैशाचा उपयोग योग्य वेळी करणे याखेरीज आपला जीवनसाथी निवडून योग्य वेळी लग्न केले नाही तर विवाह होण्यासही खूप कठीण जाते. काही दशकापूर्वी जर मुलींनी वयाच्या पंचविसाव्या वर्षाआधी लग्न केले नाही, तर बऱ्याच वेळा त्यांना बिजवराशीच लग्न करावे लागायचे किंवा अविवाहितच राहावे लागायचे. विशेषतः योग्य वयात विवाह केला नाही तर बऱ्याच जणांचे लग्न नंतर होतेच असे नाही. येथे वेळेचा प्रश्न आहे. कुठून आणि कसे असे हे वेळेशी निगडित झाले, याचेही एक न सुटलेले कोडे आहे.
वेळ ही कधी सांगून येत नाही. त्याबाबत आपण यथार्थ योजना करून वेळ मारून नेणे ही पण एक कला आहे. उठण्याची वेळ, व्यायामाची वेळ, खाण्याची वेळ, अभ्यासाची वेळ, गप्पांची वेळ, काम करण्याची वेळ, आणि झोपण्याची वेळ या सगळ्या

वेळांप्रमाणे योग्य वेळी ते ते केलं तर ते आपल्या आरोग्यासाठी चांगले असते. ज्यावेळेला लागणारे तपमान व हवामान योग्य असेल तर पेरलेले धनधान्य अथवा इतर भाजीपाले व्यवस्थित उगवून येतात आणि त्यांच्यापासून चांगले उत्पन्न निघते. कधी कधी पेरणी अगर लागवडीसाठी तीन-चार दिवसाचा फरक पडला, तरी योग्य वापसा अगर वातावरण न मिळाल्याने उत्पन्नात कधी कधी ५० ते ६० टक्के फरक पडतो असा अनुभव मला बऱ्याच वेळा आला आहे. तो कदाचित तुम्हालाही आला असण्याची शक्यता आहे. तसेच काढणी जर योग्य वेळी केली नाही, तर ती पिके पाऊस पडणे किंवा अति ऊन पडल्याने नासली जातात.

पूर्वी व अजूनही बऱ्याच भागात काही पदार्थ फक्त काही वेळेस करतात खाण्यास मिळतात.
विशेषतः दिवाळीचे खास पदार्थ म्हणजे करंजी आणि अनारसे बराच वेळा दिवाळीतच करतात.
हळूहळू जागतिकीकरण झाल्यामुळे बरेचसे पदार्थ किंवा वस्तू वर्षभर मिळत असतात परंतु काही गोष्टी मात्र त्या त्या वेळीच मिळतात.

योग्य वेळी ब्रेक मारला नाही तर गाडीचा अपघात होऊन गाडीतील सर्वांचेच जीवन संपुष्टात येऊ शकते. योग्य वेळी जर बातम्या लवकर मिळाल्या नाहीत तर शिळ्या झालेल्या बातम्या वाचण्यात कोणाला रस व गोडी नसते.
मला आठवतंय, की एका लग्नाला मी गेलो होतो. फार जबरदस्त शाही थाटातील ते लग्न होतं. हजारो लोक, तसेच काही प्रतिष्ठित लोकही त्या लग्नाला हजर होते. केंद्र सरकारमध्ये मोठ्या खात्याचे मंत्री असलेले एक खासदार त्या लग्नासाठी येणार होते, पण ते वेळेवर आले नाहीत. विवाह सोहळा संपून सगळे लोक निघून गेले आणि त्यानंतर ते आले पण त्यांचा पूर्ण हिरमोड झाला होता. त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यासाठी व योग्य पाहुणचार करण्यासाठी त्या ठिकाणी कुठलेच नेते राहिले नव्हते. तेव्हापासून मला वाटतं त्या खासदार मंत्र्याने परत कुठल्या अशा प्रसंगाला उशिरा जाण्याची चूक केली नसेल.
असो असा आपल्यापैकी अनेकांना अवेळी अगर योग्य वेळी केलेल्या गोष्टींचा अनुभव आला असेलच.
वेळेचे महत्व समजणे खरोखर खूप फलदायी असते.

माधव ना. गोगावले

पणती

घट्ट धरून ठेवली होती पणती तुझ्या प्रेमाची
तळहातावर.. ओंजळीत
वादळवारा पाऊसधारा साऱ्यांपासून सांभाळीत.
क्षणभरही न ढळलेली तिच्यावरची नजर...
विझू नये म्हणून केलेला काळजाचा पदर...
सारं कसं जय्यत..चिरेबंदी..अवघड...
सुटू नये हातून म्हणून चाललेली धडपड..

मग तू आलास!!

नेहमीसारखा. हसत...बरसत..हवासा
वाटलं, लावशील आता तूही हातभार जरासा...
डोळ्यात तेल घालून, तूही पणती राखशील...
रात्रंदिवस चटके सोसत, तूही थोडी जपशील...
पण एकच क्षण हसत, डोळ्यांमध्ये बघत,
तू माझी ओंजळ धरलीस,
आणि थरथरणारी पणती अलगद पाण्यात सोडलीस...
आता पणती लाटांवर स्वार, भीतीच्या पार...
वाऱ्याशी खेळते आहे
खोल खोल सागरात, मनाच्या गाभाऱ्यात
चांदण्यांशी बोलते आहे
आता ती स्थिर, रिती मी
आणि मोकळे श्वास...
आणि तिच्या तेजानं उजळलेलं आकाश!!

शेवटी एवढंच कळतं..
जळण्यापेक्षा तेवत राहणं,
जास्त सुंदर असतं!!

शिल्पा देशपांडे

दोन कविता

१

आहे हे असं आहे

एखाद्या रात्री कधीतरी, जमा होतात सावल्या,
गरम होतात डोळे नि तडतडतात बाहुल्या...

मुक्यानेच सांगू लागतं, दुखलेलं पाणी,
“इतकं हळवं चुकूनसुद्धा असू नये कोणी..."

गाऊ नये कोणी कधी, उदास उदास गाणी,
कळावीत सारी दु:खं, इतकं होऊ नये ज्ञानी...

वाचूच नये मुळात, कुठलं जाडजूड पुस्तक,
विचारांपासून शक्यतो, दूर ठेवावं मस्तक...

जशी नजरेस दिसतात, तशीच पहावीत चित्रं,
जसे आपल्याशी वागतात, तसेच समजावेत मित्र...

उगाच फार खोल आत, नेऊ नये दृष्टी,
खऱ्या समजाव्यात साऱ्या, सुखांताच्या गोष्टी...

पेनाच्या जिभेवरच, सुकू द्यावी शाई,
फार त्रास होईल असं, लिहू नये काही...

हळवं बिळवं करणारे मुळात, जपूच नयेत छंद,
करून घ्यावीत काळोखाची, सगळी दारं बंद...

सायंकाळी एकटं एकटं, फिरू नये दूर,
समुद्रकिनारी लावू नये, आर्त, उत्कट सूर...

चालू नये सहसा, फार ओळखीची वाट,
भेटलंच अगदी कुणी, तर मिळवावेत हात...

जमल्यास चारचौघात, बघावं थोडं मिसळून,
लहान मुलासारखं कधीतरी, भांडावं उसळून...

आवडणार नाही पंचमीच्या चंद्राची कोर,
एवढंसुद्धा कोणी कधी, होऊ नये थोर...

घट्ट घट्ट बसलेल्याही, सुटतातच गाठी,
कपाळावर म्हणून सारखी, आणू नये आठी...

साकळू देऊ नये फार, खोल खोल रक्त,
कुणापाशी तरी नियमित, होत जावं व्यक्त...

माणसांचं मनास लावून घेऊ नये फार,
होऊ द्यावा थोडा हलका, त्यांचासुद्धा भार...

तुटून जावीत माणसं एवढं, पाळू नये मौन,
वरचेवर करत जावा, प्रत्येकालाच फोन...

ठेवू नये जपून, वहीत पिंपळाचं पान,
साध्यासुध्या गोष्टीत, असा गुंतवू नये प्राण...

जमा होत राहील सारखा, पापणीआड थेंब,
इतकंसुद्धा मन लावून करू नये प्रेम...

श्वास घेणंसुद्धा अगदीच वाटू लागतं व्यर्थ,
शोधत बसू नये म्हणून, जगण्याचा अर्थ...

वाटलंच जर कधी, सगळं सगळं आहे शून्य,
आहे हे असं आहे ...हे करून घ्यावं मान्य.."

२

इतकं समजावूनसुद्धा
जमा होतात सावल्या,

गच्च गच्च होतात डोळे,
थरथरतात बाहुल्या...

आतून आतून सगळ्याचीच
मग येत राहते चीड,

दिवस जितका सुटसुटीत
तितकीच रात्र गिचमीड...!

अश्विनी कुंटे

आनंदाचा पारिजात

बहरलेला पारिजात बोलला खिडकीतून ओणवून,
सैरभैर मना ये ना रे बाहेर,
बघ जरा फांदीवर विसावून ||

देतो तुला फुलपाखराचे पंख,
ये जरा फिरून,
कर रंग गोळा फुलाफुलातून ||

बघ नाहीतर एकदा मधमाशीचे पंख लावून,
आण पराग कणांतून,
मधाळ गोडवा शोषून ||

क्वचित लाव पंख भुंग्याचे,
पण सत्वर ये,
कमळाला अलगद स्पर्शून ||

गरुडाचे पंख मात्र लाव निर्धार करून,
घेऊन उंच भरारी, ये परत,
आत्मविश्वासाचे कवच लेवून ||

शुभ्र आणि केशरी आनंदाचा सडा घालून,
मी इथेच नक्की थांबून राहीन,
तुझ्याकडे डोळे लावून ||

घे आनंदाचा सुगंध आत भरभरून,
ती खिडकी तेवढी उघडी राहु दे,
मी तुझी वाट पाहीन, नेहमी असाच बहरून ||

अलका धाराशीवकर

तीन कविता

१

मोल त्या प्राणांचे तरी
आम्हा उमजेल कधी

अश्रू ढाळी माता कुणी
पुत्र जिने गमविला रणी

फोडते टाहो कुणी
प्रेत पतिचे पाहूनि
आक्रोश विधवा करी
तान्हुल्यास धरुनि उरी

उधळली मायभूमीवरी
ती ही सुमने खरी
सलते जे अंतरी
खंत ही हृदयांतरी

मोल त्या प्राणांचे तरी
आम्हा उमजेल कधी

२

त्या स्वरांनी केले गारुड
वेड लावले, भान हरपले
नादावलो अन् खुळ्यागत
वाट चाललो मंत्रमुग्ध मी
त्या सुरांनी केले गारुड
झंकारली शरीरवीणा
रोमांचित अन् देही कण कण
भावसमाधी त्या सुरातूनी
कैवल्यसोहळा झाला क्षण क्षण

३

दिवस रात्रीच्या सीमेवरील,
नभी दाटली मेघांची गर्दी
सागरास मग येऊन भरती
दिशादिशांतून गेली वर्दी
वसुंधरेस कवेत घेण्या,
किंचित झुकले दूरवर अंबर

साक्ष त्या होण्या क्षणाची,
सूर्य थबकला मावळतीवर
आसमंत आणिक होई,
अगणित रंगांची उधळण
हर्षभराने डोलली राई,
सोहळ्यास देई अनुमोदन

विक्रम गोखले

कसं ठरवू?

एकाच नाण्याच्या दोन बाजू ,
कोणती डावी आणि कोणती उजवी कसं ठरवू ?

एकाच व्यक्तीच्या दोन तऱ्हा
तिच्यावर रागावू की तिला समजावू, कसं ठरवू ?

एकाच शहरात दिसतात, मनोरे आणि झोपडपट्ट्या
हा सर्वांचा विकास आहे की फक्त काहींचा, कसं ठरवू ?

जेव्हा माणसं बदलली वाटतात,
तेव्हा ती आपली की परकी, कसं ठरवू ?

जीवन जगायचं तर आहेच,
पण मग मुक्तपणातली धुंदी अनुभवू की चाकोरीतली शांतता, कसं ठरवू ?

जेव्हा असे हजार विचार गुंगत रहातात मनात ,
तेव्हा ते प्रश्न आहेत की उत्तरं, कसं ठरवू ?

अगं वेडे ,
'दोन बाजू असणं' तर जगण्याचं सार आहे.
'जगणं' आणि एके दिवशी 'जाणं' एवढंच आपल्या हातात आहे .

रत्नांगी निलेश मालपेकर

“सुख म्हणजे नक्की काय असतं?”

प्रशांत दामलेच्या नाटकातून शिकागोने शोधलं – हास्य, सहजीवन आणि सुखाचं खरं सूत्र!

शिकागो, ऑक्टोबर १७, २०२५

सुख जर बाटलीत भरून विकता आलं असतं, तर शिकागो मराठी मंडळाने (MMC) त्याचं पेटंट घेतलं असतं!
नेपरविल थिएटरचं रूपांतर झालं एका हॅपिनेस लॅबोरेटरीमध्ये, आणि त्या प्रयोगशाळेचा मुख्य वैज्ञानिक होता आपला सर्वांचा लाडका कलाकार प्रशांत दामले!

“शिकायला गेलो एक” हे नाटक म्हणजे केवळ हास्याचा कार्यक्रम नव्हता; ते होतं Ph.D. in Happiness जिथे हास्याच्या प्रयोगातून मिळालं जीवनाचं तत्त्वज्ञान.
प्रेक्षक हसले, विचारात पडले, आणि शेवटी जीवनावर प्रेम करायला लागले, तेही एका संध्याकाळमध्ये!

MMC २०२५ ने तर “Guinness School of Greatness” मधूनच पदवी घेतली असावी!
इलिनॉय, विस्कॉन्सिन, आयोवा आणि इंडियाना या चार राज्यांतील ९०० हून अधिक मराठी प्रेक्षकांनी थिएटरला mini-BMM carnival बनवलं.
कार्यक्रमाच्या प्रत्येक तपशिलात उत्साह, व्यावसायिकता आणि प्रेमाची छटा दिसत होती.
नमीताताई, उल्काताई आणि त्यांच्यासोबत वीर दोशी, रेखाताई यांसह अनेक दृश्यमान आणि असंख्य अदृश्य हातांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.
त्यांच्या समर्पणाशिवाय असा भव्य सोहळा शक्यच नव्हता.
MMC २०२५ टीमचा हा एकत्रित “हास्य-प्रकल्प” परिपूर्णतेचा आणि सहकाराचा सर्वोत्तम नमुना होता.

द. मा.मिरासदार यांच्या कालातीत कथेतून प्रेरित हे नाटक TikTok meets Tulsibaug अशा अफलातून अंदाजात सादर झालं.

MMC टीम 'शिकायला गेलो एक' नाटकाच्या कलाकारांबरोबर

पुण्याचा आदर्शवादी शिक्षक आणि आमदाराचा बंडखोर मुलगा या संमिश्रणातून उडालेला विनोदाचा फवारा म्हणजेच “शिकायला गेलो एक.”
प्रत्येक पात्र साने गुरुजी असो की आमदार प्रेक्षकांच्या मनात उतरलं.
प्रत्येक संवादाने हशा आणि प्रत्येक थांब्याने शहाणपण दिलं.

नाटकाच्या माध्यमातून एक खोल प्रश्न पुन्हा जागा झाला
“सुख म्हणजे नक्की काय असतं?
जे हवं ते मिळालं, पण मन पूर्ण नाही झालं...
सहजतेत सापडलेलं जीवनच खरं सुख आहे.”

खरं सुख हे महागड्या वस्तूंमध्ये नाही, तर साधेपणात, मित्रांच्या गप्पांमध्ये आणि मनापासून उमटलेल्या हशांत लपलेलं असतं.
कार्यक्रम संपल्यानंतर टाळ्यांचा गडगडाट, हसऱ्या चेहऱ्यांची गर्दी, आणि मनात दामले यांच्या ओळींचे प्रतिध्वनी हाच होता खरा पुरस्कार.

माझ्यासाठी त्या क्षणीचं सुख म्हणजे काय?
९०० हसऱ्या चेहऱ्यांच्या गर्दीत उभं राहून जाणवलेला तो क्षण —

MMC ने त्या दिवशी केवळ नाटक सादर केलं नाही,
तर “सुखाची प्रयोगशाळा”च उघडली!
— “सुखाचं सूत्र म्हणजे गोंधळातही आनंद शोधण्याची कला!”

डॉ. राजीव गोखले

MMC दिवाळी २०२५ : आठवणींच्या दिव्यांची अविस्मरणीय रोषणाई

दरवर्षी दिवाळी येते, दिवे, फराळ आणि व्हॉट्सअ‍ॅप फॉरवर्ड्स घेऊन! पण बहुतांश दिवाळी उत्सव कालच्या चकलीसारखे आठवणींतून लवकर विरघळून जातात. मात्र MMC दिवाळी २०२५ ने "विसरण्याचा" पर्याय थेट रद्द करून "आयुष्यभर लक्षात राहणारी आवृत्ती" जाहीर केली, हे नक्की.

कार्यक्रमस्थळी प्रवेश करताच हसतमुख स्वयंसेवकांनी जणू (भावनिक अर्थाने) लाल गालिचाच अंथरला होता. नोंदणी काउंटर IPL च्या वेगात कार्यरत होता आणि त्यावर कडी म्हणजे गौरी नवलकरांचा अफलातून फराळ! बाहेर स्टॉल्सची रंगत काही औरच—सेंद्रिय साबण, झगमगणाऱ्या मेणबत्त्या, देखणे भारतीय पोशाख, दिव्य तेजात झळकणाऱ्या देवतांच्या मूर्ती आणि "लाडू सोडा, एव्हरेस्टला चला!" अशी साद घालणाऱ्या साहसी सहली.

आत प्रवेश करताच शाळेच्या छोट्या कलाकारांनी आत्मविश्वास, ताल आणि लय यांचा सुरेख संगम सादर केला. त्यानंतर MMC ची राजेशाही मेजवानी—कारण इथे संस्कृती आत्म्याला तृप्त करते आणि भोजन... उरलेलं सर्व काही! आणि मग आला कार्यक्रमाचा
महामेरू — 'सणकोंदण', ज्याला उपस्थितांनी "आयुष्यभर वॉरंटी असलेली आठवण" असा बहुमान दिला.

उगवत्या पिढीची संस्कृती-आरती

व्हीलिंग, बफेलो ग्रूव्ह, शॉमबर्ग आणि नेपरविल येथील मराठी शाळांनी रंगमंच खऱ्या अर्थाने उजळवून टाकला—संस्कृती, ताल आणि सर्जनशीलतेचा रंगीबेरंगी सोहळाच साकारला.

शॉमबर्ग शाळेच्या भक्तिमय गणपती स्तोत्राने वातावरण पवित्र झालं आणि 'देवा श्री गणेशा' या ऊर्जेने भरलेल्या नृत्याने भक्ती आणि जोशाचा सुरेख संगम घडवला.

नेपरविल शाळेच्या 'लख लख चंदेरी' व 'दिन दिन दिवाळी' या सादरीकरणांनी संस्कृती आणि आधुनिकतेचा देखणा मिलाफ उभा केला.

व्हीलिंग- बफेलो ग्रूव्ह शाळेने मराठी सणांच्या खाद्यपरंपरेवर आधारित अत्यंत कल्पक आणि खेळकर मांडणी करून जणू संपूर्ण सभागृहालाच "संस्कृतीचा मेजवानीदार" बनवलं.

या तिन्ही शाळांनी एक ठळक संदेश दिला—
संस्कृती आणि सर्जनशीलता हातात हात घालून चालली, की भविष्य दिवाळीच्या दिव्यांपेक्षाही उजळतं.
सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे मन:पूर्वक अभिनंदन!

सणकोंदण : परंपरेचा जिवंत प्रवास

आजच्या वेगवान, डिजिटल युगात—सेल्फी, सोशल मीडिया आणि कृत्रिम प्रकाशाच्या झगमगाटात—
मायमराठीचा सुगंध पुन्हा एकदा मंचावर दरवळला.
हरिनामाचा गजर, गीतरामायणाचे माधुर्य, भारुडाची ज्ञानधारा, मंगळागौर, भोंडला, पिंगे, कोळी नृत्य, ढोल-ताशे, लेझीम, दहीहंडी—संपूर्ण हिंदू पंचांग रंगमंचावर जिवंत झालं.
जिजाऊंनी शिवबाच्या हातात तलवार देण्याचा प्रसंग अवतरला, तेव्हा सभागृहात नि:शब्द आदराची लाट उसळली.

‘दर्शिका’ आणि ‘संस्कृतिका’ या दोन दिनदर्शिकांनी प्रेक्षकांना बारा महिन्यांच्या परंपराविश्वातून सफर घडवली—आधुनिकतेच्या वेगातही परंपरेचा हात सोडू नये, हा संदेश अंत:करणापर्यंत पोहोचवला.

या संपूर्ण भव्य कार्यक्रमाचा शिल्पकार म्हणून अनुप देशमुखांची भूमिका केवळ दिग्दर्शनापुरती मर्यादित न राहता संस्कृतीच्या शिल्पकारासारखी ठरली. लहान टॉडलर्सपासून ते “फॉरेव्हर यंग” कलाकारांपर्यंत सर्वांना एका सुरात बांधणं, ऐंशीहून अधिक झळकत्या कलाकारांना एकसंध प्रवाहात सादर करणं, आणि तीनशेपेक्षा अधिक प्रेक्षकांना खिळवून ठेवणं, ही कलात्मक कसरत त्यांनी विलक्षण सहजतेने साध्य केली. प्रत्येक प्रवेश, प्रकाशयोजना आणि ताल यामागे त्यांची सूक्ष्म दृष्टी स्पष्ट जाणवत होती.

या भव्य उपक्रमाला नमीताताईं वेदक यांचं प्रेरणादायी नेतृत्व लाभलं. त्यांच्यासोबत शिल्पा देशपांडे यांचे प्रभावी लेखन आणि संवाद, उर्मिलाताईंची ‘संस्कृतिका’,आणि शिल्पा चौबळ-वैद्य यांची ‘दर्शिका’ या सर्वांनी कार्यक्रमाला कलात्मक उंची दिली.
अनिता कुळकर्णी, प्रणिल वैद्य, सुहास गोसावी, मनोज जोशी, अनिरुद्ध दामले आणि असंख्य स्वयंसेवक ही खरी अदृश्य ताकद या सोहळ्यामागे उभी होती.

समारोप व अभिनंदन
शेवटी शंखनाद मंदावत गेला, पण मनात आठवणींची उजळलेली दीपमाळ कायमची प्रज्वलित राहील.
सभागृहातून बाहेर पडताना ओठांवर एकच सूर होता—
“जय जय रामकृष्ण हरी...”
यंदाची दिवाळी म्हणजे
एकात्मता, कला, हास्य आणि MMC च्या ‘अतिथीदेवो भव:’ संस्कारांचा तेजस्वी संगम.
दिवाळी जर प्रकाशाचा सण असेल,
तर MMC दिवाळी २०२५ ही आनंदाची फुल-व्होल्टेज वीज केंद्रच होती! ⚡✨

या भव्य, संस्कृतीसमृद्ध आणि दर्जेदार सोहळ्याच्या यशासाठी सर्व कलाकार, लहानग्यांपासून “फॉरेव्हर यंग” सहभागी, शिक्षक, पालक, सूत्रसंचालक, कोरिओग्राफर्स, तसेच स्टेज सेट-अप, साउंड सिस्टम आणि लाईटिंगची जादू घडवणारे सर्व तांत्रिक कलाकार—सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!

तसेच MMC 2025 आयोजन समिती, त्यांचे अहोरात्र झटणारे स्वयंसेवक, आणि संपूर्ण कार्यक्रमाला ऊर्जा देणारे, टाळ्यांचा वर्षाव करणारे, उत्स्फूर्त प्रतिसाद देणारे, आनंदाने ‘चीअर’ करणारे तीनशेहून अधिक रसिक प्रेक्षक या सर्वांच्या सहभागामुळेच MMC दिवाळी २०२५ हा केवळ कार्यक्रम न राहता एक सामूहिक, अविस्मरणीय स्मरणोत्सव ठरला.

आपल्या सर्वांच्या प्रयत्नांतून, सहभागातून आणि प्रेमातूनच हा प्रकाशोत्सव एवढा तेजस्वी झाला—
हा संस्कृतीदीप असाच पिढ्यान्‌पिढ्या उजळत राहो!

डॉ. राजीव गोखले

इलिनॉय राज्यातील भारतीयांसाठी सोनियाचा दिन

जगभरात कोट्यवधी लोक दिवाळी सण साजरा करतात. ह्या दिवाळी सणाच्या दृष्टीने अमेरिकेतील इलिनॉय राज्यातील ‘दिवाळी सण’ साजरा करणाऱ्या हिंदू, जैन, बौद्ध व शीख धर्मियांच्या दृष्टीने बुधवार ५ मार्च २०२५ हा “सोनियाचा दिन” ठरला. त्याला कारणही तसेच होते, ते म्हणजे स्प्रिंगफिल्ड या राजधानीच्या ठिकाणी असलेल्या टोलेजंग व आकर्षक अशा संसद भवनात (Illinois State Capitol Building) दिवाळी सणाला अधिकृत मान्यता देणारा संसद ठराव १०७५ (House Bill 1075) द्विपक्षीय समितीपुढे मांडला जाणार होता.

हा ठराव द्विपक्षीय समितीमध्ये आणण्यासाठी Vernon गावच्या विश्वस्त आदरणीय गौरी मागती यांची महत्त्वाची भूमिका होती. गौरी मागती या स्वतः पुढाकार घेऊन शिकागो भागातील इलिनॉय राज्याचे आमदार डॅनियल डिडेच (Daniel Didech) यांच्याबरोबर या ठरावासाठी लागणाऱ्या सर्व तरतुदी पूर्ण करण्यासाठी झटत होत्या. यासाठी लेक काउंटी इंडियन्स असोसिएशन आणि HSS पांचजन्य शाखा बफेलो ग्रोव्ह आणि इतर भारतीय अमेरिकन समुदाय यांनीही मोलाचे योगदान दिले.
दिवाळी सणाला ह्या राज्यात सरकारची अधिकृत मान्यता मिळण्यासाठी हे विधायक विशेष द्विपक्षीय समिती मध्ये मांडले जावे आणि त्या सर्व सभासदांचा त्यासाठी बहुमोल पाठिंबा मिळावा, यासाठी शिकागो भागातील राज्याचे आमदार डॅनियल डिडेच (Daniel Didech) अनेक दिवस कसोशीने प्रयत्न करीत होते.

शिकागो परिसरातील वेगवेगळ्या भागातून एकवीस भारतीय स्प्रिंगफिल्ड राजधानीतील संसद भवनामध्ये ह्या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व भागीदार होण्यासाठी गेले होते. केवळ एक दोन दिवसाच्या पूर्व सूचनेवर, गौरी मागती, राजा मागती, राकेश मल्होत्रा, अमिताभ मित्तल, देवेश, हितेश देसाई, टीना रामकृष्ण, सरन्या राजी, नीरव जुओठी यांसारख्या विविध प्रांतातील उत्साही व्यक्ती या प्रसंगाच्या साक्षीदार होण्यासाठी तेथे उपस्थित होत्या.

महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अध्यक्षा नमीता वेदक यांच्यासह महाराष्ट्र मंडळ शिकागोचा विश्वस्त म्हणून मी स्वत:, (माधव गोगावले) माझी पत्नी ज्योती गोगावले, तसेच वृंदा पांडव, उर्मिला दाते, आणि ज्ञानदा पवार या प्रसंगी उपस्थित होते. काही प्रतिनिधी बसने तर काही प्रतिनिधी आपली कार घेऊन आलेले होते.

खरं म्हणजे, त्या दिवशी हवामान खूपच प्रतिकूल होते. सत्तर मैल वेगाने वारे वाहत होते. सुरुवातीला काही वेळ मुसळधार पाऊस व नंतर हिमवर्षाव (heavy snow) सुरू झाला होता. सुमारे एक मैल अंतरावर कार पार्क करून बोचऱ्या थंडीत चालताना एकच विचार मनात चालला होता, की आज आपण एका अनोख्या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी जात आहोत. विधानभवन सभागृहात हा महत्त्वाचा ठराव मंजूर होण्याच्या प्रसंगाचे साक्षीदार व भागीदार आपण होणार आहोत, या विचाराने त्या प्रतिकूल हवामानाचा आमच्यावर काही परिणाम झाला नाही. दु:खाची दरी ओलांडल्याशिवाय सुखाची हिरवळ दिसत नाही, त्याप्रमाणेच हे होते!

विधानसभा सभागृहात पहिल्या मजल्यावर आमदार आपापल्या आसनांवर बसलेले होते. अनेक आमदार आपापल्या मतदारांना व प्रतिनिधींना ठरल्या वेळी विधानसभागृहातील तिसऱ्या मजल्यावरच्या प्रेक्षकांच्या आसनावर नेत होते. वेगवेगळ्या ठरावांबद्दल आमदार व सचिव यांनी माहिती सांगितल्या नंतर सभागृहात आलेलेल्या मतदारांना व प्रतिनिधींना उभे राहण्यास सांगून त्यांचा गौरव केला जात होता. सर्व कसे व्यवस्थित आणि शिस्तीत चालू होते. सगळीकडे सुरक्षा अधिकारी होते. प्रेक्षकांनी कसले अडथळे आणू नयेत, यासाठी ते सगळीकडे फिरत होते व कटाक्षाने तशी काळजी घेत होते. आमदार डॅनियल डिडेच(Daniel Didech) यांनी House Bill 1075 ठरावाबद्दल माहिती सांगून, हिंदू संस्थेच्या प्रतिनिधींना उभे राहण्यास सांगितले. आम्ही सर्वजण अभिमानाने उभे राहिलो.

दुपारी दोन वाजता द्विपक्षीय समिती त्या दिवसातील ठरावावर मतदान करून निर्णय घेणार होती. मधल्या काळात आमदार डॅनियल डिडेच यांनी आम्हाला त्यांच्या कार्यालयाजवळील एका मोठ्या खोलीत नेले. त्या ठिकाणी दुपारचे जेवण करता करता सर्व प्रतिनिधींनी थोडक्यात आपली ओळख करून दिली. आमदार डॅनियल यांनी आम्हाला एक वाजून चाळीस मिनिटांनी ठराव समिती सभागृहात नेले.

प्रत्येकाची उत्कंठा शिगेला पोचली होती. इतर ठरावांच्या मानाने हिंदूंचे प्रतिनिधी खूपच बहुसंख्येने आल्यामुळे बऱ्याच जणांना उभे राहावे लागले होते. ठराव मांडणाऱ्या आमदारांनी ठराव मांडल्यावर मतदान घेऊन समितीचे अध्यक्ष निर्णय सांगत होते. दिवाळी सण ठरावाच्या अगोदर तीन-चार ठराव ५-३, ६-२, ५-३, अशा मताने पास झाले होते. आमदार डॅनियल यांनी हिंदूंच्या प्रतिनिधी आणि या ठराव्याच्या मुख्य पुरस्कर्त्या गौरी मागती यांना दिवाळी सणाबद्दल थोडक्यात माहिती देण्याची विनंती केली. गौरी मागती यांनी ती माहिती ठराव समितीसमोर वाचली. समितीच्या अध्यक्षांनी मतदानासाठी द्विपक्षीय समिती सभादांना विचारले. एका सभासदाने हात वर करून बोलण्याची परवानगी मागितली. थोड्या वेळापूर्वी झालेल्या तीन चार ठरावांवर एकाही सभासदाने तशी चर्चा घडवून आणली नव्हती. त्यामुळे आम्हा सर्वांच्या छातीत गोळा आला.
 'अरे बापरे रे! हे काय मध्येच माशी शिंकल्यासारखे?' असे वाटून प्रत्येकाच्या मनात शंकेची पाल चुकचुकली.

सर्वांनी कान टवकारून त्या सभासदावर लक्ष केंद्रित केले. थोड्या वेळातच परवानगी मिळाल्यावर त्या सभादांनी सांगितले, "मी अनेक दिवाळी कार्यक्रम पाहिलेले आहेत, ते किती आनंदी, भव्य, आणि सर्वांना सामावून घेणारे असतात. दिवाळी सणाचा उद्देश मानवतेसाठी खूपच चांगला संदेश देणारा आहे. दिवाळी सणाला राज्यात अधिकृत मान्यता देणाऱ्या ठरावाला माझेही नाव एक पुरस्कर्ता म्हणून घालाल का?" हे ऐकून आम्हा सर्वांना जीव भांड्यात पडल्यासारखे वाटले व आम्ही मनोमनी परमेश्वराचे आभार मानले.

अध्यक्षांनी त्याला होकार दिला व मतदान घेतले. मग सर्व सभासदांनी एकमतानेने ठराव पास झाल्याचे घोषित केले, तेव्हा आमच्या आनंदाला भरती आली आणि शिकागो भागातील सर्व एकवीस हिंदू प्रतिनिधींनी उभे राहून “जय श्रीराम” व “भारत माता की जय” या घोषणांनी सर्व सभागृह दणाणून सोडले.

या ऐतिहासिक सोहळ्याचे आपण साक्षीदार व भागीदार झाल्याचे समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होते. त्यानंतर सर्वांनी आमदार डॅनियल व गौरीचे आभार मानले व आनंदात फोटो सेशनकडे वळले. आता वाट पाहतोय, ती कधी एकदा दिवाळी येते, त्याची !

माधव ना. गोगावले

शब्दकोडे

१		२	■	३	■	४	■	५		६
	■		■	७			■		■	
८					■	९				
■	■		■	१०	११		■		■	■
१२	१३		१४	■		■	१५		१६	
■		■	१७					■		■
१८		१९		■		■	२०	२१		
■	■		■	२२		२३	■		■	■
२४					■	२५				२६
	■		■	२७			■		■	
२८			■		■		■	२९		

उभे शब्द्

१. चिंतन, हेतू, योजना
२. फसव्या, घातकी, कपटी
३. निकाल, प्रभाव, सार, निष्कर्ष
४. व्यवस्था, तयारी, उपाययोजना
५. दक्षता, शुद्धी, जागृतावस्था
६. चंचल, अस्थिर, सूक्ष्म
११. गणेश, वक्रतुंड
१३. असुर, क्रूर, दुष्ट
१४. फसवणूक, खोटेपणा
१५. तोरण, निशाण, ध्वज
१६. अल्पकालीन, नश्वर, अशाश्वत
१९. स्वतःजवळचा पैसा खर्च करणे
२१. जगबुडी, सर्व जगाचा नाश
२२. त्रास, पीडा, गडबड, तंटा
२३. कौशल्य, चातुर्य, युक्ती
२४. सुमार, अदमास, प्रमाण
२६. रौप्य, चांदी

आडवे शब्द्

१. उपहास, चेष्टा, थट्टा, मस्करी
५. तडीस नेलेले, मिळवलेले, साचवलेले
७. संगीताचा सराव
८. जी. ए. कुलकर्णी यांचा १९७५ साली प्रकाशित झालेला कथासंग्रह
९. नाथमाधवलिखित प्रसिद्ध बालकादंबरी
१०. गाभा, गीर, मेंदू
१२. बेबंदशाही, अंदाधुंदी, बेलगाम
१५. तपासणी, निदान, समालोचन
१७. _____ पाश दैवे ज्याच्या, दास्य, गुलामगिरी
१८. दहाने गुणल्यास मिळणारी संख्या
२०. श्रमजीवी, हेलकरी, मजूर
२२. सोने, सुवर्ण
२४. विवाहसमयी वधू आणि वर यांच्या दरम्यान धरलेला पडदा
२५. सूर्योदयापासून पहिल्या तीन तासांचा कालावधी, पहिला प्रहर
२७. लेखणी, परिच्छेद, कुंचला
२८. वृद्ध, दुर्बल, जराजर्जर
२९. पित्ताशय

गोसावी

काळाच्या ओघात शब्दांचे अर्थ बदलत राहतात. शब्दाचा अर्थ कसा आणि किती बदलतो, याचा काहीही नियम सांगता येत नाही. काही शब्दांचे अर्थ तर इतके बदलतात, की मूळ अर्थाच्या जवळजवळ उलट अर्थ त्या शब्दाला प्राप्त होतो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे मराठीतील ‘गोसावी’ हा शब्द. ‘गोसावी’ या शब्दाचा आजचा अर्थ असा आहे, की ज्याने संसारसुखाचा त्याग करून वैराग्य पत्करले आहे, असा माणूस. यामुळेच मग घरदार नसलेला, बायकोपोरं नसलेला म्हणजे सडाफटिंग, असा जो माणूस, त्यालाही गोसावी म्हणण्याचा प्रघात पडला. भारतात नाना प्रकारचे गोसावी संप्रदाय असून, ते फार पुरातन काळापासून आहेत. ब्रह्मचर्य पाळणं, भिक्षेवर निर्वाह करणं आणि तीर्थयात्रा करणं हा बहुतेक सर्व गोसाव्यांचा आचारधर्म आहे. थोड्या गोसावी संप्रदायात लग्न, घरदार, शेती किंवा व्यापारउदीम करून राहण्याची प्रथा आहे. सगळ्यांत मौजेची गोष्ट म्हणजे सिकंदर भारतात आल्याच्या वेळी पंजाबात गोसाव्यांचं एक लहानसं राज्यच होतं. सम्राट चंद्रगुप्ताच्याही काळी गोसाव्यांची लहानलहान राज्यं होती, असे उल्लेख इतिहासात आहेत. गोसाव्यांमध्ये क्षत्रिय परंपरा असल्याचंही दिसतं. गोसावी लोक मोठ्या संख्येने राजपुतांच्या आणि मराठ्यांच्या बाजूने लढल्याचे उल्लेख आहेत. तरीही ‘गोसावी’ म्हटलं, की आपल्या मनात कमरेला लंगोटी लावलेला किंवा आखूड वस्त्र गुंडाळलेला, पोटापर्यंत दाढी वाढवलेला, खांद्यावर उत्तरीय घेतलेला, हातात दंडा असलेला बैरागीच येतो.

ज्यापासून ‘गोसावी’ हा शब्द तयार झाला तो मूळ संस्कृत शब्द आहे ‘गोस्वामिन्’. गो म्हणजे गाय आणि स्वामिन् म्हणजे धनी किंवा मालक. प्राचीन काळात गाय ही संपत्ती मानली जाई. ज्याच्याकडे खूप गायी आहेत, तो श्रीमंत म्हटला जाई. त्यामुळे ‘गोसावी’ शब्दाचा जुन्या मराठीतील अर्थ श्रीमंत, राजा, किंवा श्रेष्ठ माणूस असा होता.

पांडव विराट राजाकडे अज्ञातवासात राहिलेले असताना कौरव विराट राजावर चाल करून आले आणि विराटाच्या गायी पळवून नेण्याचा प्रयत्न करीत होते, ही कथा सर्वश्रुत आहे. पूर्वीच्या काळात खूप खूप गायी असणं हे राजाचं वैभव मानलं जाई, म्हणून राजाला ‘गोसावी’ असंही म्हटलं जाई. राजालाच कशाला, तर एखाद्या धर्मसंस्थापकाला, धर्माचार्यालादेखील श्रेष्ठ या अर्थी ‘गोसावी’ म्हटलं जाई. उदाहरणार्थ, महानुभाव धर्माचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी श्रेष्ठ होते, म्हणून त्यांचा उल्लेख ‘गोसावी’ असाच केला जाई. पण आजचा ‘गोसावी’चा अर्थ किती वेगळा झालेला आहे! आज गोसावीचा अर्थ कफल्लक असा झाला आहे. याबाबत एक गमतीची गोष्ट सांगतो. मराठी चित्रपट - अभिनेते राजा गोसावी यांनी चित्रपटातल्या आपल्या विनोदी भूमिकांनी एक काळ खूप गाजविला होता. स्वतःची ओळख गमतीने करून देताना ते म्हणत, “मी राजा नावाचा (कफल्लक) गोसावी आहे."

प्रा. द.दि.पुंडे

सुख नव्हे सुखरूपता

(परमपूज्य श्री. मंगेशदादा फडके हे कॅलिफोर्निया येथे वास्तव्यास असून प.पू. श्रीकृष्ण दत्तात्रय देशमुख उपाख्य प. पू. डॉक्टरकाका यांचे कृपांकित शिष्य आहेत व त्यांच्याच कृपेने आज स्वतः सद्गुरुपदी विराजमान आहेत. सद्गुरूंच्या कार्यासाठी आपल्या यशस्वी व्यावसायिक कारकीर्दीतून निवृत्ती घेऊन अनेक पारमार्थिक कार्यक्रमाचे आयोजन, विविध आध्यात्मिक विषयांवरील निरूपणे व प्रवचनांच्या माध्यमातून ते सातत्याने प्रबोधन करीत असतात. त्यांच्या निरूपणाचा लाभ अध्यात्मपीठावरील श्रोते घेतच असतात; पण त्यांच्या या अध्यात्मविषयक सदरातून आपल्याही अनेक प्रश्नांचे निरसन होईल अशी आमची खात्री आहे - संपादक)

भाग ४

।। श्री गणेशाय नमः ।।

आपल्या सर्वांच्याच मनात अध्यात्म किंवा परमार्थ याविषयी कुतूहल असते, काही प्रश्न असतात. पुढील काही लेखांमध्ये शास्त्रप्रणित म्हणजे वेदांतशास्त्राच्या आधारे व संतप्रणित म्हणजे संतांच्या उपदेशाच्या आधारे परमार्थाविषयी मूलभूत संकल्पना आपण समजून घेणार आहोत ज्यायोगे आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळण्यास मदत होईल.

साधकाच्या प्रामाणिक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची ईश्वरीय व्यवस्था असते. ईशकृपेचे ते स्वरूप आहे. 'रचना' संकल्पित 'सुख नव्हे, सुखरूपता' ही लेखमालिका त्याचाच एक भाग आहे ही आमची श्रद्धा आहे.

मागील अंकात आपण विषयातून प्राप्त होणाऱ्या सुखाची नेमकी प्रक्रिया समजावून घेतली. प्रत्यक्ष विषयभोगाच्या क्षणी जेव्हा आपले अंतःकरण शांत होते, तेव्हा आपल्या हृदयात सतत असलेल्या सुखरूपतेचा प्रत्यक्ष अनुभव येतो. परंतू भ्रमाने मला विषयामुळे सुख मिळाले असे वाटते. हे रोजच्या जीवनातील उदाहरणाने स्पष्ट करून घेतले. या पार्श्वभूमीवर सुख (विषयसुख) व आनंद (आत्मसुख किंवा सुखरूपता) यातील फरकही तपशीलासह लक्षात घेतला.

या अंकात विचारांची (चिंतनाची) तीच शृंखला सुरू ठेवून निर्माण होणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे बघू या-

१) निद्रेचे महत्व काय आहे ?

सर्व प्राण्यांची (मनुष्य आणि मनुष्येतर) प्रत्येक हालचाल सुखासाठी असते. सर्वांना विषयांच्या माध्यमातून कितीही सुखे मिळाली, तरीही गाढ निद्रा हवीच असते. झोपेसाठी आपण सर्व विषयसुखे बाजूला सारायला प्रवृत्त होतो. गाढ झोप न मिळाल्यास बेचैन होतो, झोपेच्या गोळ्या घेतो. उत्क्रान्तिवादाच्या सिद्धान्ताप्रमाणे, कोट्यवधी वर्षांमध्ये सर्व प्राण्यांच्या शरीररचनेत अनेक बदल झालेत. परंतु, आधुनिक विज्ञानाने सिद्ध केले आहे, की एका बाबतीत कुठल्याही प्राण्यामध्ये काहीही बदल झालेला नाही, ती म्हणजे झोप! निसर्गाने सुद्धा झोप ही गोष्ट अबाधित ठेवून त्याचे मूलभूत महत्व अधोरेखित केले आहे. गाढ झोपेत सर्वांना विषयावाचून सुखाचा अनुभव येतो व व्यक्तिपरत्वे त्यात भेद नसतो. साधा तर्क मला असे सांगतो, की एकही विषय नसताना झोपेत सुख प्राप्त होते त्याअर्थी विषयात सुख असते हे निदान पूर्णसत्य नाही. शास्त्रदृष्टीने तो अविचार ठरतो. त्याचप्रमाणे विषय बाजूला सारून झोपेचा आश्रय केला जातो त्याअर्थी विषयातून मिळणाऱ्या सुखापेक्षा झोपेतील सुख अधिक (श्रेष्ठ) ठरते.
निद्रा ही केवळ थकलेल्या शरीराच्या विश्रांतीपुरती मर्यादित मानल्यास, झोप न येऊ देता शरीराच्या विश्रांतीची स्वतंत्र व्यवस्था करता येऊ शकते. परंतु, एवढ्याने भागत नाही याला आपला अनुभव साक्षी आहे. मेंदूच्या विश्रांतीचा विचार केल्यास त्याचे स्वरूप विचारांना स्थगिती (अंतःकरणाचा लय) हे ठरते. याचे वर्म वेदान्तशास्त्राच्या साहाय्याने उलगडते.

२) निद्रेतून प्राप्त होणाऱ्या सुखाची नेमकी प्रक्रिया काय आहे ?

गाढ झोपेत जे सुख प्राप्त होते ते आत्मसुखच आहे असा वेदान्तशास्त्राचा यासंबंधी निर्णय आहे. एकमेवाद्वितीय तत्त्वाचा तो अनुभव असल्याने गाढ झोपेतील सुखाचा अनुभव सर्वांचा समान असतो. तो अनुभव सर्वांचा सारखाच, तसाच व तितकाच असतो. व्यवहारात अनंत भेद असलेल्या प्राणिमात्रांमध्ये असलेला हा समान अनुभव हे स्थूल दृष्टीने पाहिल्यास एक महदाश्चर्यच ठरते.
वेदान्तशास्त्राच्या सरणीप्रमाणे जीव जेव्हा गाढ झोपतो तेंव्हा त्याची सर्व इंद्रिये (सूक्ष्म) व अंतःकरण त्याच्या सर्व वृत्तींसह अज्ञानात मिसळून जातात व अज्ञान ब्रहतत्त्वामध्ये लीन होऊन राहते. फक्त प्राण जागे राहून कार्य करतात. अज्ञानासह अंतःकरण स्वरूपाला जाऊन टेकल्याने, सूक्ष्म बुद्धिवृत्तीच्या साहाय्याने ब्रह्मानंदाचे भान होते. परिणामतः जागे झाल्यावर 'खूप गाढ झोप लागली होती व काही कळले नाही' असा ज्ञानाचा तर 'आता फार छान वाटते आहे' असा आनंदाचा अनुभव सांगता येतो. अनुभव सांगता येतो आहे म्हणजे स्मृती आहे व स्मृती आहे म्हणजे संस्कार आहे. ब्रह्मतत्त्वाचा तीनही (जागृती/स्वप्न/सुषुप्ती) अवस्थांमध्ये अन्वय आहे.
या आनंदाच्या अंशावरच सर्व जीव जगत असतात आणि म्हणूनच सर्वानाच गाढ झोप हवीहवीशी वाटते. ईश्वराने सर्व जीवांच्या सुखाची केलेली ती एक उत्तम व्यवस्था आहे. त्यात कसलाही भेद नाही.

३) निद्रा व समाधी यात फरक काय ?

स्थूल दृष्टीने विचार केल्यास गाढ झोपेत प्राप्त होणारा आत्मानंद हा समाधीचा अनुभव म्हणायला हवा आणि प्रत्येक जीव मुक्त व्हायला हवा. पण तसे होत नाही कारण जाग येताच, जीव झोपी जातांना जसा संसारी (अज्ञानी) असतो तो तसाच राहतो. याला कारण तो अज्ञानाच्या आवरणासह निद्राकाळी ब्रह्मात लीन होतो. अज्ञानाने जीवाला गाढ झोपेतही सोडलेले नसते. अज्ञानाचा पातळ पडदा तेथेही आहे. म्हणून गाढ झोपेला म्हणजे सुषुप्तीला घन अज्ञान असेही नाव आहे. घन अज्ञान बीजभावाने सुषुप्तीच्या अंकुरभावाला आणि स्वप्न/जागृतीच्या फलभावाला कारण म्हणून त्याला कारणदेह हे नाव मिळाले.
गाढ झोपेबद्दल पंधराव्या अध्यायात ज्ञानेश्वर माऊली म्हणते -
साचचि पुढती वीरा। जरी न येता स्वप्न जागरा। तरी ब्रह्मभावो साचोकारा। म्हणो येता॥ज्ञा १५.५१८॥
याचा भावार्थ - खरेच अर्जुना जर हा जीव सुषुप्तीतून स्वप्न व जागृतीच्या अवस्थेला प्राप्त झाला नसता, तर सुषुप्तीला यथार्थ ब्रह्मभाव म्हणता आला असता. सुषुप्तीत स्वप्न व जागृती यांची अप्रतीती असली (mutually exclusive) तरी त्याविषयी मिथ्यात्वनिश्चय नसतो म्हणजे अज्ञान कायमच असते. याच एका उणिवेमुळे सुषुप्तीला ब्रह्मभाव (समाधी) म्हणता येत नाही.

पुढील अंकात अनुभव, तर्क व शास्त्राच्या आधारे सुरू असलेल्या सुखरूपतेच्या या चिंतनाच्या निष्कर्षाचा विचार करू.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

प.पू. श्री. मंगेशदादा फडके

अधीन - व्यसनाधीन

‘रचना’ साठी लिखाण हे आता माझे नित्यकर्मच झाले.त्या निमित्ताने डॉक्टरांच्या गाठीभेटीसुद्धा वाढल्या. आता फक्त केसबद्दलच बोलणे असे काटेकोर न राहता केस संबंधित इतरही चर्चा घडू लागल्या. बोलता बोलता डॉक्टर म्हणाले, ‘कोणताही पेशन्ट आपल्या आजारांची, चुकांची, सवयींची, व्यसनांची जबाबदारी घेत नाही.’
मी निरागसपणे विचारले, ‘ते कसे काय?’
‘थांबा, मी तुम्हाला तीन वेगवेगळ्या घटना सांगतो. या तिन्ही प्रसंगांत तुम्हाला काय साधर्म्य आढळते ते मला सांगा.’ असे म्हणून डॉक्टरांनी सांगायला सुरुवात केली

प्रसंग १

माझ्या ओपीडीत बसलो होतो. तेलंगणा तसे नांदेडपासून बरेच जवळ. आदिलाबाद, म्हैसा, निर्मल, बोपण सगळीकडचे लोक नांदेडला तपासणीसाठी येतात. आरोग्य, सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, तपासण्या सगळ्या दृष्टीने नांदेड सरस आहे. असो. माझ्यासमोर पाच सहा तेलगू महिला बसल्या होत्या. त्यातली एक स्त्री पेशंट होती. तिच्याबद्दल इतर बायका सांगू लागल्या, ‘ झोप येत नाही, बेचैन राहते, चिड्चिड करते,ओरडते, संतापते, अचानक घाबरते, कोणी मारेल का, कोणी येईल का, काही करेल का असे म्हणते. हातपाय थरथर करतात. काल तर तिला फ़िट्स आल्या. काहीतरी इलाज करा डॉक्टर..’
थोड्याच वेळात त्या बायकांमध्ये कुजबुज सुरू झाली. ‘नुवु-चेप्पु, नुवु-चेप्पु, नेलू,लेदू, नुवु, चेप्पु’ (तू सांग,तू सांग, मी नाही, तू सांग.) मी बघत होतो. तेलगू थोडेफार कळते मला. नंतर शेवटी हो नाही करता करता एक बाई म्हणाली, ‘डॉक्टर तिचा बटवा बघा. ते त्रासाचे कारण आहे.’

मी म्हटले, ‘बघू…’ तर त्या बाईने तळहाताएवढी काचेची चपटी बाटली दाखवली. बटव्यातील शिंदी संत्री नावाची दारू. ह्या अशा दहा-पंधरा बाटल्या गटागट पचवणे असे तर रोजच चालू असते साहेब तिचे.’
माझे कोडे सुटले. दारूचे व्यसन अचानक बंद झाले असेल किंवा कमी झाले असेल. किंवा पैसे नसतील. दारूचे सेवन कमी झाल्याचे चिन्ह दिसत होते. तिला अॅडमिट केले. औषधे, इंजेक्शन, गोळ्या दिल्या. तीन-चार दिवसांत तिला सुट्टीचे कार्ड देताना म्हणालो, ‘बाई आता दारूला कायमचा रामराम ठोका.’
लगेच बाई म्हणाल्या, ‘या टेन्शनचे काय करू डॉक्टर. तरास होतो. डोक फुटतं टेन्शनने दारु नाही घेतली तर. एवढे दिवस या दारूनंच तर वाचवलं.’

प्रसंग -२

माझ्या घरी खूप पाहुणे होते. कार्यक्रम होता. पुरणावरणाचा स्वयंपाक, भांडी खूप जास्त होती. आमच्या भांडेवाल्या बाई आल्या. सोनाबाई त्यांचं नाव. त्यांनी भांड्यांचा ढिगारा पाहिला. ‘माय वो, लयी जास्त हायेती भांडी. बाई, चहा टाका फक्कडसा. साकर तीन चमचं बरं!’ एव्हाना चंचीतून तिने छोटी चुन्याची डबी, तंबाखूचा पुडा काढला. उकिडवे बसून तिने लयबद्ध पद्धतीने थोडा चुना, थोडा तंबाखू असे करत करत बोराएवढा गोळा तयार केला. फ़ुर्रर फुर्रर करत चहा घेतला आणि हा तंबाखूचा लाडू दाढ आणि गालात खुपसत जशी किल्ली फ़िट बसवतात तसा बसवला. ते पाहून मी म्हणालो, ‘ काय सोनाबाई, काय ही सवय?
एवढाल्लं काम उरकायला माल तर लागतोय ना भाऊ! मी निरुत्तर झालो.

प्रसंग - ३

१४ वर्षांची जुही गाल फुगवून माझ्यासमोर बसली होती. तिची आई आणि बाबा होते सोबत. आई रागारागात तावातावाने बोलत होती, ‘सतत एकतर तो टी.व्ही. हवा नाहीतर मोबाईल हवा. थोडे तिला अभ्यासाबद्दल संगितले, अति करू नको म्हणून संगितले, एवढे अति करू नको म्हणून संगितले, मोबाईल काढून घेतला तर आदळआपट करते. अन्न सोडते. कोंडून घेते. बोलतच नाही. मोबाईल दिला आणि टी.व्ही. कनेक्शन चालू केले तर सगळे काही पूर्ववत.’
आई-बाबांना मी बोहर पाठवले आणि जुहीशी बोलू लागलो.
‘जुही, तुला पटते का हे सगळे?’
जुही म्हणाली, ‘ हो, करते मी एवढे सगळे. मोबाईल तासनतास वापरते, गेम्स खेळते, यूट्यूबच्या क्लिप्स पाहते.
मग मी विचारले, का गं? असे का करतेस?’
काय आहे ना डॉक्टर! आई-.बाबांची सारखी कटकट असते, हे कर, ते कर, हे करू नकोस. शाळेत बाई आणि सरांची कटकट आणि घरी आई- बाबांची कटकट. म्हणून मग उरतेच काय? म्हणून मग मी मोबाईल वर गेम खेळते, टीव्ही बघते.’
तिन्ही प्रसंग सांगून डॉक्टरांनी माझ्याकडे भुवया उंचावून पाहिले. उत्तरादाखल मी माझे मत त्यांना सांगितले. या तिन्ही घटनांमध्ये एक साम्य आहे.

१) खूप टेन्शन म्हणून दारू
२) खूप कामाचा बडगा म्हणून तंबाखू
३) कटकटीपासून सुटका म्हणून मोबाईल- टीव्ही

कोणी म्हणत नाही; पण मला हे आवडते म्हणून केले. पण आता मला ही सवयच लागली आणि आता मला या दुष्टचक्रातून बाहेर पडायचे आहे.
'अगदी बरोबर!' डॉक्टरांनी दाद देत पुढे संभाषण सुरू ठेवले. माणसांचे कसे असते ना, जबाबदारी न घेणे, आपल्या चुकांचे ठेपर दुसऱ्यांवर फोडून आपल्या वाईट सवयीचे निराकरण किंवा स्वतःच्या सवयी किंवा स्वतःचे वागणे कसे बरोबर आहे, हे स्पष्टीकरण देणे हे खूप कॉमनली आपल्या आजूबाजूला दिसते. व्यसनाधीनतेची सुरुवात बहुधा टेन्शन, बर्डन, त्रास यापासून होते. ही व्यसनाधीनतेकडे जाणारी पहिली पायरी. एकदा केले, छान वाटले. सारखे सारखे तसेच वागत राहिले तर सवय लागते. सवय खंडित करण्याची मानसिकता नष्ट होणे म्हणजेच 'लत' लागणे आणि मग व्यसनाधीनता टोकाची होऊन बसते. व्यसने ही मानसिकता आणि शरीर तर पोखरतातच; पण बाह्य वर्तनसुद्धा लक्षात येण्याइतके विक्षिप्त होते.
तात्पर्य हेच, की करणे सोडा, काय योग्य, काय अयोग्य याची शहानिशा करा. ' योग्य ' ही नेहमी डोंगराची चढती वाट आहे. अयोग्य ' ही नेहमी डोंगराची उतरती वाट आहे. चढणं अवघड असते, पण अंतिमत: सुख देणारे ठरते. पसरण सोपी असते पण अंतिमताः गर्तेत लोटते. जाणा, पारखा, घडवा तुमचे व्यक्तिमत्त्व.

रश्मी वडवळकर

मटार ढोकळा

साहित्य :

रवा	१ कप
मटार	१ कप
दही	अर्धा कप
हिरवी मिरची, आलं पेस्ट	१ च. च.
कोथिंबीर	अर्धा कप
मीठ	चवीनुसार
साखर	१ च. च.
तेल	१ च. च. (मिश्रणात)
तेल	१ च. च. (ढोकळा पात्रासाठी)
काश्मिरी तिखट पूड	अर्धा च. च.
इनो	१ च. च.

फोडणीसाठी साहित्य :

तेल	२ च.च.
जिरे मोहरी	एकेक च.च.
हिंग	चिमूटभर
तीळ	२ च.च.
कोथिंबीर	२ च.च

कृती :

रवा एक कप पाणी आणि अर्धा कप दह्यात भिजवून दहा मिनिटे बाजूला ठेवावा.

मटार, मिरच्या,आलं आणि कोथिंबीर मिक्सरमध्ये जाडसर वाटून घ्यावी.

हिरवं वाटण, मीठ, साखर आणि तेल रव्याच्या मिश्रणामध्ये मिसळावे. गरज वाटल्यास थोडे पाणी मिसळावे.

ढोकळा पात्रातील पाणी चांगले गरम होऊ द्यावे. ढोकळा प्लेटला तेल लावून घ्यावे.

आता मिश्रणात इनो घालून मिसळून घ्यावे आणि ते ढोकळा प्लेटमध्ये हळू हळू ओतावे. त्यावर लाल तिखटाची पूड भुरभुरावी.

आता पात्रावर झाकण ठेवावे. स्टोव्ह मध्यम आंचेवर असू द्यावा. बारा-तेरा मिनिटांनंतर झाकण काढून टूथपिकनेकिंवा चाकूने चेक करावे, चाकू कोरडा निघाला तर ढोकळा तयार आहे असे समजावे.
ढोकळा प्लेट पात्रातून काढून बाहेर ठेवावी.
पाच मिनिटांनंतर चाकूने ढोकळा कापावा आणि सर्व्हिंग प्लेटमध्ये ठेवावा.
फोडणीचे सर्व साहित्य वापरून खमंग फोडणी बनवावी आणि ती ढोकळ्यावर पसरवावी. नंतर त्यावर कोथिंबीर भुरभुरून ढोकळ्याचा आस्वाद घ्यावा.

कविता कुलकर्णी

शब्दकोडे उत्तर

१ वि	नो	२ द		३ प		४ त		५ सा	धि	६ त
चा		ग		७ रि	या	ज		व		र
८ र	म	ल	खु	णा		९ वी	र	ध	व	ल
		बा		१० म	११ ग	ज		गि		
१२ अ	१३ रा	ज	१४ क		ज		१५ प	री	१६ क्ष	ण
	क्ष		१७ प	र	व	श	ता		णि	
१८ द	स	१९ प	ट		द		२० का	२१ म	क	री
		द		२२ क	न	२३ क		हा		
२४ अं	त	र	पा	ट		२५ रा	म	प्र	ह	२६ र
दा		मो		२७ क	ल	म		ल		ज
२८ ज	ख्ख	ड		ट		त		२९ य	कृ	त

महाराष्ट्र मंडळ शिकागो
बोलका कट्टा सानंद सादर करत आहे.
गप्पागोष्टी..
प्रसिद्ध साहित्यिक पं.डॉ. संदीप अवचट यांच्याशी गप्पागोष्टी आणि कवितावाचनाचा कार्यक्रम।।
दिनांक: रविवार, २६ ऑक्टोबर २०२५
वेळ: सकाळी ९:०० (शिकागो वेळेनुसार)
संध्याकाळी ७:३० (भारतीय वेळेनुसार)
यूट्यूब लिंक:
https://www.youtube.com/@MaharashtraMandalChicago
आयोजक- नमीता वेदक, सुजाता महाजन, रश्मी चाफेकर, अश्विनी कुंटे, रश्मी वडवळकर


MAHARASHTRA MANDAL, CHICAGO
FITNESS GROUP PRESENTS
CLIMB HIGHER
Proven Training Strategies for Iconic High-Altitude Treks
Pankaj Dahad
MI Adventures'23
6th December, 2025 10-11AM CST


Maharashtra Mandal Chicago
Aarogyadham Team Presents,
Beyond Prognosis
A story of Hope and Healing
[An inspirational story of a stage 4 cancer thriver]
Mr. Pravin Khatal
November 22nd , 9 AM (CT)
Organizers: Nameeta Vedak,
Rekha Deodhar, Ulka Nagarkar,
Dr. Chandra Vedak, Anupama Bhat

Maharashtra Mandal Chicago
Itihas Manch
Presents, Series
Itihas Manch Session # 162
Third Battle of Panipat : Part-2
Friday, November 21st 2025 Time- 8:00- 10:00 (CST)
Speakers: Mr.Rohan Thanedar & Mr.Pramod Thanedar
Join us live via MMC Zoom or catch up via MMC YouTube - Ithihas Manch Playlist
Organizers: Chetan Rege, Madhav Gogavale, Vishal Navalkar, Vaishanvi Navalkar, Prajakta Joshi, Nameeta Vedak

महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच प्रस्तुत करत आहे,
Itihas Manch Session # 158
गळाभेट ते गळचेपी- भारत-अमेरिका संबंधात नेमकं चाललंय काय?
(Decoding India-America Bilateral Relations)
दिनांक: शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५ वेळ : रात्री ८.०० वाजता, (शिकागो वेळ)
श्री. प्रमोद देशपांडे
आयोजन- चेतन रेगे, माधव गोगावले, विशाल नवलकर, वैष्णवी नवलकर, प्राजक्ता जोशी व नमिता वेदक

MMC Presents
ASG KARAOKE EVENT
एक श्याम ग़ज़ल के नाम
Saturday – October 25, 2025
Starting at 5:00 PM
Venue: MMC YouTube Channel (Live Stream)
CHICAGO

MMC Presents - ASG KARAOKE EVENT
Tribute to Dharmendra and Chopras
Songs from BR Chopra, Yash Chopra, and Dharmendra Movies
Saturday – December 06, 2025
Starting at 5:00 PM - Venue: MMC YouTube Channel (Live Stream)
DHARMENDRA
1935-2025
yash raj films
CHICAGO


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५
अध्यात्मपीठ
गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर २०२५
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
भगवद्भक्तांच्या कथा
प्रेरणा व उपदेशांचा दीपस्तंभ
वक्ते: श्रीदत्त राऊत
* शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, नमीता वेदक

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५
अध्यात्मपीठ
गुरुवार ११ डिसेंबर २०२५
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
गणपती अथर्वशीर्ष
निरूपण भाग ३०
निरूपणकार
प. पू. मंगेशदादा फडके
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, नमीता वेदक

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५
अध्यात्मपीठ
गुरुवार ६ नोव्हेंबर २०२५
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
भारतीय वेळ: शुक्रवार ७ नोव्हेंबर २०२५
सकाळी ७:३० ते ९
हरिपाठाचे अभंग
भाग २
प्रवचनकार
माधुरीताई जोशी
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले,
अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, नमीता वेदक

धन्यवाद